म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १०३८

# संगीतिका

– बी. डी. रामपुरे


REFBK-0016310
REFBK-0016310


मूल्य आठ रुपये

सुरस ग्रंथमाला, सोलापूर









प्रा. शो. रामपुरे

—Chavan

# संगीतिका.

— बी. जी. रामपुरे

REFBK-0016310

मूल्य आठ रुपये

सुरस ग्रंथमाला, सोलापूर.

प्रकाशक :
न. गौ. व्होरा,
सुरस ग्रंथमाला,
सोलापूर.

सर्व हक्क प्रकाशकाधीन
– सदरहू संगीतिकांचे –
रंगभूमीवर प्रयोग करण्यापूर्वी
लेखी संमति घेणें आवश्यक आहे.

मुद्रक :–
ना. ह. कोल्हटकर,
महाराष्ट्र-मित्र मुद्रणालय,
७७, शुक्रवार, सातारा.

# प्रयोगापूर्वी—

मराठी सारस्वतांत 'संगीतिका' हा काव्य प्रकार कांहीं नव्यानेंच पाश्चात् साहित्यांतील 'ऑपेरा' ( Opera ) या काव्य-प्रकारानुकरणानें आलेला नसून संगीतिकेचा संपूर्ण सांगाडा पूर्व वैदिक काळांतच घडविलेला पाहायला मिळतो. म्हणून मराठी काव्य-साहित्यांत पूर्ववैदिक कालापासून चालत आलेला 'संगीतिका' हा काव्य प्रकार मुळांतच अभिजात काव्य-नृत्य-संगीत-प्रधान असून प्रासादिकता हा त्याचा प्राण आहे.

मोहक पदलालित्य, भेदक नेत्रविभ्रम आणि वेधक नृत्याभिनयाद्वारें निघणारे भावरम्य काव्यपूर्ण संगीत यांच्या मनोहर संगमांतूनच या आकर्षण 'संगीतिके'चा जन्म होत असतो. सोपी, सुबोध, रसानुकूल यथातथ्य शब्दरचना आणि सुटसुटीत पण श्रवणसुलभ स्वर-रचना; तसेंच प्रत्यक्ष रंगमंचावर संगीतिकेंतील प्रसंग उत्कट रीतीनें साकार करण्यासाठीं प्रसंगानुकूल साधन-सामग्री आणि परिणामकारक प्रकाश-योजना या सर्वांची संगीतिकेंत नितांत आवश्यकता असते. वरील सर्व साहित्य-साधनांचा साकल्यानें विचार होऊन रंगमंचावर सादर केली जाणारी संगीतिका ही केवळ 'संगीतिका'च वाटावी !

'संगीतिका' या संग्रहांतल्या संगीतिकांत मीं अनेक काळखंडांतील विविध भावदर्शक आणि ललितरम्य घटना हाताळल्या आहेत. रामायण-कालीन, महाभारत-कालीन, बुद्ध-कालीन आणि शिव-कालीन अशा अनेक उत्कट प्रसंगांना या संगीतिकेंतून नव्यानें उजळा देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

वास्तविक या संग्रहांतील किती तरी संगीतिका रंगभूमीवर यशस्वी झालेल्या आहेत; आणि हें यश सर्वस्वी त्या सादर करणाऱ्यांचेंच आहे, असें म्हणावें लागेल.

संगीतिका लिहिण्याची खरी प्रेरणा येथल्या समाज-कार्यकर्त्या आणि कलाप्रेमी भगिनी सौ. चंचलादेवी सी. गांधी यांची आहे. शिवाय या संग्रहाचें काम पूर्ण करून घेण्याची प्रेरणा गुरुवर्य सुमेरजी जैन, एम्. ए., बी. टी. आणि श्री. व्होराकाका ह्यांचीच आहे, हें मुळींच विसरतां येत नाहीं.

माझ्यावर अनेकांचा लोभ आहे; त्या प्रेमांतूनच ही कृतीहि आपलीशी करून घेतल्यास मला धन्यता वाटेल.

— लेखक

# अनुक्रमणिका


१. उषा स्वप्न ५
२. अहिल्या १९
३. वासवदत्ता २७
४. मर्दानी झांशीवाली ३७
५. कच – देवयानी ५१
६. राघव – दर्शन ५९
७. मेनका ८१
८. कवि बिल्हण – शशिलेखा ९१
९ उर्वशी १०९
१०. राजा उदयन ११९
११. चित्र-दर्शन १३५
१२. किरात–भिल्लीण १४५
१३. निर्वाण १५३
१४. ऋतुराग १६५
१५. बिल्वमंगल १७७
१६ शुक – रंभा १८९
१७. थोरातांची कमला १९५
१८. मुरली २०३
१९. महाश्वेता २०९
२०. मीरा २१३
२१. पत्र-लेखन २१९
२२. शर्मिष्ठा २२५
२३. रागरंग २२९
२४. शबरी २३७
२५. रासक्रीडा २४१

उपाख्यान

## कथासूत्र :

भगवान् श्रीशंकरांच्या तृतीय नेत्रांतील अग्नीनें कामदेव भस्मसात् झाले, आणि त्यांची पत्नी रती ही शोक-सागरांत पार बुडाली. तेव्हां श्रीशंकर प्रसन्न होऊन त्यांनीं यदु वंशांत मदनाचा आणि बाणासुराच्या पोटीं रतीचा उद्भव होऊन दोघांचें पुनर्मीलन होईल असा वर दिला.

भगवान् श्रीशंकराच्या वराप्रमाणें श्रीकृष्णाचा मुलगा प्रद्युम्न यास अनिरुद्ध झाला; तोच मदन !.... आणि — बाणासुराच्या पोटीं उषा जन्मली तीच रती होय ! पण....

उषा आणि अनिरुद्धाच्या मलिनास फारच अडचण होती. बाणासुर व श्रीकृष्ण यांचें हाडवैर; पण विधिलिखित अटळ असते ना ! .... उषा उपवर झाली. तिच्या लग्नाचा घरीं विचार सुरू झाला, आणि अशांतच तिला एके रात्रीं स्वप्नांत जो पुरुष तिच्या दृष्टीस पडला त्याच्यावरच ती अनुरक्त झाली. पण त्याचें नांव, गांव व वंश तिला कसें कळावे ? ती कष्टी झाली. पण तिची चित्रकार चतुर दासी — चित्रलेखेनें हा प्रश्न कुशलतेनें सोडविला. चित्रें काढण्यांत ती कुशल होती. प्रथम

राक्षसकुल, नंतर यक्ष, गंधर्व, किन्नर, देव या कुलांतील राजकुमारांच्या प्रतिकृति तिनें रेखांकित केल्या. पण .... त्यांत उषेच्या प्रियकराची छबी दिसेना. मग चित्रलेखेनें शत्रुकुल जें यदुकुल वंश तें रेखाटण्यास आरंभ केला. आणि काय आश्चर्य !.... श्रीकृष्णाचें चित्र पाहतांच उषेच्या चेहऱ्यावर आनंदाच्या छटा उमटूं लागल्या. प्रद्युम्नास पाहतांच तर ती म्हणाली, 'अशीच पण कोमल चेहऱ्याची मूर्ति माझ्या हृदयांत रेखाटली आहे.' आणि ....!– अनिरुद्धाचें चित्र पाहतांच – उषा एकदम लज्जेनें चूर होऊन तिनें चित्रलेखेला आनंदानें आलिंगन दिलें !

पण ?—

उषा-अनिरुद्धाचें हें स्वप्नांकित मधुर मीलन प्रत्यक्षांत कसें उतरावें ?.... उघड गोष्टी घडणें सर्वथा अशक्य ! तेव्हां श्रीनारदाच्या कानमंत्रानें चित्रलेखा रात्रीं गुप्त रीतीनें अनिरुद्धास पलंगासह उचलून आणते. आणि—

★★★

पात्रें :

- उषा
- अनिरुद्ध
- चित्रलेखा

# पूर्वरंग :

या संगीतिकेंतील प्रथम खंड संध्याकाळीं दुसरा रात्रीं, आणि तिसरा उत्तर-रात्रीं घडतो.

प्रथम खंड शिवमंदिरांत घडत असल्यामुळें रंगमंचकावर नेपथ्यांत शिवमंदिराचें दृश्य, भगवान् श्रीशंकराची मूर्ति, पूजेचें साहित्य आणि नगारा, शंख, घंटा, झांज इत्यादि मंगलवर्धक वाद्यांची योजना असावी. विशेषतः आकाश-वाणीच्या वेळीं पार्श्वसंगीतांतून ढगांचा गडगडाट आणि विजांचा लखलखाट यांचा आभास निर्माण करून त्यास प्रकाश योजनेची साथ द्यावी.

दुसऱ्या खंडांतील सर्व प्रसंग उषेच्या महालांत घडतात. महालांतील एका बाजूला पुष्पाच्छादित चिकाचे पडदे लावलेला मंचक, त्यावर मौल्यवान् भरजरी वस्त्रें आच्छादा-वींत. शेजारीं दीपप्रज्वलित समया आणि दुसऱ्या बाजूला शृंगारलेल्या चौपाया असाव्यात.

स्वप्न-दृश्याच्या वेळीं अंधुक प्रकाशाची योजना करून स्वप्न-प्रसंगाचा आभास निर्माण करतां येईल. धुराचा लोट सोडून स्वप्न-प्रसंग-निर्मिति केल्यास अधिक उत्तम.

उषा-अनिरुद्धाची वेषभूषा आणि केशभूषा राजकुमार आणि राजकुमारीला साजेल अशी करावी.

पार्श्वसंगीतासाठीं वीणा, सतार तानपुरा, बांसरी, व्हायोलिन इत्यादि वाद्यांचा उपयोग करावा. शेवटचा उषा-अनिरुद्ध मधुर मीलनाचा प्रसंग मंगलवर्धक वाद्यांनीं उठाव घेतल्याचा असावा .. प्रकाशाची परिणामकारक योजना व्हावी.

★★★

बि: ....................
नों: दि: ....................

## उषा स्वप्न

(स्थळ:– शिवमंदिर, उषा नृत्य करीत प्रवेश करते. पायांतील नूपुर, शंख घण्टा, झांज, नगारा इत्यादि मंगलवर्धक वाद्यांचा आवाज, पार्श्वसंगीताची योजना इत्यादि.)

**पार्श्वगायक :–** ध्यायेन्नित्यं महेशं रजतगिरिनिभं चारुचन्द्रावतंसं
रत्नाकल्पोज्ज्वलाङ्गं परशुमृगवराभीतिहस्तं प्रसन्नम् ।
पद्मासीनं समन्तात् स्तुतममरगणैर्व्याघ्रकृत्तिं वसानं
विश्वाद्यं विश्ववन्द्यं निखिलभयहरं पञ्चवक्त्रं त्रिनेत्रम् ॥

**निवेदक :–** धिगित धिगित धा धा । थय थय था । थय थय था ।
थय गिडितन तकतुना । गिडित तकतुना । थय थय था । ..

(उषा आपलें नृत्य संपवून भगवान श्रीशंकराच्या मूर्तिजवळ येते. आणि आपले दोन्ही कर जोडून प्रार्थना करूं लागते.)

**उषा :–** गिरिजा शंकर सांब अभयंकर
तुला वंदिते जुळवुनि मी कर
धाव पाव-रे नाथा दीना
सुरसंगिनी मी छेडे वीणा
धाव धाव रे तूं दयाघना
पुरवी माझी मनोकामना
गंगाधारी तूं प्रलयंकर !
गर्जति जयजय हे गिरिकंदर !

( पार्श्वसंगीत खंडातून सतारीचे धुंद स्वर छेडले जातात. )

सुरासुरांतून भाव झिरपती
भैरवीमधलें माझें गीत
अनुरागांचीं सुंदर सुमनें
अस्ताईंतच मिटति आर्त !

६३१०

आज मनीं मी उदास झालें
त्यजावें हें वाटे वैभव
प्रीतिविण मी मुकें पाखरूं,
प्रीतीचा मधु शोधित ठाव
भग्नवीणा झंकारिताही
तुटोनी तार स्वर मालवे
स्मृतीच्या ज्या शिंपल्यातुंनी
भावनांची स्रवति आंसवें !

(आकाशवाणी होते. ढगांचा गडगडाट, विजेचा कडकडाट, आणि जोराचा वारा सुटल्याचा आवाज पार्श्वसंगीतांतून निघतो.)

निवेदक :- हो प्रसन्न बालिके तुजवर श्रीगंगाधर
अबोध स्वप्न मनीचें ठरे तुज प्रीति-वर
मध्यरात्रीं स्वप्नीं एकांति
दिसे तुज तव सख्याची द्युति
अर्पण जीवन तयास मानुनी तव प्रियकर !

(उषा आनंदानें बेहोष होते. नृत्याचा एक बहारदार तुकडा.)

उषा :- आलें माझें पुण्य फळाला
नाथा पूजिन घालुन माला
पतिदेवा जे येत मंदिरीं
पूजिन त्या मी मम देव्हारीं
अखंड स्थापुन त्यांत प्रियकर
गाईन त्यांची कीर्ति अमर !

चित्ररेखा - (गुणगुणत येते.)
पसरली सखे नभिं पुनवेची ही रात
रूपावर भाळली कां चांदणी रात

ओढ कुणाची लागली उषा सुंदरी
कां तळमळशी तूं अजुन मंचकावरी ?

**उषा :-** निर्विकार चेहरा करून ..
काय सांगूं मी प्रिय सखे तुज ?
जाणशील कां मनीचें गूज !

(कांहीं वेळानें उषेच्या डोळयावर झोपेची धुंदी चढते. व चित्ररेखा तिला झोपवूं लागते.)

**चित्ररेखा :-** नीज नीज गे राजकुमारी
कां ग बावरी, गडे सुंदरी
निजला वारा निजला तारा
निजली वसुधा, जीव पसारा
बघ आतां ही सरे शर्वरी.
बिलगुन बाळे माते पोटीं
बसली दडुनी माया ओठीं
म।ता–ममता तयां भरजरी.
स्वप्नें बघण्या कां करि घाई
नको करूं तूं घे ही दुलई
सुखें नीज तूं निद्रा अंतरीं.

(उषेला झोपीं घालून चित्ररेखा जाते. झोपेंत उषेला एक मधुर स्वप्न पडून स्वप्नांत अनिरुद्ध येतो. स्तब्ध शांततेच्या पार्श्वभूमीवर संगीतखंडांतून आनंदमिश्रित स्वर उमटतात.)

**उषा :** कोण तुम्ही कां माझ्या सदनीं ?
कोण मी कोण तूं जाण मनीं !

अनिरुद्ध :- बाहेर रम्य चांदणें त्यावर ताऱ्यांची शेज
प्रश्न पडला देवी कां मज बोलाविलें आज ?

उषा :- पतंग ज्योतीशीं भ्रमर कळीशीं
कां करति सांग सख्या हितगूज ?
काय गडे मी कां सांगावे
वाटे मजला भारी लाज !

(दोघेहि आनंदानें हसूं लागतात. नृत्याचा एक तुकडा. नृत्य संपल्यानंतर थोड्या वेळानें अनिरुद्ध प्रेमभरांतून शुद्धीवर येऊन जाऊं लागतो. )

अनिरुद्ध :- जातो प्रिये आतां सत्वर
प्रीत कशी ही असली विपरित ?

उषा :- प्रियकरा ! ही प्रीत न विपरित
ठावे मजला जगाची रीत !
लाविला मधुर मधु स्मृतीचा
या प्रीतीला रंगरक्तिमा
हा छंद नव्हे जीवास धुंद
करी प्रेम जाण तूं प्रियतमा !

(विचार करून थबकतो. आणि परत जाऊं लागतो. उषा व्याकुळ होते. पार्श्वसंगीतांतून करुण स्वर उमटतात.)

उषा :- नका प्रियकरा ! जाऊं आतां
सोडुन या मज दीन पांखरा !
जळावांचुनी मीन तडफडे
द्या तया तुम्ही प्रीति आसरा
युगें युगें मी विरही जळतें
मनची व्यथा मला पोळतें !

(अनिरुद्ध जातो. स्वप्नभंग होऊन उषेला झोपेंतून जाग येते. ती इकडे तिकडे घाबरून पाहूं लागते. याच वेळीं चित्ररेखा प्रवेश करते.)

**चित्ररेखा :–** कां बावरशी आज सखये ?–
अवचित काय घडे !

**उषा :–** स्वप्नसंगें अंतराळीं . .
चित्त पांखरूं उडे !

(उषा आनंदाच्या बेहोषींत असते. उषा -- चित्ररेखेचा नृत्याचा तुकडा.)

अवचित बाई कुणी तर आले
गडे ग हृदय कुणीं जिंकिलें !
मदन पाऊलीं गे कुणीतरी
आला हळुंच यौवन द्वारीं
भृंग होऊन मधु डंखियले !

**चित्ररेखा :–** उषा ! सांभाळ ग बाई, सांभाळ ! ...

**उषा :–** स्वप्नीं पाहिली मी प्रिय मूर्ति
नयनांची मम झाली ग पूर्ति
श्यामल मूर्ति रूप मनोहर
भर्जरी शेला कटीस सुंदर
मदन रूप तो दिला दिलासा
'चल गडे तूं अमर मंदिरीं !'
उगाच हसतां, मीहि हसलें
धरी मज कटि कर पाशांतरीं
हळूच ओढुनी मला वेडिला
नयनीं ओतिली धुंद वारुणी

निकट व्हायला झणीं बोलला
मधुमिठीं मीहि फसे ग हरिणी !

(पार्श्वसंगीत खंडांतून शृंगारसूचक स्वर छेडिले जातात. नृत्याचा एक छोटा तुकडा.)

अवचित त्याला सारे कळले
आणि बोलतां लबाड डोळे
नयन नयनांस भिडतां क्षणीं
चमकली हृदि सौदामिनी
मनीं सळसळे प्रीत शिरशिरी
शरद् पूर्णिमा उजळे अंतरीं !

**चित्ररेखा :–** हं, उषा सांभाळ ! ..
या पुरुषांचा कुणी भरंवसा
कसा धरावा तूं सांग गडे ?
प्रीत करती एकीवरती
अन् मन देती दुसरीकडे !

(उषेला तिच्या प्रियकरासंबंधीं विचारूं लागते.)

कोण गडे गे तो कोण असे
ज्याच्यावर तूं मोहित असे ?
कोण असा तो रूपमनोहर
शरधारी कां कुणी धनुर्धर ?

**उषा :–** (लज्जेनें ...)
मुळींच नाहित, सखे ते असे !

**चित्ररेखा :–** सांग गडे गे तूं सांग गडे
सांग गडे गे ते कोण असे ?
कोण असे तो पुरुषोत्तमा
मुगुट मंदिलीं मुखीं रक्तिमा ?

**उषा :--** नाहित वेडे ते मुळीं असे !

**चित्ररेखा :--** (कंटाळून ..)
सांग गडे गे तूं सांग गडे
सांग तरी ते होते कसे ?

**उषा :--** (तिला समजाऊन चित्रें रेखाटण्यास सांगते.)
प्रिय मैत्रिणी ! सखे साजणी
रेख गडे तूं प्रतिमा क्षणीं !
मदन मनोहर स्वरूपसुंदर
रेख आकृति तयांची रुचिर

**चित्ररेखा :–** (आकृति काढून ..)
रेखाकृति... ही पहा... कां हेंच तें ?

**उषा :–** न असे ते ! हे न नयनपातें !

**चित्ररेखा :–** हे तर कां ते ? – नयनमोहि ते ?

**उषा :–** छे ऽ गे, नव्हेत मुळीं असे ते !
(चित्ररेखा कंटाळते उषा परत तिला समजावून सांगते.)

**उषा :–** तेज वर्णावें रक्त सौवर्ण
हास्य त्यांचे अन् धुंद पूर्ण !

**चित्ररेखा :–** (दुसरी आकृति काढून ...)
ही तर आहे का त्यांची आकृति ?

(आकृतीकडे पाहून उषा लज्जांकित होते व चित्ररेखेला आनंदानें आलिंगन देते. आनंदी वातावरणाच्या पार्श्वभूमीवर संगीत खंडातून आनंद – शृंगार मिश्रित स्वर निघून या प्रसंगाला अधिकच उठाव आणतात.)

**चित्ररखा :-** ओळखलें ग ओळखलें
ओळखलें गे गडे लबाडे !
तुझ्या मनांतिल मधु मूक भाव
नच लपवी तो मनीचा ठाव !
आनंदीं पहा स्वर्ग बुडे !

(नंतर ती किंचित् दुःखी होते. करुण रसाचे स्वर त्या प्रसंगाला अधिकच उठाव आणतात.)

सांगूं कशी ग तुझ्या मनींची व्यथा
पायतलिं तुझ्या कुस्करिल्या भावकथा !
मधु मीलनाचि गडे ग गाणीं
गाशी आतां तूं ग विराणी
निवड चुकशी तव ही तर कठिणपथा !
यदुवंशांतिल हाच प्रियकर
तुला लाभणें तो अति दुःसर
शत्रुकुळीचा तो येई कसा हातां ?

( क्षणैक काल निस्तब्ध शांतता. करुण स्वर उच्चतर होतात. एवढ्यांत नारदाची आकाशवाणी होते. )

चित्ररेखे ! सांगतों मी
ऐक तूं ही नारदवाणी
अनिरुद्धाला व्योममार्गें
आण घालुनी तयां मोहिनी !

( नारदाची वाणी ऐकून दोघेहि क्षणभर आनंदी होतात. छोटासा नृत्य-तुकडा. चित्ररेखा अनिरुद्धाला आणण्यासाठीं जाते. ती निघून गेल्यावर मात्र उषा सचिंत होते. )

**उषा :-** मंदिरांत मी सखया जातें
अंतरिचा हा राग जोगिया

आसवांत मम भिजे उशी ही
मनोव्यथा पोळे हृदया!
ओसरे प्रीति हा नाद मधुर
आसवांत मधु विरले सूर
अंतरिची हो काहिली सख्या !
मोहमयी मद रात्र सरे
गोड आठवें वेदनीं उरे
किती काळ मी झुरूं रे राया !

( अनिरुद्धाला घेऊन चित्ररेखा येते. पार्श्वसंगीत खंडांतून आनंदवर्धक मंगल स्वर उमटतात. अनिरुद्धास पाहिल्यावर उषेला तर अत्यानंद होतो. आणि लाजून ती त्याच्या आडोशाला उभी राहते. ... क्षणैक कालानंतर तो झोपेंतून एकाएकीं जागा होतो. आणि साशंकतेनें आजूबाजूला पाहूं लागतो. त्याला थोडेसें संभ्रम झाल्यासारखें होतें. )

**अनिरुद्ध :–** कोण मी इथें आलों कसा ?
राजमहल मम नोहे असा !
भुताटकी ही झाली कशी ?
ही न माझी भर्जरी उशी !

( महालांतील प्रत्येक वस्तूकडे अंगुलीनिर्देशन करून... )

हा तर नाहीं माझा पर्यंक
इथें कुठचा दिसतो दीपक ?
हा तर नाहीं माझा मंदिल
कुठला घुमतो हा गंध धुंदिल ?
कोण मी ? .. इथें आलों कसा ?
आलो कसा ?...

( तो चांगला शुद्धीवर येतो. उन्मादक छेडलेल्या सतारीच्या स्वरा- ) कडे त्याचें लक्ष वेधतें. )

परि हाय ! . .
कोण छेडतो येथें सतार
येथें सतार, जीवनधार
हृदयावरी जणूं करी तो . .
संगीन-वार !

**उषा :–** (एकदम पुढें येऊन त्याच्या पायावर आपलें मस्तक ठेवतें. आणि)

प्राणप्रियकरा ! मी हो तुमची
तव हृदीची मी पट्टराणी
घ्या आपुल्या चरणांशीं मज
गाऊं अमर ती प्रीति-गाणीं !

(मंगलवर्धक पार्श्वसंगीत खंडांतून धुंद सनईची धुंदिल धून मनास रिझवीत असतांना उषा-अनिरुद्ध आणि चित्ररेखा यांचे नृत्य. नृत्य संपतांच पटक्षेप)

★★★

अ हि ल्या

## कथासूत्र :

अहिल्येच्या जीवनांतील ही एक करुणरम्य शोकांतिका आहे.

अहिल्या स्वयंवराच्या वेळीं अहिल्या आपणास प्राप्त न होतां तिनें गौतम महर्षीला वरलें या गोष्टीचा इंद्रास खेद वाटून आपल्यां अपमानाचा वचपा काढण्यासाठीं तो ब्रह्मगिरीवर असलेल्या गौतमाच्या आश्रमाच्या परिसरांत आला. आणि एके दिवशीं भल्या पहाटें गौतम स्नानासाठीं बाहेर पडल्यानंतर संधि साधून कपट वेषधारी इंद्रानें गौतमाच्या रूपानें अहिल्येला कलंकित केलें. एवढ्यांत अहिल्येनें त्याच्या अंगाच्या दिव्य वासानें हा आपला पति नसावा असें ताडलें. पण तेवढ्यांतच गौतम ऋषिहि तेथें येतो इंद्राचें कपट कारस्थान दोघांनाहि कळते.

अहिल्या त्याच्यावर अतिशय क्रुद्ध होते. आणि गौतम तर त्याला 'तुझ्या सर्वांगाला भेगा पडतील!' असा शाप देतो. आणि अहिल्येकडे वळून तिलाहि 'तूं शिला होऊन निपाचित पडशील!' असा शाप देतो.

★★★

पात्रें :

- अहिल्या
- गौतम
- कपट वेषधारी इंद्र

## पूर्वरंग :

ही संगीतिका पौराणिक – महाभारतकालीन घटनेवर आधारलेली असून अहिल्येच्या जीवनाची एक करुणोत्कट कहाणी यांतून ऐकायला मिळते.

या संगीतिकेचे दोन खंड पडतात. प्रथम खंड उत्तर रात्रीं घडतो आणि दुसरा खंड त्याच उत्तर रात्रीच्या सकाळीं !

प्रथम खंडांतील प्रसंग गौतम महर्षींच्या आश्रमांत घडत असल्यानें निसर्गरम्य जंगलाच्या पार्श्वभूमीवर रम्य आश्रमाची सजावट उभी करावी. रंगमंचकाच्या उजव्या बाजूला गौतमाची साधी कुटी उभी करावी आणि डाव्या बाजूला वृक्षवेलींनीं शृंगारलेलें अंगण दाखवून, त्याच बाजूला एका पर्णाच्छादित खाटेवर अहिल्या निद्रिस्त पडलेल्याचें दाखवावें. उत्तर रात्रीचा प्रसंग असल्यानें वाऱ्याच्या मंद झुळकीनें पर्ण-फांद्यांच्या आवाजाची पार्श्वसंगीतांतून कल्पना द्यावी. शक्यतों वातावरणांतून प्रशांततेची प्रभा पसरल्याची प्रचीति मिळावी. आणि त्यांतून पहाटेच्या पार्श्वभूमीवरच उषा सूक्ताचे मंद पठन हळके हळके कानांवर येऊन धीरगंभीर वातावरणाला अधिक उत्कट केल्यास उत्तमच.

दुसरा प्रसंग कपट वेषधारी इंद्राच्या कारस्थानी प्रवेशानें होतो. या वेळीं वातावरणांत परिवर्तन घडून आल्याचा आभास

पार्श्वसंगीतानें आणि कौशल्यपूर्ण प्रकाशयोजनेनें करावा. प्रथमतः शृंगारिक वातावरणाची निर्मिति करून त्यांतूनच करुणरौद्र प्रसंगाची उत्कटता दाखवावी. पक्षांचा भेसूर आवाज, पर्ण-फांद्यांचा सळसळाट आणि क्रुद्ध वाऱ्याचा भयानक आवाज इ०ची पार्श्वसंगीतांतून निर्मिति करून भेसूर प्रसंगाला अधिकच उठाव आणावा.

अहिल्येची वेषभूषा आणि केशभूषा एकाद्या वीरांगी साध्वीला शोभण्यासारखी असावी. केस मुक्त सोडलेले असून, कानांत कर्णफुलें, गळ्यांत तुळशीमाळा – पुष्पमाळा, आणि पांढरी शुभ्र साडी परिधान केल्याचें दाखविल्यास अधिक बरें !

गौतम महर्षीचा पोषाख संपूर्णपणें तपस्व्याचाच असला पाहिजे. गळ्यांत रुद्राक्षमाळा, एका हातांत पलाशदण्ड आणि मृगाजिन, दुसऱ्या हातांत कमंडलू इ० साधनांनीं गौतमाचें तेजस्वी व्यक्तिमत्व साकार करतां येईल.

इंद्राची वेषभूषा देवादिकांच्या पोषाखाला शोभण्यासारखी असावी. त्यांतून एखाद्या वस्त्रालंकार संपन्न राजाच्या विलासपूर्ण जीवनाचा आभास निर्माण करतां आल्यास चांगलें.

पार्श्वसंगीत खंडांतून प्रसंगानुकूल शांत – शृंगार, करुणार्त स्वरांची निर्मिति करून परिणामकारक प्रकाशाची योजना केल्यास प्रस्तुत प्रसंगाला अधिकच उत्कटता प्राप्त होईल.

★★★

# अहिल्या

( स्थळ : गौतमऋषींचा आश्रम. पहाटेची सुमारे साडेतीन-चार वाजण्याची वेळ झालेली असून मंद वारा वाहूं लागलेला आहे... वाऱ्याच्या सलील झुळुकीनें पर्णफांद्यांचा आवाज ऐकूं येऊं लागलेला आहे. . . आश्रमांतील पर्णशय्येवर अहिल्या निद्रिस्त असून गौतम आपल्या काखेंत व्याघ्रांबर, हातांत कमंडलू धरून स्नानाला जाण्याची तयारी करूं लागलेला आहे. लांबून वाऱ्याच्या मंद झुळुकीबरोबर उषासूक्ताचे मंद पठन ऐकूं येऊं लागते . . )

**निवेदक** :- उदश्रिय उषसो रोचमाना अस्थुरपां नोर्मयोरुशन्त: ।
कृषोति विश्वा सुपथा सुगान्यभूदुवस्वी दक्षिणा मघोनि ।
भद्रां ददृक्ष उर्विया विभास्युत्ते शोचिर्भानवो द्यामपप्तन् ।
अविर्वक्ष: कृणुषे शुम्भमानोषो देवि रोचमाना महोभि: ।।

( उषासूक्ताचे शब्द मंद वाऱ्यांत हळूं हळूं विलीन होत असतांनाच गौतम अहिल्येला – "अहिल्ये ! अहिल्ये . ! अहिल्ये .' म्हणून हलकेच हांक देऊन उठवूं लागतो )

**गौतम** :-
उठ, अहिल्ये ! उठ सत्वरी उष:काल झाला
ग्रहणसमयीं सिद्धीसाठीं जातो स्नानाला
गंगातीरिं मंत्र सिद्धीची होईल गे पर्वणी
या सिद्धीनें मिळे मुक्ति ती अमर संजीवनी !

**अहिल्या** :-
( पर्णशय्येवरून अलगद उठून
निघा सत्वरी स्नानां, शुक्र नभि झलवला
सरुनी यामिनी नभ:कडा लाल पहा झाला

वेलींवरच्या कलिका गातीं धरूनिया करताल
शुभ्र दंवानें न्हाऊन निघतो पारिजात हिंडोल
निघा सत्वरी स्नाना नाथा...

(उषासूक्ताच्या कांही अस्पष्ट ओळी गुणगुणत गौतम स्नानाला जातो. पर्ण शय्येवर परत अहिल्या कलंडते..)

( गौतम पर्णकुटीपासून दृष्टीआड झाल्यानंतर पर्णकुटीआडून वेषधारी देवेंद्र येतो. आणि अहिल्येच्या सर्वांगावरून कामुकतेनें हात फिरवून तिला जाग आणतो. त्याच क्षणीं अहिल्या दचकून उठते. नदीवरून गौतम इतक्या लवकर परतल्याचें तिला आश्चर्य वाटतें . क्षणैक काळ करुण संगीत खंड)

**निवेदक :–** पर्णकुटी आडून प्रकटला कपटवेष इंद्र
मदनबाणें विद्ध होऊनि हो कामातुर धुंद
स्मरुनि पुरा तो अहिल्येच्या स्वयंवर वेला
अपमानाचा सूड उगविण्या झिंगुन तो गेला.

**अहिल्या :–** ( पर्णशय्येवरून उठत किंचित सःशंकतेनें... )
नाथ !– सत्वरी असें कसें तव येणें झालें ?
इतुक्या लवकरी सिद्धीचें पारणें का संपलें ?

**वेषधारी देवेंद्र :–** जातां गंगातीरिं सिद्धीस, हुरहूर मना लागली
सुखसंवादि तुझ्या रंगतां दुजी मुक्ति ती कुठली ?
आणि अहिल्ये ! पहा तिष्ठते नाजुक पर्णशय्या
गात्रांतून प्रीति सळसळे, ना दवडूं गे वेळ वाया !

( वेषधारी देवेंद्र अत्यंत उद्दीपित होऊन तिच्या कमरेंत हात घालून तिला पर्णकुटींत नेतो. वातावरण क्रुद्ध होऊन तरूंवर पक्षांचा भेसूर आवाज निघूं लागतो. पार्श्वसंगीतावर अत्यंत आर्त-करुण स्वर उठतात. क्षणैक काल-खंडानंतर वातावरणांतून वाऱ्याच्या मंद लहरीवर लांबून श्लोकांचा अस्पष्ट आवाज ऐकूं येऊं लागतो....)

**निवेदक :-** ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं ।
द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्व-मस्यादि लक्ष्यम् ॥
एकं नित्यं विमलमचलं सर्वधी साक्षिभूतं ।
भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं त्वं नमामि ॥

( आवाज स्पष्ट होतो. गौतम पर्णकुटीसमोर येऊन उभा राहतो न राहतो तोंच – अहिल्या मोठ्यानें किंचाळून दरवाजा धाडकन् उघडून बाहेर पडते नि क्षणार्धांत ती गौतमाच्या पायांवर आपलें मस्तक ठेऊन क्रुद्ध चेहऱ्यानें देवेंद्राला विचारते.. )

**अहिल्या :-** धिक्कार तुझा नराधमा ! तूं कोण असा वंचका ?
पतिवेषीं फसवी सतीला, स्त्रीलंपट याचका !
( क्षणैक पार्श्वसंगीतावर करुणस्वर छेडिले जातात.... )

**वेषधारी देवेंद्र :-** ( भीतीनें कांपत हात जोडून )
मी देवेंद्र, देवाधिपति; क्षमस्व मजला
( गौतमाकडे दृष्टि वळवून... )
आणि मुनिवरा ! तुझ्या सतीचा मी घात पुरा केला!

**अहिल्या :-** अघोर अधमा ! चांडाळा तूं कसा साधिला कावा ?
क्षणिक सुखासाठीं मम आयुष्याचा लुटला कां ठेवा ?

( या सर्व गोष्टीनें गौतम अत्यंत क्रुद्ध होतो. आणि आपल्या हातांतील कमण्डलू उपडे करून शापवाणीनें देवेंद्रावर व अहिल्येवर जलसिंचन करतो).

**गौतम :-** ऐक स्त्रीलंपटा ! पडतील भेगा तुझिया सर्वांगाला
( अहिल्येकडे दृष्टि वळवून...)
कुलटे अहिल्ये ! तूं शिळा होऊनि पडशील धरणीतळीं

**अहिल्या :–** ( आर्तस्वरानें . )

नाथ ! मला क्षमा करा ! ...मला क्षमा करा !
मला... क्षमा... करा ..
नाथ...!

( वातावरणांत क्षणभर धीरगंभीरता पसरून पार्श्वसंगीतावर करुणरसाचे स्वर उच्चतम होत जातात. जातानांच पटक्षेप. )

★★★

# वासवदत्ता

**कथासूत्र :**

बौद्ध काळांत मथुरा नगरींत होऊन गेलेल्या वारयोषिता – वासवदत्तेच्या जीवनांतील ही एक शोकांतिका आहे.

हीन कुळांत जन्मलेल्या वासवदत्तानें आपल्या ऐन तारुण्यांत जीवनाचा विविध प्रकारें उपभोग घेतलेला असतो. तिच्या प्राप्तीसाठीं – तिच्या प्रीतीच्या पूर्तीसाठीं कित्येक नरवीर जीवनांत बुडले होते; मेले होते.

मथुरा नगरींत एकदां बौद्ध मतानुयायी उपगुप्त आपल्या कांही शिष्यांसह संचार करीत असतां वासवदत्ता त्याच्या तारुण्य – रूपावर लुब्ध होऊन त्यास आपली सेवा घेण्याची विनंती करते. परंतु उपगुप्त पूर्ण वीतरागी असल्यानें वासवदत्तेच्या मोह-जाळांत न गुरफटतां उलट तिचीच कान उघडणी करून जीवननाचा खराखुरा अर्थ तिला सांगतो.

परंतु तारुण्य माणसाला धुंदी आणते ना ! वासव-दत्ताहि त्याच्या मताकडे दुर्लक्ष करून त्याच्या प्रीतीची याचना करते .. या वेळीं ' योग्य वेळीं तुझ्या हाकेला ओ देईन ! ' असें अभिवचन देऊन उपगुप्त निघून जातो.

वासवदत्तेची तारुण्याची नशा उतरल्यानंतर ती अत्यंत विपन्नावस्थेंत मरणाची वाट पहात स्मशानाच्या वाटेवर आपलें उत्तरायुष्य घालवीत असते.

पूर्वायुष्यांत तिचे जे चाहते होते तेच तिच्या उत्तरायुष्यांत तिचे शत्रु बनतात.

वासवदत्तेला जीवन असह्य झालेलें असतांनाच तिला दिलेल्या वचनाप्रमाणें उपगुप्त येऊन आपल्या सोबत तिला घेऊन जातो.

★★★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम........ ............ वि: ....................
क्रमांक ........................ नोंद दि: ..............

पात्रें :

- वासवदत्ता
- बुद्ध भिक्षु उपगुप्त
- इतर बुद्ध भिक्षु

## पूर्वरंग :

ही संगीतिका बुद्धकालीन घटनेवर आधारलेली आहे. या संगीतिकेचे दोन खंड पडतात. एक पूर्व खंड आणि दुसरा उत्तर. प्रथम खंड सकाळीं आणि दुसरा खंड साधारणपणें संध्याकाळीं घडतो असें दाखवितां येईल.

प्रथम खंडांतील प्रसंग मथुरा नगरींतील वासवदत्तेच्या महालांतील आहे. नगरांतील माणसांचा कोलाहल व इतर व्यवहार दाखवून महालाचा थाट उभा करावा. वारयोषितेचा महाल असल्यामुळें अर्थातच शृंगारिक वातावरणाची निर्मिति महालांतून सहजपणें दृष्टोत्पत्तीस यावी.

वासवदत्तेची वेषभूषा व केशभूषा शृंगारिक वस्त्रालंकारांनीं युक्त असावी. उपगुप्त आणि त्याच्या भिक्षु-शिष्यांचा पोशाख कषाय असावा. चेहऱ्यावर व इतर वागणुकींतून वैराग्य ओसंडत आहे याची प्रचीति मिळावी.

पहिल्या खंडांतील शृंगारिक वातावरणाच्या उठावासाठीं तितक्याच शृंगारोत्तेजक पार्श्वसंगीताची योजना करावी आणि प्रथम खंडांत प्रकाशयोजनेची शक्यता असेल तर सोय केल्यास बरें !

दुसऱ्या खडांतील प्रसंग साधारणपणें संध्याकाळीं स्मशानाच्या वाटेवर घडतो. स्मशानाची भयानकता वातावरण निर्मितींतून उत्कटपणें प्रत्ययास आली तर प्रसंगाला अधिकच उठाव मिळेल. पार्श्वसंगीत खंडाचे करुणार्त स्वर, अंधुक प्रकाश योजना, स्मशानांतील प्राण्यांचा भेसुर आवाज आणि विपन्नावस्थेला गेलेल्या वासवदत्तेची दयनीय स्थिति या गोष्टी चांगल्या रीतीनें आणि कुशलतेनें दिग्दर्शित केल्यास फारच उत्तम !

पार्श्वसंगीताच्या धीर गंभीर स्वरांनीं शेवटचा प्रसंग तर अतिशय भेदक नि निर्वाणप्रद करतां येईल !

★★★

# वा स व द त्ता

**निवेदक :–** वारयोषिता वासवदत्ता
गणिकांची जी मदनमंजिरी
सुखें – वैभव राहत होती
वैभवशाली मथुरा नगरीं
तिचियासाठीं कितीक नरवीर
करूनि झगडा प्राणा मुकले
आणि तिच्यास्तव मनींच्या मनीं
कितीक झुरले; किती परी मेले !
कुलें जन्मली वारयोषिता
आचार तिचे परि गंगेजम
पर–पुरुषाला नच स्पर्शतां
जिवा मानुनी देव करी प्रेम !

(**स्थळ :–** मथुरा नगरींतील वासवदत्तेचा महाल. सकाळची वेळ असून मंगलता वातावरणांतून नांदत आहे. संगीत खंडाचे सुमंगल शृंगाररसयुक्त स्वर निघूं लागले आहेत. नृत्य करीत वासवदत्ता रंग मंचकावर प्रविष्ट होते.)

**वासवदत्ता :–** प्रीति वसंत फुलला वनीं
सखे ग वसंत फुलला वनीं !
नवतीची ही डुलतीं पानें
वनराईंतून कोकिळ गाणें
तरुवेलींवर भ्रमर गुंजनें
मधुमधुरा ही चैत्रपालवी–
दिसूं लागली या हरित वनीं.

शुक मैनेला कंठ फुटले
वेलीं त्रिणतीं वृक्षां जाळें
गंध निर्भर होई मोकळे
प्रीति–विहंग होऊन मुक्त–
विहरत मोदें मदन काननीं.

लावण्यलक्ष्मी रुपरागिणी
अनंत यौवन मदन भामिनी
चिर प्रीतीची तपो–धारिणी
भुवनसुंदरी वासवदत्ता–
मदनसख्याची महान राणी

थरथरत्या अधरदलानें
स्वरतंतूंचें गंधित गाणें
विश्व रंगे मम स्पर्शानें
नाजुकतेच्या नयन कटाक्षें–
लवथव जीवन दे अखिलजनीं !

(इतक्यांत वातावरणांत धीर–गंभीरता पसरून लांबून मंदपणें गंभीर शब्द ऐकूं येऊं लागतात. संगीताचे आर्त–गंभीर स्वर वातावरणाला अधिकच गंभीरता आणतात. रंगमंचकावर बुद्ध भिक्षूंसह उपगुप्त मंद पावलानें प्रवेश करतो.)

**उपगुप्त :–** बुद्धं सरणं गच्छामि ।

**बुद्धभिक्षु :–** बुद्धं सरणं गच्छामि ।

**उपगुप्त :–** धम्मं सरणं गच्छामि ।

**बुद्धभिक्षु :–** धम्मं सरणं गच्छामि ।

४५३९४ ... नाट्य
१५३८



**उपगुप्त :–** संघं सरणं गच्छामि ।

**बुद्धभिक्षु :–** संघं सरणं गच्छामि ।

(विनीतमाथें हातांतील कटोरा पात्र पुढें करून उपगुप्त वासवदत्तेप्रति भिक्षा मागतो.)

**उपगुप्त :–** भिक्षा दे माई !
भिक्षा दे माई !

(वासवदत्ता त्याच्या कटोरापात्रांत भिक्षा वाढीत असतां, त्याच्या मुखाकडे प्रणयाभिलाषेनें पाहते.)

**वासवदत्ता :–** कोण आपण असे महाराज ?
सेवा द्यावी अपुली आज !

**उपगुप्त :–** वीतरागी मी बुद्धभिक्षू
वनीं वास मम असे संचार
निर्वाणाचा थोर उपासक
दूर लोटिला मोह-संसार !

( उपगुप्त भिक्षा घेऊन पुढें निघूं लागतो. वासवदत्ता त्याला थांबण्याची विनवणी करूं लागते. )

**वासवदत्ता :–** यतिवरा ! चला राजमंदिरा
प्रीती सेवा, घ्यावी पुरा
सख्या नतांगी तुमची दासी
तुम्हांवर जडली प्रीत कशी ?
प्राणप्रियकरा, चला दिलवरा
प्रीती गोडी घ्यावी जरा !

(वासवदत्तेंचे अमंगल वचन ऐकून उपगुप्त आपल्या दोन्ही कानांवर हात ठेवतो)

**उपगुप्त :–** देवी, मनास आवर जरा
नको त्रिटाळू तव देव्हारा
( वासवदत्ता मोठ्यानें हसूं लागते. )

**वासवदत्ता :–** तव प्रीतीच्या मदन शरानें
लज्जा हरली तारुण्यानें
तृप्त हो मी, विषय चिंतेनें
कंठीं घाला तव करभारा
कृतार्थ मज करा प्रियवरा !

**उपगुप्त :–** ( तिला धिक्कारून )
वासवदत्ते अवरोध मना
वासनेची ग मूढ कल्पना
फोल प्रमाथी तव वल्गना
कशास करशी प्रीतिवंचना ?
मोह असे गे अति अविचारी
ओठी लावी तो विष प्याला
विषयसुखानें मुक्ति कोणां–
सांग मिळाली, – सांग मला ?
शाश्वत सुखां लाथाडुनि गे
भंगुर देहा कां मोहशी ?
युगांतरीचे कीटक होऊनी
रौरवांत गे रुतून बसशी !

हा पिंड कसला ? – मांसल गोळे
शरीर कसले ? – अस्थि जाळें
सौंदर्य कसलें ? – विषमुळें
सारे कांही खुळेंच खुळें !

× × ×

तुझ्या मनींची ऐकुन तळमळ
दयिते ! वचन देतसे तुला
संकट समयीं घोर अचानक
येईन तुझिया मी भेटीला !

( तिला निरोप देऊन उपगुप्त निघून जातो. )

**वासवदत्ता :–** वासवदत्ता हो वनवासी
स्वनाथ हत्त्या लादे पाठीं
खरे बुडुनि खोटे तरति
दुनियेची ही रीत उफराटी
धुळींत लोळत पडे सुंदरी
यौवन गेले सुकली काया
दुःखाश्रूनें डोळे भिजले
उदासवाणें दिन जा वाया
दुःखांत सुखी मरण्यासाठीं
नित्य बोलवी निज मरणास
अति दुःखानें आणि कण्हता
हृदयांतरीं कोंडे श्वास !

**वासवदत्ता –** मरणा ! वाट तुझी पाहते !

( संगीतांतून करुणार्त स्वर हळुं हळूं मंद होत जातात. )

**उपगुप्त** :– हे बघ आलो पहा दयिते !
साथ सोबती चल संगती
निर्वाणाचा पथ सांगाती
पतित आयुचि करण्या मुक्ति !

बुद्धं सरणं गच्छामि ।
धम्मं सरणं गच्छामि ।
संघं सरणं गच्छामि ।

( तिच्या हाताला धरून उपगुप्त तिला नेऊं लागतो. संगीताचे गंभीर स्वर हलके हलके मंद होतांनाच पटक्षेप.)

***

## म र्दा नी झां शी वा ली

**कथासूत्र :**

भारतीय इतिहासांतल्या एका ज्वलंत घटनेला जन्म देणाऱ्या एका तेजस्वी तरुणीची ही कहाणी आहे. मोरोपंत तांब्यांची तेजस्वी कन्या मनुबाई व झांशी-धीश गंगाधररावांची वीर पत्नी लक्ष्मीबाई ही आपल्या पतिनिधनानंतर दामोदरपंताला दत्तक घेऊन राज्य-कारभार पाहूं लागली. पण दैवदुर्विलास ! इंग्रजांनीं दत्तकविधान नामंजूर करून झांशी संस्थान खालसा करण्याचा हुकुम काढला. ही गोष्ट राणीला असह्य होऊन तिनें १८५७ सालच्या बंडांत उडी घेतली आणि इंग्रजांच्या विरुद्ध बंड उभारून तिनें सतत दहा दिवसपर्यंत झांशीचा किल्ला लढ-विला. परंतु शेवटीं फितुरीनें इंग्रजांनीं किल्ला घेतला तेव्हां तेथून निसटून ती पुरुषी वेषांत काशीस येऊन पेशव्यांस मिळाली. पुढें इंग्रजांशीं निकरानें लढतां लढतां फितुरीमुळें व बंडवाल्यांच्या अव्यवस्थेमुळें पुष्कळ सैन्य मारलें गेलें, आणि इंग्रजांची फळी फोडून पळून जात असतां नेहमीचा आवडता घोडा नसल्यामुळें ही तेजस्वी तरुणी इंग्रजांच्या समशेर — गोळ्यांच्या फेरीला बळी पडून मातृ-भूमीच्या प्राणरक्षणाकारितां आपला देह तिनें धारातीर्थीं ठेवला !

***

पात्रें :

- झांशीवाली लक्ष्मीबाई
- दासी मंदार
- दामोदरपंत
- तात्या टोपे
- सर ह्यू रोज
- दरबारांतील इतर पात्रें, सैनिक इत्यादि

## पूर्वरंग :

भारतीय इतिहासाच्या एका ज्वलंत घटनेवर ही संगीतिका आधारलेली असून यांतून झांशीच्या मर्दानी लक्ष्मीबाईच्या तेजस्वी व्यक्तिमत्वाची शोकांतिका चित्रित केलेली आहे.

या संगीतिकेचे चार खंड पडतात. प्रथम खंडांतील प्रसंग झांशीच्या राजवाड्यांतील दामोदरपंतांच्या दत्तकारोहण समारंभानें घडतो. दुसरा प्रसंग राजवाड्यांतील चंडी देवीच्या मदिरांत घडतो. तिसरा प्रसंग किल्ल्याला इंग्रजांनीं घातलेल्या वेढ्यांत आणि चौथा जंगलांत घडतो.

पहिल्या खंडांतील प्रसंग दत्तक विधान समारंभाचा असल्यानें झांशीच्या राजैश्वर्याची रोषणाई महालांत उभी करावी. नृत्यांगना शृंगारलेल्या असाव्यात.

दुसरा प्रसंग चंडी देवीच्या मंदिरांतील आहे. मंदिराचा आभास चंडी देवीच्या मूर्तीनें करून, घंटा, शंख, नगारा इ० वाद्यांचा आवाज पार्श्वसंगीतांतून निर्माण करून प्रसंगाला उठाव आणावा.

तिसऱ्या प्रसंगांतील झांशी किल्ल्याला पडलेला गोऱ्यांचा वेढा आभासमय निर्माण करतां येईल किंवा नेपथ्यांतून तशा प्रकारची वातावरण निर्मिति करता आल्यास पहावें.

चवथा प्रसंग जंगलांत घडतो. लक्ष्मीबाईचा देह अग्नीला अर्पित केलेला आहे असा भास लाल छटेच्या अंधुक प्रकाश योजनेनें करता येईल.

दुसऱ्या प्रसंगांतील सर ह्यू रोज आणि झांशीवाली लक्ष्मीबाई यांच्यांत होणारें तरवारीचें द्वंद्वयुद्ध प्रत्यक्ष रंगमंचकावर सादर करून तेजस्वी पार्श्वभूमीला उठाव आणतां येईल.

तिसऱ्या प्रसंगांतील किल्ल्याला पडलेल्या इंग्रज सैन्याच्या वेढ्यांतील युद्धामध्यें तरवारींचा आवाज, 'हरहर महादेव' ची घोषणा, घोड्यांच्या टापांचा आवाज, बंदुकींचा आवाज व तोफांचा भडिमार इत्यादि युद्ध निर्मितीची योजना नेपथ्यांतून करतां येईल.

चौथा प्रसंग मात्र धीरगंभीर वातावरणाच्या पार्श्वभूमीवर उत्कटतेचा कळस ठरणारा व्हावा. तांबड्या जिलेटिन पेपराच्या कापलेल्या तुकड्यांच्या बाजूला विजेरी पंखा ठेवून हवेच्या झोतावर एकसारखे तुकडे अग्नीच्या झोता-प्रमाणें वर उफाळत असल्याचें दाखवून प्रत्यक्ष चिताग्नि पेटलेला आहे असा भास व्हावा.

प्रसंगानुकूल पार्श्वसंगीताची, प्रकाशाची, दरबारी थाटाची, युद्धाची, आनंद – दुःखाची आणि ऐतिहासिक प्रसंगाला साजेशा सर्व वातावरणाची निर्मिति व्हावी.

***

# मर्दानी झांशीवाली

**निवेदक** –: परसत्ता परवशतेचा । अंधार पातला असतां
धर्माशी करुनि बेमानी । उठली इंग्रजी सत्ता
हा काळ कठिण झाला
बंधूस बंधु दुःसरला
जगिं न्याय न कांही न उरला
हिंदभूस रक्षिण्यासाठीं । पाहिजे एकच नेता
अशा काळ–कठिण कालीं । मर्दानी झांशीवाली
इतिहासाचीं जीं पानें
लिहिलीं जीं हीं रुधिरानें
काळ गायिला जिचीं कवनें
साक्षात् प्रकटली काली । मर्दानी झांशीवाली
शत्रूंना कर्दनकाळ
शौर्याचा तेजोगोल
हिंदभूचा रत्न नील
भारतास भूषण झाली । मर्दानी झांशीवाली !

(**स्थळ** :– झांशीचा राजवाडा. राजवाड्यांत दामोदरपंताला दत्तक घेतल्याचें जाहीर करून राजमुगुट अर्पण करण्याचा समारंभ चाललेला असतो. दरबारांतील नृत्यांगना राजकुमारावर फुलें उधळून नृत्य करूं लागतात. नृत्याचा एक तुकडा . . )

**नृत्यांगना** :– भूवरीं रामराज्य आलें
अमर झांशीच्या जयजयकारें, नभमंडळ घुमलें
नभिं निनादती गंधर्व स्वर
आनंद उसळे भूलोकावर
घरोघरीं उत्साह भरोनी सुभाग्य उदया आलें

(नृत्याचा तुकडा संपल्यावर नृत्यांगना आलटून पालटून समारंभाचें वर्णन करूं लागतात.)

तिसऱ्या प्रसंगांतील झांशी किल्ल्याला पडलेला गोऱ्यांचा वेढा आभासमय निर्माण करतां येईल किंवा नेपथ्यांतून तशा प्रकारची वातावरण निर्मिति करता आल्यास पहावें.

चवथा प्रसंग जंगलांत घडतो. लक्ष्मीबाईचा देह अग्नीला अर्पित केलेला आहे असा भास लाल छटेच्या अंधुक प्रकाश योजनेनें करता येईल.

दुसऱ्या प्रसंगांतील सर ह्यू रोज आणि झांशीवाली लक्ष्मीबाई यांच्यांत होणारें तरवारीचें द्वंद्वयुद्ध प्रत्यक्ष रंगमंचकावर सादर करून तेजस्वी पार्श्वभूमीला उठाव आणतां येईल.

तिसऱ्या प्रसंगांतील किल्ल्याला पडलेल्या इंग्रज सैन्याच्या वेढ्यांतील युद्धामध्यें तरवारींचा आवाज, 'हरहर महादेव' ची घोषणा, घोड्यांच्या टापांचा आवाज, बंदुकींचा आवाज व तोफांचा भडिमार इत्यादि युद्ध निर्मितीची योजना नेपथ्यांतून करतां येईल.

चौथा प्रसंग मात्र धीरगंभीर वातावरणाच्या पार्श्वभूमीवर उत्कटतेचा कळस ठरणारा व्हावा. तांबड्या जिलेटिन पेपराच्या कापलेल्या तुकड्यांच्या बाजूला विजेरी पंखा ठेवून हवेच्या झोतावर एकसारखे तुकडे अग्नीच्या झोता-प्रमाणें वर उफाळत असल्याचें दाखवून प्रत्यक्ष चिताग्नि पेटलेला आहे असा भास व्हावा.

प्रसंगानुकूल पार्श्वसंगीताची, प्रकाशाची, दरबारी थाटाची, युद्धाची, आनंद – दुःखाची आणि ऐतिहासिक प्रसंगाला साजेशा सर्व वातावरणाची निर्मिति व्हावी.

★★★

**निवेदक –:** परसत्ता परवशतेचा । अंधार पातला असतां
धर्माशी करुनि बेमानी । उठली इंग्रजी सत्ता
हा काळ कठिण झाला
बंधूस बंधु दु:सरला
जगिं न्याय न कांही न उरला
हिंदभूस रक्षिण्यासाठीं । पाहिजे एकच नेता
अशा काळ–कठिण कालीं । मर्दानी झांशीवाली
इतिहासाचीं जीं पानें
लिहिलीं जीं हीं रुधिरानें
काळ गायिला जिचीं कवनें
साक्षात् प्रकटली काली । मर्दानी झांशीवाली
शत्रूंना कर्दनकाळ
शौर्याचा तेजोगोल
हिंदभूचा रत्न नील
भारतास भूषण झाली । मर्दानी झांशीवाली !

(**स्थळ :–** झांशीचा राजवाडा. राजवाड्यांत दामोदरपंताला दत्तक घेतल्याचें जाहीर करून राजमुगुट अर्पण करण्याचा समारंभ चाललेला असतो. दरबारांतील नृत्यांगना राजकुमारावर फुलें उधळून नृत्य करूं लागतात. नृत्याचा एक तुकडा . . )

**नृत्यांगना :–** भूवरीं रामराज्य आलें
अमर झांशीच्या जयजयकारें, नभमंडळ घुमलें
नभिं निनादती गंधर्व स्वर
आनंद उसळे भूलोकावर
घरोघरीं उत्साह भरोनी सुभाग्य उदया आलें

(नृत्याचा तुकडा संपल्यावर नृत्यांगना आलटून पालटून समारंभाचें वर्णन करूं लागतात.)

**१ ली नृत्यांगना :** झांशीचें सोभाग्य ठेविण्या निष्कलंकित
राज्यलक्ष्मीच्या कुशींत बसला दामोदरपंत

**२ री नृत्यांगना :** प्रासादीं चालला नृपाचा मोठा अभिषेक
दाखविण्या झांशी जगाला स्वतंत्र आणिक

**३ री नृत्यांगना :** स्मरुनि पूर्वजांचें पुण्य, भाग्य थोर
झाली राणी अंतरीं सद्भावें साकार

**४ थी नृत्यांगना :** तख्तावरी बैसले बाळ चिमणाराजे
सनई – चौघडा अंत:पुरीं वाजे

(राजेश्वरभटजी राजमुगुट दामोदरपंताच्या शिरावर घालू लागणार तोंच इंग्रज सेनापती एलिस येऊन मुगुट घालण्यास मनाई करतो.)

**एलिस :–** ठेरो... " अनौरस पुत्रा मनाई केली
खालसा झांशी आम्हीं केली । "

**राणी लक्ष्मी :–** एकदम उफाळून पुढें येऊन ..
" मेरी झांशी मैं नहीं दूंगी । "
परक्यांची सत्ता न साहणार
प्रिय झांशी मी कधीं न देणार
करूनि छातीचे मी फत्तर
झेलिन त्यावरी संगीन वार
प्राणाहुनी जी झांशी प्यार
चालते व्हा तुम्ही साजुक चोर
रिपु – रक्तानें शरिरें लाल
फोडीन नभींचा हा ग्रहगोल
कोणहि मजला प्रतिरोधेल ?
अंगार होउनि रणीं संचार

देशाची जी ऐकुनी हांक
बंडांत घुसें मी निर्धोक
करितां मदांध सत्ता खाक
रणचंडीचा बाहूंस जोर

(दरबारांतील आपल्या सरदारांना कंबरेंतील तलवार उपसून आवेशानें संदेश देते.)

रणीं अर्पा जीवाचा ठेवा
जरि काळानें घातला घावा
परि जागा तुमच्या सद्भावा
स्वाभिमानाची शपथ घेउनि–
उपसा ही तलवार
जय महाकाली ।

**सर्वजण :–** जय महाकाली । जय महाकाली ।

(सर्वजण तलवारी वर उगारून काली मातेची गर्जना करतात.)

●

## ( प्रवेश दुसरा )

(इंग्रज सैन्य झांशीच्या राजवाड्याभोवती कडेकोट बंदोबस्त ठेऊन वेढा घालतात.)

**निवेदक :–** गोऱ्यांचा राणीशी तेढा
झांशीला चौवाजुनी वेढा ।।
माणुसकी लोटूनी दूर
अबलेप्रति करण्या संगर
तटाभोवती गोऱ्यांचा वेढा । हो जी जी ।।

(**स्थळ :** राजमहालांतील चंडी देवीचें मंदिर. राणी हातांत नंगी समशेर घेऊन प्रवेश करते आणि चंडीसमोर समशेर ठेवून शपथ वाहते. )

**राणी लक्ष्मी :–** कुलदेवते ! शपथ तुला देतें
सौभाग्यस्तव प्राण तुला अर्पितें
अपहारी नृप – या सत्तेनें
ग्रासाया धरणी क्रौर्यानें
आणली आपदा या काळानें
समशेरींनीं जी धरणी चळचळते
रक्ताचा जरि रिपूस चटका
रणीं आगीचा उठवित भडका
ग्रहगोलांना देईन धडका
अंगीं नभीची बिजली लखलखते
धरेस चढतां तांबुस लाली
अर्पिन मी रिपु – रुंडावळी
यश देईन मी शौर्यशाली
हलकल्लोळहि तोफांचे गगनां भिडती

(राणी तरवारी आपल्या उजव्या हाताचा आंगठा कापून रक्ताचें कुंकुम देवीच्या मस्तकास लावते. आणि ..

जय महाकाली ! जय महाकाली ! !
समशेरीला मम चढली लाली
घेतां सतीचें तू जरि वाण
नयनीं आला माझा प्राण
स्वाभिमानाची राखिन मान
बाहुंत चंडी अति संचरली !

(राणी तरवार उगारते. आणि इतक्यांत राणीची प्रिय दासी – मंदार धावत येऊन झांशी ताब्यांत घेण्याकरितां ' सर ह्यू रोज ' येत असल्याचा निरोप भयभीत अवस्थेंत देते.)

ठा... स्थळ...
बि: ..................

**निवेदक :–** तल्वारीच्या धारेला चढतां धार
अवचित पातला काळ अनिवार
झाली वेगे ही मंदार
भयभयीत झाली मनांत फार
तोंडचें पाणी पळालें दूर
शौर्याची जी मूर्ती धावली !

(राणी आपल्या आवेशांतच गुंग असते. मंदार राणीला हलवून 'ह्यू रोज' आल्याची जाणीव देते. पण तितक्यांत ह्यू रोज प्रवेश करतो, व राणीशीं द्वंद्वयुद्ध करतो.)

**निवेदक :** येउनी ठेपे अचानक काळ
अंगीचें सामाउनी बळ
होउं लागले संगीन वार
दोघे छातीचे रणवीर
समशेरीची हौस फार
चमके बिजली, संगीनधार
कुळवंताची कन्या नार
पेटतां तयिं जणूं अंगार
तळपे बिजली ही घनघोर
जखमा योद्धयांच्या अंगावर

(सर ह्यू रोजला चकवून राणी निघून जाते. नंतर जमिनीवर पडलेला ह्यू रोज उठतो.)

उठे ह्यू रोज टाकित धापा
अबलेपुढे ठरे शेळपा
अधर चावितो, टाकी धापा
हाडे देहाची झाली खिळखिळी फार

(सर ह्यू रोज निघून गेल्यानंतर तात्या टोपे हातांत नंगी समशेर घेऊन प्रवेश करतो.)

सैन्य घेउनी वीस हजार
तात्या टोपे ये सरदार
नांवाचा तो टोपीवाला
टोपीवाल्यांना जेरीस आणिला
गोऱ्यांचा तो काळच ठरला
भिडविले रिपु गगनां पार

(मंदारला पाहून राणीसाहेब कोठें गेल्या आहेत याची चौकशी करूं लागतो.)

येउनी पुसतो मंदाराला
गेली कुठें ती लक्ष्मी बाला
देई झटका निज बाहुला
राणी प्रती मुजरा शतवार

**मंदार :-** हयू रोजाला करुनि घायाळ
शत्रूफळीहि फोडुनी गोल
गेली उठवोनी रणकल्लोळ
होउनी घोड्यावरी स्वार
धुंद घोड्यास मारिली टाप

अन् शत्रूवर घेउनी झेंप
लोट धुळीचे उठवून अमाप
फोडुनी शत्रुफळी पार

वळवुनी तल्वारीची मूठ
शत्रूस देउनी शहकोट
घोड्यास पळविली जी नेट
शौर्य – मूर्तिबिजली घार !

(मंदारचे बाहु प्रस्फुरलेले पाहतांच तात्या टोपे यालाहि आवेश चढतो व दोघेहि एकदम उफाळून ... जय महाकाली ' गर्जना करतात.)

## (प्रवेश तिसरा)

(**स्थळ** : झांशीचा किल्ला. तटाभोंवती इंग्रज सैन्यानें वेढा घालून बंदोबस्त ठेवला आहे. किल्ल्यावरून तोफांचा आवाज घुमूं लागला आहे.)

**निवेदक :–**

डागली ' घनगर्जत ' महा तोफ
' कडक बिजली ' चा जाहला कोप
' शंकरा'तुनी धूर ये खूप
अति त्वेषानें लढली राणीं। झांशीवाली मर्दानी
धुमधडाक अग्नि वर्षाव
जय मरण तिला ठाव
गोऱ्यांच्या वर्मीं घाव
गगन भेदिले या तोफांनी। झांशीवाली मर्दानी
काळानेंही फितुरी केली
राणीस झाला फितुर अली
किल्ल्याची कळ दुष्टां दाविली
हा: हा: कार उठे समरांगणी। झांशीवाली मर्दानी
सैन्य येउनी सैन्या भिडले
तल्वारीस तल्वार बोले
घोर गर्जना एकच झाले
समरीं चमकली सौदामिनी। झांशीवाली मर्दानी
परि. . . .
दु:ख वार्ता आली कानीं
पडे काल्पीच्या समरांगणीं
गेला साऱ्यांचा धीर खचुनी। झांशीवाली मर्दानी

(सैन्य असंख्य मारले गेल्यानें राणी, मंदार व कांही विश्वासू सरदारांना सोबत घेऊन तटावरून घोडा उधळून जाते.)

(प्रवेश चौथा)

**निवेदक :** वेगें उडाला वाऱ्यावरती घोडा
फोडुनी गोऱ्यांचा वेढा
घालुनी घोड्यावरी जी झेप
मारिली तयावरी जी थाप
वाजती पायांचे जे टाप
घालुनी रक्ताचा सडा.
राणी धावतां वायु वेगें
तोफांचे जे मोर्चे मागे
रक्ताची ना प्यास भागे
धरणीला पडल्या घोर तडा.
बांधिलें पुत्रा पाठीवरती
जयि वत्सलता स्फुंदत होती
अन् भीतीला जागा नव्हती
वाऱ्यावर उधळिला जो घोडा

(राणीचा पाठलाग करीत जातांना गोळ्यांच्या फैरींतून एक गो मंदारच्या पाठींत घुसते, व तीं 'जय महाकाली' 'राणी साहेबां विजय असो' अशा वीर गर्जना करीत खालीं कोसळते.)

हुजर्स ब्रोकर लागे मागे
गोळ्या फैरी झाडित वेगें
दगावली मंदार सुंदरी
जातां समरांतुनी वेगें

होतां जीवाचा कळवळा
राणीचा मग धीर सुटला
शोकाला मग अन्त नुरला
त्वेषानें पाजळे सुरी
धावता वाटें लागे ओढा
कळे राणीला दैव क्रीडा
तोंच अचानक सुटली फैरी
विस्कटे मुखावरील केस
गांठ दिली परि पदरास
अखेरचा घेउनी निश्वास
प्रेतांची आरास भूवरी
तोंच अचानक दुसरी गोळी
छातींत येउनि पार घुसली
नेत्रीं किरची हूण बसली
परि शौर्याची ज्योत विझली

(राणीच्या शवाला अग्निदान देण्याचा प्रसंग. वातावरण अत्यंत गंभीर. नेपथ्यांतून अगदी हलक्या शब्दांनीं हळूहळू आवाज मोठा होत जातो.)

**निवेदक :** स्वातंत्र्याची ज्योत विझली
अन् दिशांना घनता आली
स्वातंत्र्याची जागृत ज्योत
अंधकारीं तेवते सतत

परि खलकाळानें ती विझविली
आज पोरकी झांशी झाली
साऱ्यांची ही माता गेली
दीन धरणी कोण तिला वाली ?

( पार्श्वसंगीत खंडांतून करुण स्वर उच्चतर होत असतांनाच पटक्षेप. )

***

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६३१०
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# क च - दे व या नी

**कथासूत्र :**

बृहस्पतीचा पुत्र कच हा संजीवनी विद्या प्राप्त करण्यासाठीं म्हणून दैत्यगुरु शुक्राचार्य यांचेकडे गेला असतां त्यांचे अंगीं असलेल्या शील-सौंदर्य मनोनिग्रहाचरण पाहून गुरुकन्या देवयानी ही त्याच्यावर अनुरक्त झाली.

देवगुरु बृहस्पतीचा पुत्र कच हा संजीवनी संपादनार्थ आपल्या आचार्यांसमीप येऊन राहिला आहे, असें दैत्यास वाटून त्यांनीं त्याचा अनेक मार्गांनीं नाश करण्याचें ठरविलें. एकदां कच वनांत गेला असतां त्याच्या शरिराचे तुकडे करून, ते जाळून आणि सुरेच्या पेल्यांत ती राख मिसळून तोच पेला शुक्राचार्यास पिण्याकरितां दिला. देवयानीच्या आग्रहामुळें संजीवनी मंत्राच्या सहाय्यानें कच हा आपल्या उदरांत असल्याचें शुक्राचार्यांनीं सांगितल्यावर देवयानीला अत्यंत आनंद झाला. कचाला जिवंत करण्यासाठीं तिनें आपल्या पित्याकडे हट्ट धरला असतां ‘ तुला कच हवा असेल तर माझा वध झाला पाहिजे, अगर मी पाहिजे असेन तर उदरगत कच बाहेर येणें अशक्यच.’ ‘ तुम्ही दोघेहि मला प्रिय आहां ’ असें देवयानीनें सांगित-

तल्यावरून शुक्राचार्यांनें संजीवनी मंत्राच्या सहाय्यानें कचास उदराबाहेर काढून जिवंत केलें.

कच बाहेर आल्यानंतर देवयानीनें त्याच्याकडे पाणिग्रहणाची मागणी केली असतां 'तूं गुरुकन्या, अर्थात् तूं माझी भगिनी झालीस म्हणून मला तुझें पाणिग्रहण करतां येणार नाहीं,' असें कचानें सांगितल्यामुळें देवयानी त्याच्यावर चिडली व आपल्या प्रेमाचा त्यानें अपमान केला म्हणून तिनें त्याला 'ज्या संजीवनीच्या प्राप्तीकरितां तूं आला आहेस त्या विद्येचा तुला उपयोग होणार नाहीं' असा शाप दिला !

आणि....

★★★

**पात्रें :**

- कच
- देवयानी
- महर्षि शुक्राचार्य

# पूर्वरंग :

या संगीतिकेची निर्मिति महाभारतकालीन घटनेवर आधारून केलेली आहे. यांतील सर्व प्रसंग महर्षि शुक्राचार्यांच्या आश्रमांतच घडतात. रंगमंचकावर आश्रमाची उभारणी शक्यतों सर्व गोष्टींनीं पूर्ण करतां आली तर आश्रमाचा नैसर्गिक देखावा निर्माण करतां येईल. प्रसन्न वातावरण, आश्रमीय छात्रांचे अधून मधून होणारे वेद-मंत्रांचे स्वर, इ० नेपथ्यांतून दाखवितां येतील.

पहिल्या प्रसंगांत देवयानी ही कचाची मार्गप्रतीक्षा करत आहे. – वातावरण थोडेसें धीर गंभीर असल्याचा आभास निर्माण करून पार्श्वसंगीतांतून करुण स्वरांची योजना पार्श्व-भूमिकेसाठीं करावी.

दुसऱ्या प्रसंगांतील शुक्राचार्यांचें आपली कन्या व शिष्यावरील प्रेम, त्यांनीं केलेली अनुरागात्मक मागणी, कचाचा घात झाल्यानंतर देवयानीनें केलेला आकांत, त्यामुळें वात्सल्य-प्रेमांतून शुक्राचार्यांनें निर्माण केलेली 'पिता कीं प्रियकर!' ही समस्या व त्यामुळें भांबावलेल्या देवयानीची दोलायमान मनोवस्था! तिसऱ्या प्रसंगांतील कचानें दाखवलेली प्रीति-प्रतारणा....इत्यादि सूक्ष्म छटा कुशलतेनें टिपतां आल्यास प्रसंगाची वस्तुनिष्ठ उभारणी करतां येईल.

कच-देवयानीचा पोशाख आश्रम-छात्रवासीसारखा करतां येईल, तर शुक्राचार्यांचा पोषाख एकाद्या महर्षीला शोभेल असा.

प्रसंगानुकूल पार्श्वसंगीताच्या करुणरम्य, प्रेमपूरक, शांत, सोज्ज्वळ आणि आनंदी स्वरांचा उपयोग करतां यावा. पार्श्वसंगीताकरितां सर्व वाद्यें देशीं वापरावींत. प्रकाश-योजनेचा प्रसंगानुकूल वापर केल्यास बरें!

दि: ......
नोंद दि: ......

## कच देवयानी

**निवेदक :–** ऐका ही कहाणी
कच प्रीतिस्तव तळमळे देवयानी.
गुरु कन्येची बसली प्रीति
सकलगुणी सुत कचावरती
सखी गुणगुणते नीरव प्रीति–गाणी
सदैव हृदयीं केलें पूजन
प्रिय नामाचें केलें कूजन
प्रीतीनें नयनीं आणुनी पाणी.
आतुर नयनीं ; आसू झरणी
आंस मनीची अधिर मीलनीं
प्रीतीची जी उत्कटता विराणी.

(**प्रसंग :–** शुक्राचार्यांच्या आश्रमांतील अंगणांत दुःख–व्यथेनें कचाची मार्ग-प्रतीक्षा करीत देवयानी उभी आहे. वातावरणांत गंभीरता पसरलेली असून पार्श्वसंगीत खंडांतून करुण स्वरांचे पडसाद वातावरणाला अधिकच उठाव आणत आहेत.)

**देवयानी :–** तुला न कळलें, मी तळमळलें
तधीं मनानें तुलाच वरलें !
कुचकुचे नयन सलज्ज पातें
आतुर मनास कळतां नातें
मन पांखरूं मम गाई गीतें
जुळतां नातें कां मन अडलें ?
तुझियासाठीं उगीच झुरतें
हृदीं येते प्रीति भरतें
मधुस्वप्नींहि तुला पाहतें
तव नामें मम जीवन भरलें !

तुझिया लक्ष्यीं अदय विरहिणी
कितिक लोटल्या दिवा यामिनी
थरथरणाऱ्या अधरांमधुनी
आर्त गीत अंतरिं उमटलें !
वाटेवरती नयन लागतां
नयनां स्वप्निल ये गहनता
करुण जोगिया आणिक गातां
स्वर मनीचे मम अवघडले !

(वनांतून लगबगीनें कच आश्रमांत प्रवेश करतो. त्याला पाहून देवयानी हारोहारीं फुलते.)

**देवयानी :-** प्रियकरा ! मम स्वप्न मोहरलें
तुला पाहतां भान कसें हरलें !

**कच :-** गुरुकन्यके ! व्यर्थ मनीं झुरशी
प्राणफुलांना कां ग कुस्करशी ?
कां जाळशी यौवन मजस्तव ;
अभिसाराचें वचन कशास्तव ?
मिळे चांदणें कां गे चकोराशी ?
घालुनी झेंप दीपावरती
पतंग होळी जीवें करती
विफल आंस कां लावते उराशीं ?

**देवयानी :-** पतंगाची प्रीत दीपा तू विचारी
प्राण देऊनी कां मुक्त हो अंतरीं ?
भ्रमरा विचार प्रीतीचें नातें कमळिणीशीं !

(आश्रमांत शुक्राचार्य प्रवेश करतात. दोघेहि क्षणभर भीतीनें दबून जातात.

**कच :-** (शुक्राचार्याला लवून प्रणिपात करून ! ...)
प्रणाम गुरुजी ! आशीर्वाद मज द्यावे
मनाची वृथा तळमळ आणि हरावे !

**देवयानी :-** ( वंदन करून . . )
वंदन पिताजी ! वचन मजला द्यावें
इच्छित करण्या अनुसरावें !

**शुक्राचार्य :-** (प्रेमानें हंसत हंसत दोघांनाहि कुरवाळतात.)
दोघे लबाड, तुम्हां घेतलें जाणून
( स्मरण करून . . )
हा, कचा ! आणली का कंदमुळें वेचून ?

**कच :-** ( वंदन करून आणि 'आज्ञा गुरुजी ! ' म्हणून कच निघून जातो. शुक्राचार्य चिंतन करीत बसतात. देवयानी त्यांच्या पूजेचें साहित्य लावीत असते. पण तिचें मन भयकंपित झालेलें असतें.)

**निवेदक :-** कचा वधाया वनिं टपलेलें
देवांचे अरि जे दैत्यसूत
ठार करोनी राख मिसळली
तयाची मद्याच्या प्यालेंत
सुरारिनें ज्या कचा वधोनि
घात पुरा जो त्यांनीं केला
संजीवनींचें मूळ उपटण्या
दिलें आणुनी मद्य गुरूला

(करुण संगीत खंडाचे आर्त स्वर अधिकच करुण होतात.)

**देवयानी :-** कच हा बाबा, केव्हांचा गेला
नाहीं कसा तो अजुनि परतला ?
मंत्र बळानें त्यास बोलवा
आतुरें जीव मम व्याकुळला !

(शुक्राचार्य ध्यान लावतात आणि एकदम मोठ्यानें ओरडतात)

**शुक्राचार्य :-** मम बाळे, घात पुरा झाला
दैत्यानें डाव पुरा साधिला
तया वधोनी चिता मदीरा
दिला प्राशण्या मज पुरा पुरा !

(देवयानी दुःखानें 'बाबा काय हें घडलें' असें ओरडते. करुण संगीताचे स्वर उच्चतर उमटतात.)

**शुक्राचार्य :-** बोल बालिके ! तुज काय हवें ?
पिता हवा कां कचप्रीत हवें !

**देवयानी :-** मज तुम्ही हवे, कचप्रीत हवें !
प्रियकर मजला आणुनि द्यावे

**शुक्राचार्य :-** मंत्रें कचाचा आणितों प्राण
तुजस्तव पोरी, करि जीव–दान

(शुक्राचार्य आपली ध्यान समाधी लावतात व कचाला हाक मारतात, तेव्हां कच 'देवयानी, देवयानी' म्हणत धांवत येतो, देवयानी अत्यानंदानें पुलकित होते.)

**देवयानी :-** मना आनंद किती वाटे
आकाश वाटतें थिटें थिटें !
प्राणप्रियकर परत मिळाला
प्रीति ज्योतिचा होय उजाळा
मनींचे गळति बोथट काटे

(प्रेमभरानें देवयानी कचाच्या गळ्याला मिठी मारायला जाते, तोंच कच तिला झिडकारून दूर सारतो.)

**कच :-** काय हे, काय हे, ताई तूं
करी अशी मूढ वाचालता ?
बंधु झालों मी पहा गे, तव
पित्याच्या उदरांतून जन्मतां.

**देवयानी :-** (क्रोधानें शाप देते ..)
अघोर अधमा ! मम प्रीतीचा
घात पुरा असा कसा केला ?
ज्या मंत्रास्तव येथें आला
विसरशील तूं त्या मंत्राला !
जा दूर निघुनी .... जा दूर निघुनी

(गंभीर वातावरणाच्या पार्श्वभूमीवर संगीताचे गंभीर स्वर मनाला भारावून टाकीत असतानांच पटक्षेप.)

★★★

राघव दर्शन

## कथासूत्र :

अयोध्या नगरीच्या दशरथ राजाला यज्ञदेवानें दिलेल्या वरप्रसादामुळें राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न अशीं चार पुत्ररत्नें प्राप्त झालीं. महर्षि वसिष्ठांच्या तालमींत तयार झालेले हे शिष्य मोठे तेजस्वी आणि पराक्रमी निघाले. वसिष्ठांसमवेत जनकाच्या मिथिला नगरीस येत असतां वाटेंत गौतमाच्या आश्रमांत अहिल्येचा उद्धार होतो. धनुर्भंग करून सीतेला राम वरतो. पुढें अयोध्येंत रामराज्याभिषेकाची तयारी होत असतांनाच मंथरेच्या कानमंत्रानें कैकयी आकांत मांडून 'रामाला चवदा वर्षें वनवास आणि भरताला राज्याभिषेक' असा दशरथाकडून वर मागून घेते. राम, लक्ष्मण आणि सीता वनवासाला निघतात. वाटेंत त्यांना शबरी भेटते. पंचवटीच्या आश्रमांत असतां कांचनमृगाच्या सहाय्यानें रावण सीतेचें हरण करतो. पुढें सुग्रीव, हनुमान व वानर सेनेची भेट होऊन मैत्री जमते. वानर सेनेच्या सहाय्यानें समुद्र पार करून राम रावणाशीं युद्ध खेळतो, आणि युद्धांत रावणाचा वध करून रावणाच्या

कैदेंत असलेल्या सीतेची सुटका करतो आणि सर्वजण अयोध्या नगरीकडे प्रस्थान ठेवतात, पुढें अयोध्या नगरींत मोठा आनंदोत्सव साजरा होतो.

★★★

पात्रें :

- अहिल्या
- तीन मैत्रिणी
- पांच नर्तिका
- मंथरा
- कैकयी
- कौशल्या
- जानकी
- भरत
- राघव
- लक्ष्मण
- शबरी

## पूर्वरंग !

ही संगीतिका रामायणकालीन असून प्रभु रामचंद्रांच्या रोमहर्षक जीवनांतील अनेक घटनांवर आधारलेली आहे. रामायणांतील 'मा निषाद...' या वाल्मीकि उक्तीपासून ते युद्धकालापर्यंतच्या सर्व वैशिष्टचपूर्ण व उत्कट प्रसंगांचें दर्शन या संगीतिकेंतून सादर केलेलें आहे.

या संगीतिकेचे सर्वसाधारणपणें दहा खंड पडतात. पहिला अहिल्योद्धाराचा, दुसरा मिथिला नगरींतील धनुर्भंग आणि सीता-स्वयंवराचा, तिसरा अयोध्या नगरींतील रामाच्या राज्याभिषेकाचा, चौथा कैकयी महालांतील मंथरेचा कानमंत्र, वरमागणी, रामप्रवेश, कौशल्यामातेचा प्रलाप, राम–लक्ष्मण–सीता वनवासागमन, भरत प्रवेश इत्यादि प्रसंगांचा. पांचवा वनवासांतील जंगल, रामाला घेऊन जाण्याकरितां आलेला भरत, पादुकादान. सहावा पंचवटी आश्रम, कांचनमृग, सीता-हरण, राम-शोक, घायाळ जटायू भेट. सातवा मातंग ऋषींच्या आश्रमांतील शबरीचा. आठवा जंगलांतील सुग्रीव, वानरसेना, अशोक वनांतील सीताभेट, मुद्रिका दर्शन, लंकेची जाळपोळ. नववा रामरावण युद्ध आणि दहावा अयोध्यागमन आणि आनंदोत्सव...

एका प्रसंगांतून दुसऱ्या प्रसंगाची सहजतेनें निर्मिति करतांना निवेदकाच्या निवेदनाचा दुवा जोडलेला आहेच. त्याचा कुशलतेनें उपयोग करावा.

या संगीतिकेंतील सर्वच प्रसंग रामायणकालीन पार्श्वभूमीवर घडत असल्यानें तत्कालीन घटनांचा विसर पडूं देतां कामा नये. त्याचप्रमाणें सर्व पात्रांची वेषभूषा, केशभूषा आणि इतर साधनसामुग्रींचा पुरवठा तत्कालीन परिस्थितीच्या पार्श्वभूमीवरच व्हावा.

प्रसंगानुकूल पार्श्वसंगीत संगीत-वाद्य, प्रकाश योजना इ०ची योजना करावी.

एकंदरींत या संगीतिकेंतील सर्वच प्रसंग उत्कट आणि मनो-वेधक झाल्यास संगीतिकेची परिणामकारता वाढेल.

★★★

# राघवदर्शन

**निवेदक :-**

'मा निषाद प्रतिष्ठां समगमः।
यत्क्रौंच मिथुनादं मधवी काममोहितम्॥'

× × ×

रामनामें तारूं तरलें, अटलें अब्धीचें पाणी
नामोच्चारें वाल्या झाला शुचित वाल्मीक मुनि
रामनामें विश्व व्यापिलें, धरणी हो पावन
आद्य ऋषीचें आद्य काव्य 'महाकाव्य रामायण'
रघुकुलवंशीं दशरथ राजा राज्य करी वैभवें
परि ना मिळे शांति तयाशीं, पुत्र एकला हवे
तशाच झुरती अंतरीं त्याच्या दुःखी हो अंगना
निपुत्र वंशीं सुख तें कैसें मिळेल त्यांच्या मना
पुत्रप्राप्तितें पुत्रकामेष्टि यज्ञ आरंभी राजा
गुणिजन, मुनिवर, पाचारुनि तो प्रसन्न केली प्रजा
प्रसन्न झाला अग्निदेव तो नृपास देऊनी वर
आनंदी आनंद जाहला चोंहिकडे सत्वर
अवतरला श्रीरामप्रभु परब्रह्म मूर्ति साकार
धर्म रक्षिण्या अन् असुरांचा करण्याला संहार !

× × ×

पुत्र जन्मला हृषिकेपी, कौशल्येच्या कुशीं
दशरथनंदना ! कुलभूषणा निज रघुवंशीं शशी
राज्यगृहींचा सौख्यपर्व तो, दुदुंभि धुंद कोंदला
नृत्यगायनीं नगर गमे, मेदिनी-शेष डोलला
यज्ञ रक्षिण्या मायावी रात्रिचरा पासुनी
निघाले विश्वामित्रासह सोबती वनीं
तोंच प्रगटली यक्षिणी त्राटिका दर्शनीं
लाविला शरधनु, काढिले, तिज छेदुनी

मुनिवर विजयकुमार येतां अहिल्याश्रमा
पदस्पर्शें पावन झाली पतिता अहिल्यारमा !

(अहिल्याश्रमांत श्रीराम, सीता, लक्ष्मण आणि विश्वामित्र इत्यादि मंडळी प्रवेश करतात. श्रीरामाच्या पावन पदस्पर्शानें पतित झालेली अहिल्या ही पाषाणांतून पूर्ववत् उठून पुनीत होते, आणि रामाप्रति आपले हात जोडून प्रार्थना करते.)

**अहिल्या :-** सुभाग्य माझें आलें फळाला, चरण तुझे लागले माथां।
रामा तुझिया पदस्पर्शानें, शापमुक्त जहाले रामा ॥
लुटिलें इंद्रें पतिव्रता धन
केलें कलंकित पवित्र हें तन
पडलें कंठीं सर्प-वेष्टन
जिवा पलिकडे सती म्हणुनिया, ज्या ऋषीनें जपियलें.
कडकडले जे शाप बोल
शिलामूर्तिसम झाले निश्चल
हृदय भंगुनी झालें हतबल
चरण धूळीचें कुंकुम माझ्या भाळीं हो लागलें.
तुझ्या कृपेची अमोघ शक्ति
देहा मम ये पुनरपि आकृति
मुक्त होऊनि श्वास चुंबिती
पतित पावन राघव चरणीं मस्तक मी वाहिलें.
अद्वैताची अचपळ लीला
आली पाषाणां देवकळा
पावन केलें तू घननीळा
युगायुगाची संजीवनी मज रामा तव लाभले.
श्रीरामा तुज नयनीं पाहीन
अनंत मरणें संतत साहीन
जीवित अवघें तुजवरी वाहीन
करुनि जिव्हेचा वेद सतत मी, राममंत्र जपिले !

(अहिल्येच्या पाठीवरून प्रेमानें हात फिरवून व तिला शुभाशीर्वाद देऊन श्रीरामचंद्रप्रभु निघतात.)

**निवेदक :-** पतित पावन रघुराया निघाले पहाया, जनकाची मिथिला
नगराधिपतीनें नगरामाजीं यज्ञ नवा मांडिला.

(वातावरणांत मंगलसूचक वाद्यांची फैरी झडूं लागलेली असते. चोहोंकडे आनंदोत्सव साजरा होत असलेला पाहायला मिळते. मिथिला नगरींतील जनकाच्या राजदरबारांत राजे-रजवाडे व लोक आसनस्थ झालेले असून जनक राजसिंहासनावर बसलेला आहे. त्याच्याजवळच सीता ही हातांत स्वयंवर-माला घेऊन उभी असून श्रीराम धनुष्याला दोरी बांधण्याकरितां धनुष्य उचलीत आहे.)

**निवेदक :-** श्रीराघव रामप्रभूनीं धनु करीं सहजचि जणूं धरिलें
बळ सारें एकवटुनी प्रभुनें धनुर्भग केलें
रूप मनोहर श्रीरामाचें
भाग्य सांवळे जें दुहितेचें
फलसिद्धि हेतु अंतरिचे
तडिताघातापरी दशदिशीं नाद जयाचे घुमले.
सभामंडपें मुग्ध जहाले
जनकानंदें डोळे मिटले
पाहुनि अपुलें भाग्य थोरलें
मैथिलिकन्या तयां अर्पितां मुनिवर मनिं मोदले.
हलके उठली मुग्ध बालिका
अधिर चालली जनककन्यका
धरुनि करीं निज पुष्पमालिका
नृपकंठीं माळ पडतां गगनीं गंधर्व-स्वर घुमले !

(पार्श्वसंगीतावर मंगल संगीत खंड. सीतेच्या महालामध्यें तिच्या सखी तिचें मनोरंजन करूं लागतात.)

क्रमांक ..१५८७........ नोंद दि. ........

**१ ली मैत्रीण :–** घालुनि कंठीं कर तव सीते, घे आतां विश्राम
शाम-सांवळा धनु भंगिला, तुझाच ग श्रीराम
जानकी तुझाच ग श्रीराम
विश्वाची तूं मंगल माता
राघववेडी तूं जनकसुता
धन्य जयानें केली पतिता
जिंकुनि 'पण' तव लावियला गे रघुकुल कीर्ति-ललाम
जानकी तुझाच ग श्रीराम

**२ री मैत्रीण :–** वाजती रुणझुण पायीं पैंजण
किणकिण किणतां हातीं कंकण
रंजित नयनीं घालुनी अंजन, घे आतां विश्राम
जानकी तुझाच ग श्रीराम

**३ री मैत्रीण :–** चार करांचा विळखा कोमल
पडतां कंठीं नयन विलोल
चमके हृदयीं भाव स्नेहल
अवधपुरीचे दीप उजळल्या चल सोडुनि तूं धाम
जानकी तुझाच ग श्रीराम

× × ×

(अयोध्येंत श्रीरामाच्या राज्याभिषेकाची जोरांत चालली तयारी आहे. नगरवासी आनंदांत बुडून गेलेले असून चोहोंकडे हर्ष पसरून राहिला आहे. मंगलवाद्यें वाजूं लागलीं आहेत. राजनर्तिका फुलें उधळीत नृत्य करीत आहेत.)

**१ ली नर्तिका :–** मोद भरे जय नाद विरे, आनंद पसरला चोहिकडे
आज अयोध्या नगरीं झडती, पहा हर्षाचे चौघडे
रघुराय होतील अयोध्यापती
सकल मुनि–स्वजनांना हर्ष किती !

**सर्वजणी :–** मोद भरे . . . . . हर्षाचे चौघडे

**२ री नर्तिका :–** सिंहासनीं श्रीराघव वसतां
वामांगी ती वसेल सीता

**सर्वजणी :–** मोदभरें ..... हर्षाचे चौघडे

**३ री नर्तिका :–** सप्तस्वर्ग तो लवुनी खाली
धरुनि चालला छत्र सावली

**सर्वजणी :–** मोदभरें .... . हर्षाचे चौघडे

**४ थी नर्तिका :** पावन झाली धरणी माता रघुनंदन फुलले
सप्तसुरांच्या सारिपटावर विश्वप्राण उमले

**सर्वजणी :–** मोदभरें .... हर्षाचे चौघडे

**५ वी नर्तिका :** चैत्रमासीं पुष्य नक्षत्रें होईल राघवा अभिषेक
सकल अयोध्यावासी जनांना झाला हर्ष किती अगतिक

**सर्वजणी :–** मोदभरें ...... हर्षाचे चौघडे

× × ×

(कैकयीच्या महालामध्यें कैकयीची दासी – मंथरा तिचे कान भरवून तिला उपदेश करूं लागलेली आहे. )

**मंथरा :–** सखे कैकयी निजात्म्या तूं जाग
होई उद्यां नृप कौशल्यासुत राम !

**कैकयी :–** काय वदसी आज अमंगळ तूंतें
राम दुजा कां भरता माते !

**मंथरा :–** हे ऽऽ ! ग दुधखुळे .
कौशल्या ही राजमाता, दासीपण तुजला
कोण पुसतो मग तुझ्या त्या रामानुज भरताला ?

**निवेदक :–** आनंदाचा अघटित पर्व अंधःकारीं क्षणीं बुडला
कली होऊनी हंसे काळ जो कैकयींत तो जणुं भिनला
अश्वपतीची कन्या झाली, सातजन्मीची वैरिणी
धर्मात्म्याच्या वंशीं लावी घोर काळिमा पापिणी

. . दशरथ राजा कैकयीला राज्याभिषेकाची बातमी सांगण्याकरितां कैकयी महालांत येतो. . . पण कैकयी आपले केस अस्ताव्यस्त करून क्रोधानें आकांत माजविते ... आणि दशरथाला वचनपूर्ति करायला सांगते.)

**कैकयी :–** ऐका नाथा, जागा आतां आपुल्या वचनास
मम भरता द्या सिंहासन अन्
रामा धाडा वनवास.
दंडकवनीं त्या लढतां लढतां
रणांगणिं रथ-आंसहि तुटतां
निजबाहूंचा आंस करूनि
कुणीं सावरिलें तुम्हांस ?
कशास आतां करता कळवळा
वचन दिलें तें आधी पाळा
वचनभंग कां शोभून दिसतो
रघुकुल वंशास ?
वर मागण्या आपण वदतां
' दोन दिलें ' – अन् आतां मागतां
कां सरतां हो मागे आतां ? –
पूर्ण करा निज वचनास !
एक वरानें सकल संपन्न
भरत वीरा द्या सिंहासन
दुजा वरानें चवदा वर्षे
रामा धाडा वनवास.

(कैकयीचे वर ऐकून दशरथाला एकदम मूर्च्छा येते. आणि तो जमिनीवर कोसळतो.)

**निवेदक :–** वर मागतां व्योम कोसळे दुभंगली धरिता
वाया ठरली मनधरणी, ये मूर्च्छा झणि दशरथा.

(करुण–संगीत खंड .. याच वेळीं राम हा कैकयी महालांत माय–तात पादुका स्पर्शण्याकरितां व आशिर्वाद घेण्यासाठीं प्रवेशतो.)

राम आला कैकयी–मंदिरीं, स्पर्शण्या माय–तात पादुका
ऐकतां मातृ–आज्ञा सत्वरी शिर नमवी अनुकारिका.

(राम वनांत जाणार ही वार्ता ऐकून कौशल्या माता फार दुःखी होते. आणि रामाला वनांत न जाण्याकरितां आक्रोश करून विनवणी करते. .. वातावरणांत उदासीन शांतता .. वात्सल्य रसाला उधाण आलें आहे. संगीताचे करुणार्त स्वर उमटतात.)

**कौशल्या** :– ओलांडुनी तूं तव मातेची माया
नको जाऊं वनीं रघुराया.
तव विरहानें हृदय भंगतें
तव प्रेमाविण गगन फाटतें
दुःख नको मम काया.
तुझ्यावांचुनी राहूं कशी मी ?
मातृप्रेम हें वाटूं कुणां मी ?
जिवंतपणी मीं मरण साहतें–मत्प्रिय रघुराया.

(कौशल्येच्या मातृप्रेमाचा अव्हेर करून केवळ कर्तव्य–पालन करण्याकरितां तो तसाच पुढें जाऊं लागतो. परत कौशल्या त्याच्या मार्गापुढें पडून नगरवासीजनांना रामाचें मनपरिवर्तन करायला विनंती करते.)

तुम्ही नका धाडुं हो माझा राम वनाला
ही माय विनविते सकलां.
तोडुं नका हो ममता माझी
कां ताटातूट वत्स धेनूची ?
हो मुकाल पुण्याईला
नका धाडुं राम वनाला.
स्मृति उरीं मम मारी सुरी
तडित घात कां उरावरी ?
पेटली अंतरीं ज्वाला
नका धाडुं राम वनाला.

(सर्वांचे प्रयत्न व्यर्थ ठरून शेवटीं राम वनवासाला जाण्यासाठीं निघतो. ... करुण रसाचे स्वर उच्चतर होत जातात.)

**निवेदक** :– रामवनाचे प्रलाप ऐकतां नगरीं पसरली अवकळा पहा
चंद्र लोपला नभामध्यें निष्प्रभ जहाल्या तारा अहा !

(राम वनवासाला जाण्यास निघाल्याची दु:खद वार्ता ऐकून सत्वर जानकी धांवत येऊन रामाला अडविते आणि आपल्या सोबत स्वत:ला घेऊन जाण्याविषयीं आग्रह धरते.)

**जानकी** :– कुळवंताची कन्या मी ही दासी तव नाथा
मज नका त्यजूं रघुनाथा.
माता मंगल मी विश्वाची
चरणीं माथा ; दासी तुमची
तुम्ही नका घेऊं वाण सतीची – घ्या सोबत तव पथा.
कुबेर वैभव राजमंदिरीं
रंजविती ललना अन् सुंदरी
कशास वैभव सुनें परी मम लागे हृदयीं व्यथा.

(राम तिच्याकडे दुर्लक्ष करून तसाच पुढें जाऊं लागतो. सीता परत परत त्याचा मार्ग अडवूं लागते.)

तुझ्यासवें मज रुचेल रामा दुर्गम वनवास
परि तोडूं नको जीवास !
वंध तोडुनी सारे मागें
तुझ्यासवें मी ये अनुरागें
तुटतील कसे प्रीति-धागे ?– विरह नको हृदयास !

(राम जानकीची समजूत घालूं लागतो.)

**राम** :– प्रिये जानकी नकोस येऊं ममसंगती तूं वनीं
शिरिष कुसुमाहुनि कोमला तनु तव जाई ग सकुनी
यौवनांतली तुझी ग कांति, कोमेजे वनीं देहलता
कंदमुळें खाऊनी जगाया, नच जन्मली ही जनकसुता !

**जानकी :–** वनवास मी साहीन रामा, घ्या मज आपुल्या सवें
प्राजक्ताच्या मधुगंधासम
उन्हें वनींचीं होतीं मृदुतम
तव संगें मी पाहीन नाथा, सप्तस्वर्ग वैभवें.
प्रासादाहुनी ती रम्य कुटी
पाहीन नयनीं मी जगजेठी
तुझेंच हंसरें बिंब वघोनी, स्वर्ग खालती लवे.
पायीं तुझ्या मी सुमनें वेचीन
तुझ्याच ठायीं सुख मी पाहीन,
हात पसरुनी प्रीती वांछीन, तुझ्याच प्रेमळ भावें.
वनी रामा तुझ्या संगतीं
राहीन मी नित सखी-सांगाती
नयनीं सांठवीन तुझीच मूर्ति, प्रेम मला तव हवें.
रघुवंशाची शपथ घालितें
हात जोडुनि पदर पसरितें
दे पावनभिक्षा मजप्रति ते सदया करुणाभावें.

(राम आपल्या सोबत सीतेला आणि लक्ष्मणाला घेऊन निघतो. सर्व लोक दुःखी होतात. करुण स्वर संगीताच्या पार्श्वभूमीवर उमटूं लागतात.)

**निवेदक :–** सत्पथ आक्रमिण्या निघाले वनांत श्रीराम
पालन करण्या ताताज्ञा जी करूनि इच्छा होम.
भाग्य आपुलें आपल्या हातीं चालें घेऊनी दूर
दशरथनंदन राघव सोडी राज्यलोभ पार.

(रामादि लोक वनवासाला निघून गेल्यानंतर आजोळाहून भरत येतो, आणि नगरांतील उदासीनना पाहून तो मनीं खिन्न होतो.)

**निवेदक :-** झाली उदासपुरी अयोध्यानगरी
शोक पसरला सकल जनांतरीं
भरत पातला आजोळाहून रामाच्या भेटीला
अवदासाची कळा पाहुनी, मोद मनींचा विरला–
झाली उदासपुरी...
अपशकुन तो दृष्टि पडतां उदास झालें मन
हृदय तयाचें धडधडलें अन् नयनीं पातला प्राण
झाली उदासपुरी...

(भरत आपल्या क्रोधावस्थेंत कैकयीच्या महालीं प्रवेश करतो आणि रामाला वनांत पाठविल्याबद्दल तिचा धि:कार करतो.)

**भरत :-** काय केलें माय तुं हें, झाली कशी वैरिणी
निज पुत्राचा स्वार्थ साधण्या, कशी झालीस पापिणी
हें वैभव नलगे; कलंक आतां मजला
रघुचरण कुठें तें धूळ मी कवडीमोला
धाडुनी रामा वनीं अन् मजला बसविशी सिंहासनीं
तोडुनि तूं हा शास्त्रवृक्ष धर्मावरी आणली गदा
वनांत धाडुनि पुत्रां तूं मम तातें आणली विपदा
वध तातांचा करूनि मूढे ! काय साधिलें मनीं ?
श्रीरामाचा मुगुट अर्पितो जाऊनि मी त्या वनां
प्रभुचरण स्पर्शाची लागे आस माझ्या मनां
धि:कार असो गे तव कृत्याचा माता नच वैरिणी !

(भरत कैकयीचा धिक्कार करून जातो.)

× × ×

(भरत वनांत रामाजवळ येऊन त्याला परत स्वगृहीं येण्याविषयीं विनंती करूं लागतो.)

**भरत :-** रघुनाथा या अनुजाची विनंती ऐका
चला सत्वरी गृहीं भुवन-पालका !

राज्य नको मज; मोह नको मज;
धाम नको मज; मान नको मज
जगेन तुजविण कसा विश्वपालका ?

**राघव :-** मी धन्य जहालों भरता मम अंतरीं
येऊं नको मजसवें; तूं फिर माघारी.
तात वचनातें पूर्ण करोनी
दुष्टांचा भूभार हरोनी
निज धामा मग मी येईन सत्वरी.
नच ही संपली पावन-यात्रा
शोभे कैसे दशरथ-पुत्रा
नकोस ढाळूं आंसूं अतां अंतरीं.
कोण सुटले रे या मरणांतुनी
मुक्त होऊं दे कर्तव्यांतुनी
राज्यपदाचा भार तूं घे तव शिरीं.

(दोघांनाहि बंधुप्रेमाचा गहिंवर येऊन ते दोघेहि एकमेकांना कडकडून आलिंगन देतात.)

**भरत :-** जगरीतिस्तव अनुसरितों मी रामा तव पादुका
राज्य स्थापिण्या तव नामें द्या आज्ञा मज पालका

(राम आपल्या पायांतील पादुका भरताच्या स्वाधीन करतो.)

**निवेदक :-** गहिंवरुनि वंदि बंधुपदां अनुकारिका
स्थापाया राज्य नवें निघे घेऊनि पादुका !

(भरत रामाच्या पादुका घेऊन निघून जातो.)

× × ×

(पंचवटीच्या आश्रमांतील सीता वनांत फुलें खुडण्याकरितां जाते. वनांतील वन्य-पक्षांचे निरनिराळे आवाज उठतात.. पानांची सळसळ कानाला गोडवा देते. संगीताच्या पार्श्वभूमीवर प्रसन्नपूर्ण स्वर उठतात.)

**निवेदक :-** तपोवनीं ज्या करी जानकी शोभा अवलोकन
लता-पर्ण फलभारें फुललें प्रमुदित जें कानन.
कुठें काढती कोकिळ सुस्वर
सूर किती मयुरांचे सुमधुर
शोभे वरती जें नीलांबर
सुमन वहारा पिण्या आसुसले जानकीचे लोचन.
तोडित असतां वेली फुलां
तिनें एक मृग अवलोकियला
मोह तयाचा नच आवरला
कांचनमृग तो पाहुनिया झणि तिचें भाळलें मन.

(कांचनमृगाला पाहून सीता ही भाळून जाते आणि रामाप्रति ती तें आणून देण्यासाठीं हट्ट धरते.)

**जानकी :-** पुरवा तुम्ही रघुराया हो माझ्या मनींची आंस
आणुनि द्या मज कांचनमृग तो, माझ्या काचोळीस.
कनककांती बहु अंगावरी
तेज मुलायम नक्षत्रापरी
भास जहाला, आशा पुरवा; द्या हृदया उल्हास.
पाहुनि मृग मम डोळे दिपले
मनास माझ्या हवें वाटलें
ध्यास लागला मजला त्याचा करितें विनती पदास.

(सीतेचा हट्ट पुरविण्याकरितां राम मृगाचा पाठलाग करण्यासाठीं वनांत प्रवेश करतो. तोंच )

**निवेदक :-** हाय ! अचानक काळानें साधिला आपुला डाव
तोंच शब्द कानीं "हा सीते, हा लक्ष्मणा धाव धाव!"

("हा सीते, हा लक्ष्मणा धाव धाव !" हे भेदक शब्द ऐकून सीता अतिशय भयभयीत होते. आणि लक्ष्मणाला रामाच्या मदतीकरितां वनांत जाण्याकरितां आग्रह करते, पण लक्ष्मण वनांत जाण्यापूर्वीं एक रेघ ओढून ती न उल्लंघण्याकरितां सीतेला सांगून जातो.)

**लक्ष्मण :–** माते वहिनी ! तूं रहा आश्रमीं जपून
ही रेघ मारली जाऊं नको लंघून.
मायामृग लोभें राम असे त्या वनीं
ती हांक ऐकुनी जातों सत्वर इथुनी
घालितों शपथ परि रामाची घ्या खूण.

(लक्ष्मण आश्रमांतून जातो. वातावरणांत एकदम बदल घडून येतो. पक्षांचा कर्णकर्कश आवाज, वाऱ्याचें तुफान आदि गोष्टी मनाला अधिकच भयभीत करतात. संगीताच्या पार्श्वभूमीवर करुण रसाचे स्वर उठूं लागतात. कपट वेषधारी रावण गोसाव्याच्या रूपांत आश्रमाजवळ येऊन सीतेला भिक्षा वाढण्याकरितां सांगून तिचें हरण करतो.)

**निवेदक :–** देतां भिक्षा झणीं ओढियले, तोडियलें अंतर
पाहुनि पर्णकुटीं जानकीला
वेळ साधली घालुनी घाला
परि त्या दुष्ट मुनीनें हरिली जानकी सुकुमार.
कामव्यथेची सुरा प्राशुनी
नेली सीता मत्त झिंगुनी
घननीळाची मूर्त वीज ती धरी हातीं अंगार !

(सीतेला घेऊन रावण गेल्यानंतर राम-लक्ष्मण आपली मृगाची पारध फसली गेली म्हणून परत आश्रमाकडे वळतात; परंतु आश्रमांत त्यांच्या दृष्टीला सीता कोठेंच पडत नसल्यानें ते दुःखी होतात. रामाला तर अतिशय दुःख होऊन तो आश्रमाच्या एका झाडाखालीं बसून सीतेचा शोक करूं लागतो. करुण रसाचे स्वर संगीतावर हळूहळूं उच्चतर होत जातात.)

**राघव :–** सीते, सीते ! जनकदुहिते ! –
टाकुनी मज तूं कोठें गेली, वंचुनी श्रीराम
कुठें मी शोधूं आतां विश्राम !

शून्य प्रियेविण मज वनवास
हर्षं लोपला तुटला आंस
शोधूं कुठें विरही जीवास
सांग प्रियतमे, जीवित-प्रतिमे ! –
व्याकुळ सीताराम.
वृक्ष लतांनो सांगा सत्वर
गेली कुठें मम शुभांगी दूर
अबोल कां तुम्हीं मैना-मोर
घातकाळ हा पुन्हा पातला–
शोधूं कुठें मी धाम.
काय भोगणें आतां उरलें
दु:खाचे हे सागर भरले
असेल जीवित सारें सरलें
जगायचें तरी कोणासाठीं ?–
हतबल हा अभिराम

(दु:खी अवस्थेमध्यें राम आणि लक्ष्मण सीतेचा शोध करीत निघाले असतां त्यांना सीतेचीं कर्णफुलें सांपडतात.)

**निवेदक :–** जानकीस शोधण्या निघाले, दु:खित श्रीराम
बंधुसंगें तुडवित शोधित वन ते अविराम

**राघव :–** (वाटेंतील फुलें नि सीतेचीं पाऊलें लक्ष्मणाला दाखवीत)
हींच फुलें लक्ष्मणा पहा तूं ओळख तीं पाऊलें
पदचिन्ह राक्षसाचें गूढ तें आकळलें
मैथिली छळिली कुणी रात्रिचर
रथाघात बघ छत्र धुलि:सर
दिसे गृध्राशीं झालें संगर
हरिले कुणी रे प्रियेस माझ्या, बाहू प्रस्फुरले.

८५०९४ वि: काव्य
१६३८


(पुढें कांही पाऊलें चालून जातात न जातात तोंच त्यांना पक्षीराज जटायू मरणावस्थेंत पडलेला दिसतो व त्याचेकडून सीतेला रावणानें पळवून नेल्याची वार्ता समजते.)

**निवेदक :-** मरणोन्मुख गृध्र पहातां,
शब्द पडे कानीं 'रावणें नेली पळवुनि सीता'
शब्दाघातें ते पुढें चालले घेऊनि धनुष्य-भाता.

× × ×

(सीतेच्या शोधार्थ राम-लक्ष्मण वनांतून चालले असतां वाटेंत मातंग ऋषींचा आश्रम लागतो. ऋषींची परिचारिका – शबरी ही राम वनांत आल्याची वार्ता ऐकून रामाला भेटण्याकरितां उत्सुक झालेली असते. रामाची भेट झाल्यानंतर तिला अत्यानंद होतो आणि ती राम-लक्ष्मणाला अल्पोपहार करण्याकरितां वनांतील बोरें देते.)

**शबरी :-** शबरी वनवल्लरीच्या घरीं राघव हो आले
हृदय फुलांचे पुष्पहार मी रामास्तव केले
वृक्ष-लतांनो, पर्ण-फुलांनो नमवा माथा खालीं
शमवा रघुराया देऊनि निज शीतल सांवली
पावन शबरी झाली तपानें, रघुनंदन फुलले.
प्राणफुलांच्या मृदु कमलांकित शय्येवरती
रूपकमलिनी सीता, बसेल घनश्याम आकृति
चाखित बोरें बंधुसंगतीं पावन मी झालें.
शंकाकुल कां बघतां सारें, आणलीं बोरें स्वकरें.
विनविते शबरी खुशाल सेवा तुम्ही ती निर्भरें
आनंदाचे अश्रु ओघळुनि पायीं मी वाहिले.

(शबरीला आनंदाचा निरोप देऊन राम पुढें मार्ग चालूं लागतात. व वाटेंत सुग्रीव – हनुमानादि वानर सेनेबरोबर सख्य जोडून लंकेंतून सीतेला सोडून आणण्याच्या प्रयत्नाला लागतात.)

**निवेदक** :- मैथिलीकन्या वनीं शोधतां बहु दिन ते लोटले
श्रीरामानें हनुमंताशीं सख्य पहा जोडिले.
चंद्रानना त्या सीतेसाठीं
वानरसेना खडी ठाकली
महान् सिंधु तरुनि त्यानें उड्डाण नभिं केलें.
पवनसुत हा वीर आत्मज
निजप्रतापें तोडी दिग्गज
सुवर्ण नगरां वायुसुतानें दुरुनच अवलोकिलें.
फेन–वीचिका वरी येतसे
त्या वीरातें ना क्षीति असे
रविस ग्रासतां व्योम तव शक्तीला पाहून थरथरलें.

× × ×

तिमिर पडतां पसरे यामिनी
घेईना अंत:पुरीं बालवीरा लंकिणी
मुष्टिघात करूनी अंत:पुरीं
शोधिले सीतेला पुरांतरीं.

(अशोकवनांत सीता एका वृक्षाखालीं सचिंत बसलेली असते. तेथें मारुती येऊन त्याला रामानें दिलेली मुद्रिका तो वृक्षावरून खालीं सीतेच्या पुढें टाकून देतो.)

**निवेदक** :- हनुमंत देखितो चंद्राविण जशी झुरते जी रोहिणी
ही कां सीता ? – रामस्वामिनी, मग्न मनीं चिंतनीं.
मलिन वृक्षांशी परि सुरेखा
मुख धूमांकित दिसे शलाका
ओळख पटुनि देई मुद्रिका
सानंदली ती अभिसारिका !

(मुद्रिका पाहून सीता प्रथम शंकित होते. पण थोड्या वेळानें तिला त्या मुद्रेची ओळख पटून ती मारुतीला उद्देशून बोलूं लागते.)

**जानकी :–** ओळखली रे दूता तुजला पाहुनी ही मुद्रिका
सांग अवस्था रघुरायाची, सुकली ही कलिका.
असतील माझे कष्टी राघव
विरह सोसती जे माझ्यास्तव
त्यांच्यासाठीं झुरत असे ही चंद्राविण चंद्रिका.
नच विस्मरले माझे स्वामी
पडतां दैवें परक्या धामी
करतील कधीं रे मुक्ति माझी भाव मनींचा मुका.
करण्या अधमा उदंड शासन
येतील कधि रे मम रघुनंदन
जिवंत असुनि मरण सोसतें निरोप घे सेवका.

(सीतेचा निरोप घेऊन परत जातांना मारुती हा लंकेची धूळधाण करीत निघतो.)

**निवेदक :–** फिरे सत्वरी हनुमंत
लंकापुरी ती जाळीत जाळीत
पसरून ज्वाळा अखंड अविरत.
या शिखराहुनी त्या शिखरावर
पेटविलें तें सारें गोपुर
पेटविली लंका निमिषांत.

(रामाजवळ येऊन मारुती सीतेची वार्ता सांगतो. त्याबरोबर रामाचे बाहु क्रोधानें स्फुरूं लागतात.)

ऐकुनी वार्ता हनुमंताची राघव प्रस्फुरले
दशाननाच्या संहारानें वानरसैन्य निघालें.
बांधुनी सेतु पाण्यावरती
तरती शिळा सिंधुवरती
लंकापुरीच्या शत्रूंशी ते लढण्या सरसावले.

× × ×

(राम–रावणाचें घनघोर युद्ध होतें. तरवारींचा आवाज खणखणूं लागतो. पार्श्वसंगीतावर युद्धांतील वानरसेना राक्षसांच्या विविध आवाजांचे पडसाद घुमूं लागतात. रंगमंचकाचें वातावरण वीरश्रीनें भरून निघते. ... आणि अशा परिस्थितींत शेवटीं राम रावणाचा वध करतो. )

रणांगणीं श्रीरामप्रभू झणी उभे ठाकले
रिपुरक्तानें वसुंधरेला शुचिर्भूत केलें.
एकवटुनि निज अवसान
रिपूप्रति केलें शरसंधान
शरवृष्टीनें महारिपूचें पंचप्राण हरिले.

(रामानें रावणास मारल्यानंतर रावण जमिनीवर कोसळून पडतो, त्याबरोबर राम–सीता,लक्ष्मणादि वानरसैन्यावर आकाशांतून पुष्पवृष्टि होऊं लागते. चोहोंकडे आनंदी वातावरण निर्माण होऊन पार्श्वसंगीतावर मंगलवाद्यांचे आनंदी स्वर घुमूं लागतात.)

भूवरीं रामराज्य आलें
रामप्रभूच्या जयजयकारें नभमंडल घुमलें.
नभिं निनादती गंधर्व स्वर
आनंद उसळे भूलोकावर
धरणीचें ते संकट टळुनि सुभाग्य उदया आलें.
खलासुरांच्या संहाराला
राघवरूपें विष्णु प्रकटला
रघुपति राघव जयघोषानें नंदन दुमदुमलें !
(आनंदी–आनंदाच्या पार्श्वभूमीवरच पटक्षेप).

***

मे न का

## कथासूत्र :

पृथ्वीतलावर विश्वामित्रानें घोर तप मांडिलें तेव्हां त्याच्या तपःसामर्थ्यानें चोहोंकडे हलकल्लोळ माजला, आणि स्वर्गांतील इंद्रादिक देवलोक तर अतिशयच भयभीत झाले. आपल्यावरील आपत्ति टळण्याकरितां, इंद्रानें विश्वामित्राचा तपोभंग करण्यासाठीं अत्यंत सुंदर अशी अप्सरा – मेनका हिला पृथ्वीवर पाठविलें.

आणि काय चमत्कार ! – मेनकेनें आपल्या रूपसौंदर्याच्या संवर्धनाकरितां चंद्र ताऱ्याचें शीतलत्व व सृष्टींतील तमाम सौंदर्याचें शोषण करून व रतीमदनाचा मादकपणा आपल्यामध्यें एकरूप करून ती साक्षात् सौंदर्याची पुतळी बनली व तिनें विविध मादक नृत्याभिनयानें विश्वामित्रास मोह पाडून त्याचा तपोभंग केला !

झालें ! — जें घडायला नको होतें – तेंच घडलें ! विश्वामित्र-मेनकेच्या मीलनानें शकुंतलेचा जन्म झाला. मात्र विश्वामित्रास झालेल्या घटनेबद्दल अतिशय पश्चात्ताप झाला. त्या पश्चात्तापाच्या भरांत त्यानें शकुंतलेसह मेनकेचा त्याग केला ! आणि पुढें....

★★★

**पात्रें :**

- विश्वामित्र
- मेनका

## पूर्वरंग :

ही संगीतिका महाभारतकालीन घटनेवर आधारलेली असून हिचे तीन कालखंड पडतात. प्रथम खंड सूर्योदयानंतर, दुसरा रात्रीं आणि तिसरा कांही काळ लोटलेल्या एका सकाळीं.

पहिल्या खंडांतील प्रसंग एका घनदाट अरण्यांत घडतो. तेव्हां साहजिकच अरण्याचें दृश्य रंगमंचकावर उभे करावें. एका बाजूला किर्र झाडी, दुसऱ्या बाजूला उत्तुंग पर्वतराशी, तर वर निरभ्र आकाश... अशा पार्श्वभूमीवर एका वृक्षाखालीं तपोमहर्षि विश्वामित्र ध्यानस्थ बसलेले आहेत. जवळून नदी वाहते आहे व शेजारींच झोपडी आहे याची कल्पना यावी.

विश्वामित्रानें यतिवेष धारण केलेला असून हातांत पलाशदण्ड, खालीं मृगाजिन, एका बाजूला कमण्डलू, दुसऱ्या बाजूला पूजेचें साहित्य, मुखावर स्थितप्रज्ञाची धीरगंभीरता इत्यादि गोष्टींनीं वास्तवपूर्णता येईल.

मेनकेचा रंगमंचकावरील प्रवेश तर फारच उठावदार आणि स्वप्नाळू दाखवितां येईल. जोराचा वारा सुटल्याचा आवाज, मेघांचा कडकडाट, विजांचा लखलखाट आणि प्रत्यक्ष मेनका प्रविष्ट झाल्यावर नूपुरांचा मादक झंकार, विहगांचें कूजन, वसंताचें आगमन इ० शृंगारिक प्रसंगांची पार्श्वभूमि निर्माण करावी.

मेनकेची वेषभूषा ही एकाद्या अप्सरेसारखी असावी. केशभूषा शृंगारिक पण अजिंठा पद्धतीची असल्यास अधिक बरें.

प्रसंगानुकूल संगीताची आणि प्रकाश योजनेची पार्श्वभूमि मिळावी. तिसऱ्या खंडांतील बालकाचें करुण रुदन, विश्वामित्राचा त्याग आणि मेनकेनें असाह्यपणें फोडलेला टाहो इ० प्रसंग अतिशय वास्तवतेनें चित्रित करावे म्हणजे उत्कट वातावरण साधतां येईल.

★★★

# मे न का

( **स्थळ :–** घनदाट अरण्य. एका वृक्षाखालीं विश्वामित्र मृगाजिन धारण करून, हातांत पलाश-दंड घेऊन धानस्थ बसले आहेत. मुखावर स्थितप्रज्ञाची आभा पसरलेली असून सभोंवतालचें वातावरण धीरगंभीर दिसत आहे. संगीतखंडाचे धीरगंभीर स्वर या वातावरणाला अधिक उठाव देतात. )

**निवेदन :–** मांडियलें तप विश्वामित्रें
वसुंधरेच्या गिरीं-कुहरीं
नवजगताच्या सृजनासाठीं
विराट अग्नि जळे अंतरीं

नव्या जगाच्या निर्मितिस्तव
अदम्य आशा उठती मनीं
नव्या युगाच्या अनुभूतिस्तव
अग्नि तळपे विशाल नयनीं

तपोनिधीच्या उग्र तपानें
धरणीवर हो अनर्थ घडले
तमाम मानव वस्तुजातहि
तपीं तयाच्या जळून गेलें

दिशा-दिशांचे दारुण वारे
जगीं घालती घोर थैमान
मत्त पोळे नभि मार्तंड
चराचरांचे शोषुनि प्राण

चळचळूनि अन् धरणी गेली
गिरी-शिखरांचें सर्वांग चळलें
कुठलें नूतन नदिनाल्यांचें ?
वनदेवींचें गायन सरलें !

सकल भयाकुल, तारे, वारें
सुर-लोकादिक भयभीत झाले

'त्राहि भगवन् ! त्राहि भगवन् !'
एकच भूवरीं क्रंदन घुमलें !

( क्षणैक काल संगीत खंडाचे करुण-गंभीर स्वर उच्चतर होतात. )

मुनिवर्याचें वळविण्यास मन
देवांना पण पडलें कोडें
विचार-मंथन करुनि सारे
झाले वेडे ! झाले वेडे !!

अखेर सुचली एक कल्पना
हतबल करूनी तपोभंगित
रति-मेनकेस धाडुनि द्यावें
मन यतीचें करण्या विचलित

( आकाशांत मेघांचा कडकडाट होतो. विजा चमकूं लागतात. जोराचा वारा सुटतो. निसर्ग अधिकच क्रुद्ध होतो. सुर-लोकाहून सुर-सुंदरी मेनका नखशिखांत साजशृंगार करुन पृथ्वीवर येण्यास निघते. )

उचित मनोरथ घेऊन रति कां
अवनीवरती येण्या वेगें
देवेंद्राची मान्य आज्ञा–
नभांगनाहि सवें अनुरागें

( मेनकेच्या नूपुरान्वित पदन्यासाचे नाद घुमूं लागतात. वातावरणांत बदल होऊन विहंगांचें कूजन, वाऱ्याचा शीत मंदपणा, वेलींचें नर्तन नि वसंताचें आगमन इत्यादि मंगल गोष्टी दृग्गोचर होऊं लागतात. संगीत खंडाचे मंगल सूचक स्वर तर या प्रसंगाला अधिकच उठाव देतात. )

अपल चपल अति चाल हंसीसम
जणुं निखारी मदन-कट्यार
अटकर बांधा यौवन देहीं
अनंग झाला अति अनिवार

उटी सुगंधित माळे अंगा
मणि-मेखला सुवर्ण हार
सौंदर्याला ये रसरंगा
इष्कास चढे नशेली धार

केश कुंवली सुरंगिचा सर
संध्या लाली भांग उदेलें
चिरसुगंधित वेणीवरती–
निळवंतीचीं नक्षत्र फुलें

लोल लोचनीं मधुमुग्धता
नजर गातसे मधु अंगाई
मादक विभ्रम, मोहक लाघव
स्मितामधुनी फुटे निळाई

लोल खळीवर व्याध चांदणी
लज्जेमधुनी उठे रुबाई
स्वरतंतूंचें विणुनि जाळें
अर्थ मोहक, भूलभूलाई

पीन उरोजीं उन्नतभार
कनक घटासम स्तन ताटलें
उभार यौवन असह्य भार
काचोळीचे बंदहि तुटले.

क्षणैक काल तिनें देखियलें
कज्जल विद्युत् नयनांनीं
तोंच फुटली चैत पालवी
मुदित झाली व्याकुळ धरणी.

(रंगमंचकावर वर्तुळाकारें नृत्य करीत करीत मेनका विश्वामित्रासमोर येऊन प्रविष्ट होते. नृत्याचा एक बहारदार तुकडा... शृंगारयुक्त संगीत उत्कट होतें.)

**मेनका :-** उठ मुनिवरा ! उघड लोचनें
गाऊं दोघे प्रीति-गाणें
वाजति रुमझुम् पायीं पैजण
किणकिण करतीं हातीं कंकण
हृद् वीणेचें उठतें गुंजन
मदनाची खेळुनि होरी
फेडूं अंमळ चल प्रीति पारणें.

मुग्धभावना मनांत उठती
प्रीति वल्गना ओठीं विरती
लज्जेनें अन् पैरीं झडती
प्राण फुलांचा झोला करूनी
मदन नशेमधि होऊं दिवाणे.

मनांत फुलतीं सुरम्य सुमनें
नभीं पसरलें टिपूर चांदणें
नाचति झुमझुम किरण–पैंजणें
तन्वांगावर रंग प्रीतीचा–
सुख सखया मधु आभरणें.

व्यर्थ तपस्या, विफल साधना
स्वर्ग प्राप्ति झाली कोणा ?
मुक्तीची ही फोल वल्गना !
मन्मथ पुतळी स्वर्ग समोर–
लुट नवतीचें रंग तराणे !

(नृत्याविष्कारांतच मेनका विश्वामित्राच्या भोंवती घिरट्या घालते. त्याक्षणीं विश्वामित्र आपले डोळे उघडून तिच्याकडे प्रणय लालसेनें पाहूं

लागत असतानांच मेनका त्यांच्या हाताला धरून उठविते, आणि आपल्या बरोबर नृत्य करायला लावते. दोघेहि नृत्य करीत करीत झोपडीमध्यें प्रवेश करतात.)

**निवेदक :–** तपोभंग हा मुनिवर्याचें
नयन तयाचें हळू उघडले
तोंच पाहतां मन्मथ पुतळी !
मदन कंपनें मनीं उठलें
योग्याचें तप विचलित झालें
ही विषयानें मन अति विद्ध
मेनकेस तो स्पर्शतां जरा
करांत झाला पुरा निबद्ध
मोह मायेचे पाश जखडितां
घडायचें तें, तेंच घडलें
पश्चात्तापित असतां योगी
नव बाळाचें निर्माण झालें.

(नंतर बाहेर येऊन पश्चात्तापदग्ध विश्वामित्र रंगमंचकावर, चिंताक्रांत अवस्थेंत बसलेले असतानांच झोंपडींतून अर्भकाच्या रुदनाचा आवाज ऐकूं येतो. बालकाला घेऊन मेनका बाहेर येतांच तिचा त्याग करून विश्वामित्र जाऊं लागतात. नेपथ्यांतून करुण संगीताचे स्वर उठतात.)

**विश्वामित्र :–** (क्रोधानें)
कुलटे दुष्टे काय केलेंस
झाली कशी तूं वैरिणी ?
तपोभंग मम करुनी मूढे
युगाचें वैर साधलें क्षणीं.

धिक्कार तुझा, धिक्कार तुझा

अपराध मी ग, केला नाहीं
तुझें पाप तूं साहत रहा—
या कन्येचा मी पिता नाहीं

(तिला झिडकारून निघून जात असतांना ती त्याच्या मागे टाहो फोडीत जाते.)

नाथ ! .. नका मज त्यजूं ..
नाथ ! .. नका मज त्यजूं ..

(संगीताचे करुण स्वर वातावरणांत हळूंहळूं लोप पावत असतानांच पटक्षेप.)

★★★

क वि बि ल्ह ण - श शि ले खा

## कथासूत्र :

काश्मीर कवि बिल्हण हा अनहिलपट्टण वीरसिंह राजाच्या राज्यांत भ्रमण करीत आला असतां, वीरसिंहाची नवयौवन रूपमती कन्या शशिलेखा ही आपल्या सखींसमवेत बागेंत खेळत असते. या वेळीं दोघांची दृष्टिभेट होते अन् परस्परांच्या मनांत अस्फुट प्रेमाची कळी उमलूं लागते.

....योगायोगानें राजदरबारीं बिल्हण आला असतां त्याचें विविध विद्या-नैपुण्य व काव्य-कलाकौशल्य पाहून राजा त्यास आश्रय देऊन आपल्या कन्येच्या शिक्षणाची जबाबदारी त्यावर सोपवितो.
... दोघेहि तरुण–देखणी.... अन् विदग्ध–विलासी गुरु-शिष्य परस्परांवर अनुरक्त होतात. शेवटीं ही वार्ता राजाला समजतांच तो भलताच संतापतो व बिल्हणास सुळीं देण्यास फर्मावितो. झालें. प्रेमाचें नाटक संपलें ! — वधस्तंभावर सुळी देतांना राजा बिल्हणाला शेवटची इच्छा व्यक्त करायला सांगतांच त्या प्रेमी कवीच्या मुखांतून बाहेर पडलेल्या -

'अद्यापितां कनकचंपक दामगौरी—
विद्यां प्रमादगलितामिव चिंतयामि !'

या अमर प्रेमोद्गारानें व शशिलेखेवरील नितांत कवि-प्रेमानें राजाचें अंतःकरण विदीर्ण होतें, व शेवटीं राजा स्वतः होऊन आपल्या कन्येचे कर कवि बिल्हणाच्या हातीं देतो !

★★★

पात्रें :

- कवि बिल्हण
- राजकन्या शशिलेखा
- राजा वीरसिंह
- शशिलेखेच्या चार सखी
- सुळी देणार दोन शिपाई
- प्रसंगीं राजदरबारांतील सुभेदार, शिलेदार व इतर पात्रें

# पूर्वरंग !

ही संगीतिका मध्ययुगीन काळांतील एका प्रेमी युगुलाच्या उत्कट प्रेमावर आधारलेली आहे.

या संगीतिकेचे तीन खंड पडतात. प्रथम खंडांतील प्रसंग राजवाड्याबाहेरील असून बागेंत आपल्या मैत्रीणींसमवेत शशिलेखा क्रीडा करीत आहे.. कवि बिल्हणाचें आगमन होऊन दोघांची दृष्टिभेट, प्रेम निर्मिति, तो गेल्यानंतर मैत्रिणींची थट्टामस्करी इत्यादि घटना घडतात. निसर्गाच्या रमणीय पार्श्वभूमीवर त्या घटना घडतात म्हणून रंगमंचकावर निसर्ग रमणीय बागेचें दृश्य साकार करावें. मधून मधून

आनंदनिर्मितीकरितां कोकिल कूजन, पक्षांचा नानाविध आवाज इ० पार्श्वसंगीतांतून परिणामकतेनें सूचित करावा. शशिलेखा आणि तिच्या मैत्रीणींची वेषभूषा मोल्यवान् वस्त्रालंकारांनीं शृंगारित असावी.

दुसऱ्या खंडांतील प्रसंग शशिलेखेच्या महालांतील असल्यानें राजमहालाची संपन्न ऐट उभी करावी. या खंडांत बिल्हणाबद्दल वाटणारें प्रेम, बिल्हणाचा सकल कलाशास्त्र-शिक्षक म्हणून प्रवेश. शिक्षणांतून परस्परांच्या अनुरागाची निर्मिति आणि वीरसिंह राजाला लागलेला प्रेमाचा सुगावा इ० घटना येतात.

चित्रलेखेच्या प्रणयांतील आर्तता उत्कटतेनें साकार करतां यावी. शशिलेखा-बिल्हणाच्या अध्यापन-अध्यापनाच्या वेळीं वेगवेगळ्या संगीत वाद्यांची कुशलतेनें योजना करून प्रसंगाला उत्कटता आणावी. दोघांच्या प्रेमाचा सुगावा लागल्यानंतर शशिलेखेच्या मनाला बसलेल्या धक्क्याची कल्पना करुणार्त संगीताच्या पार्श्वभूमीवर चित्रित करावी.

तिसऱ्या खंडांतील प्रसंग वधस्तंभाचा असून वातावरणांतून भयानकतेची कल्पना यावी. प्रत्यक्ष वधस्तंभ उभा करतां आल्यास अति उत्तम. शेवटीं शशिलेखा-बिल्हणाचे मधुर मीलनाचा प्रसंग आनंदी आनंदाच्या पार्श्वभूमीवर करावा.

बिल्हणाची वेषभूषा ज्ञानेश्वर वेषसदृश करतां आली तर अधिक बरें. राजा वीरसिंहाचा पोषाक राजपोषाखच असावा.

प्रसंगानुकूल पार्श्वसंगीताची व प्रकाशाची योजना व्हावी.

★★★

# कवि बिल्हण – शशिलेखा

**निवेदक :–** दो जीवांचें नातें जडलें
त्या प्रीतीनें नांव तयांचें अमर जगीं झालें !
कविवर बिल्हण अन् शशिलेखा
रूप सिद्धीची अजोड रेखा
चंद्रास मिळे मधुचंद्रकला, मधु संगम झाले !
प्रीतीची जगिं कीर्ति मोठी
प्रीतीसाठीं मरण शेवटीं
भोगतां तयां प्रीति-अमृत सर्वस्व लाभलें !
कवि प्रियेच्या प्रीतीसाठीं
अन् लागली काळ कसोटी
अंतीं कवीच्या चिर प्रीतीनें मरणा जिंकियलें !

× × ×

नभीं उगवतां प्रगटप्रभा वसुंधरा मनि-धुंद हसली
क्षितिजाच्या मृद्कपोलीं कस्तुरीची लाट झरली
मलयानिल हा वनांतुन वेणु मधु मधुर पहा घुमवीत फिरे
पुष्पगंधी मधुगंधाचा मार्दव वनि धुंदील झरे
सुमगंधाची पंख–पांखरें उडतां वेगें वेलींवरून
उन्हें नाचरी चिवचिवलीं पर्ण–फुलें अन् फांद्यावरून
आनंदानें दिशा उजळल्या अंगाई गीत झरा गाई
आरस्पानी जलांत न्हाऊन उन्मत्त गिरकी मन हें घेई
धरणीच्या जणु प्रीतीसाठीं नील गगन जें खालीं झुकलें
कवेंत वेढुनि कचकचून तिचें चुंबन दीर्घ जें घेतियलें
तरुवेलींवर फुलें लहडलीं भ्रमर करती कलरव गुंजन
रसरसणाऱ्या कमल यौवनीं दिसे दिशांचें सुरंग रंजन !

(वाऱ्याच्या मंद झुळुकीबरोबर हास्य-कलरव ऐकूं येऊं लागतो.)

हरित मुलायम वनराजींवर हास्याची जी मृद्गंध झरली
सखीं समवेत मीन कुरंगी बागडण्यामधि धुंद रंगली
आरस्पानी अंगकांतीहि रुपरत्नाची उत्तुंग खाण
नयनीं कांहीं गूढ खळबळ मनीं घेतसें स्वप्न–लोळण !
गद्गद पोवळ्याच्या मधाळ ओठीं नियळें लवथव शरद चांदणें
आरस्पानी ज्या अंगवदीं फुलली नागीण केतकी–वनें
उत्पलें रुलतां अल्लद अंचलीं रूपगर्विता मनीं लाजली
रंग उषेची कोमल गालीं खळी पसरली संध्या लाली !

(हिरव्या वनीं शशिलेखा आपल्या मैत्रिणींसमवेत थट्टा–मस्करी आणि खेळांत गुंग झालेली आहे. संगीत खंडांतून मंगलसूचक वाद्यांचे स्वर निनादले जाऊं लागलेले असून वातावरण प्रसन्न दिसते.)

चपल कर चरण–द्वयीं विलसे मधुमेंदीचा रंग रक्तिमा
मीन लोचनीं ललितर सुरमा विशाल भालीं रक्त कुंकुमा
गीत पोर्णिमा स्वर चांदणें स्मित तरंगीं जी फुलवेली
प्रिय सखीच्या अणुरेणूंतुन गंध कस्तुरी मस्त झरली !

× × ×

**सर्व सखी** — मदनसखा हा वसंत आला वनीं
सखीनों, वसंत आला वनीं !
शृंगाराचा डंका घुमला
वनवल्लरीं मोद फुलला
आम्रवृक्ष तो मनीं हर्षला
पवनासंगं गाऊनि धुंद गाणीं.

**एक सखी** — धुंद मोहोर वनीं घमघमला
रूपनिशिगंध मंद दरवळला
स्वैर विहंगम आणि हंसला
घुमवित वदनीं मोहक गाणीं.

**२ री सखी** :— प्रणयगीत मधुर मंद मधुर
धुंद गुंफी जो धवल हारि
प्रेमें (उजळें न्यारा)
स्मित सुरंग उजळे वदनीं.

**३ री सखी** :— सळसळताती मधुर मंजिऱ्या
झुकती शाखा गोड साजिऱ्या
गातात गीतें मधुर लाजिऱ्या
टपटपती नील जांब वरतुनी.

**शशिलेखा** :— (आनंदानें)
हीं हरित शावकां कशि बागडते
हिरव्या मृदुल वनराईत
ही हंस मालिका कशी क्रीडते
आरस्पानी नील नदींत
हा चकोर मयूरहि उभवोनी तुरा
'टाहो' फोडी नभीं ऐटींत
प्रिय पपीह हा 'पिऊ पिऊ' करतो
मंजुळ मैना सखी समवेत
कमल-भृंग हा रुंजि घालितो
अस्फुट कमळेण अंतरंगांत
चकोर चातक पहा भिरभिरे
स्वैर मुक्त जो निळ्या गगनांत
ती 'कुहू कुहू' करी कोकिळा
धुंदित गाते मधु पंचमगीत
वनविहंग हा कसा चिवचिवे
तांबुस हिरव्या रानामनांत !

(शीतल वाऱ्याच्या मंद झुळुकीबरोबर बासरीचे मधुर स्वर हळूहळू कानीं येऊं लागतात. शशिलेखेसह तिच्या सर्व मैत्रिणीचें लक्ष क्षणभर

आपलें गीत विसरून त्या मधुर स्वराकडे लागते. सर्वजणी त्या धुंदिल स्वराकडे कौतुकानें पाहत असतात.)

**शशिलेखा :-** (धुंदींतच . . . .)
वंश वनांतुन घुमे कुणाची
स्वप्न धुंदी हृदय पुकार
स्वर संगमीं गीत उमलुनी
अंतरंगास मिळे अनुकार !

(नेपथ्यांतून बांसरीचे धुंदिल स्वर परत घुमूं लागतात.)

**बिल्हण :-** प्रणय विश्वीं कोंदलें। गीत मधु रंगलें !
वन हंसलें अन् फुललें कणकण
वेल जुईची स्वप्निल होउन
अवघें उजळें अमीत जीवन। नंदनवन फुललें !
स्वररागांच्या मधुर संगमा
उजळती मनीच्या विकल तमा
दश-दिशांमधीं भरूनि सुषमा। मोदें मन मोहिलें !
परमेशाचें स्वरूप दर्शन
सुंदरतेचें ललित नवेपण
चराचरांतुन दशादिशांतुन। संगीत जणुं भरलें !

(कवि बिल्हण प्रवेश करतो. त्याची आणि शशिलेखेची नजरभेट होते. क्षणभर ती लज्जित होते, आणि तिच्या सर्व मैत्रिणी भांबावतात.)

**शशिलेखा :-** कोण तुम्ही, कां आलांत इथें ?
चिर शांति मनाला मिळे जिथें !

**बिल्हण :-** प्रश्नाला कां उत्तर मिळतें
सांग शोधुनी तूं प्रश्नातें ?
जयि शब्दांची भाषा सरते
मुग्धताच मग बोलूं लागते !

मौनांतुन मग प्रीत जन्मते
आणि शेवटी समूर्त होते
कमलीं भृंग कां रुंजि घालती ?
दीपावरी कां पतंग मरती ?

**शशिलेखा :–** हो, बरें ! आपण चालला कुठें ?

**बिल्हण :–** आम्ही कवि सौंदर्य-यात्री
स्थलांचीं ना आम्हां बंधनें !
जड-मूढाचे पाश तोडतां
अधरीं तरळुन येतीं गीतें !

(तो तसाच पुढें पुढें अस्फुट गीत गुणगुणत चालूं लागतो. शशिलेखा त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे निश्चल होऊन पाहूं लागते. त्याबरोबर तिच्या मैत्रिणी तिची थट्टा मस्करी करायला सुरुवात करतात.)

**एक सखी :–** प्रिय मनीचें गुपित ऐका, सांगु सखींनो सांगु कां ?
उगीच आम्हां रोष देईल शशिलेखा ती फुकाफुका !

**२ री सखी :–** काय ?– काय बरें सांग ?

**१ ली सखी :–** ऐकलंत् सखींनों ऐकलंत् वनीं नवल तें काय घडलें ?

**३ री सखी :–** सांग सखे तें काय घडलें ?

**१ ली सखी :–** प्रिय सखीच्या मनामधि प्रणयपुष्प ग हळू उमललें !
मुशाफिराचें बिंब ठसोनी चंद्रबिंब हंसलें !

**२ री सखी :–** असं !– असं !––

**शशिलेखा :–** ऐसी खटयाळ मस्करी मज ना रुचते
उगींच कां मग करितां अशीं चेष्टितें ?

**१ ली सखी :–** सखे शशिलेखे ! आम्हांवर रागावलीस कां ?
शशिलेखा – शशिलेखा रागावलीस कां ?
कुणाच्या प्रीतींत बुडलीस कां ?

मुशाफिराच्या करिं तुझे कर बंदी
राजा-राणीची प्रीति चिरेबंदी !
(सर्वजणी मोठ्यानें हंसतात.)

**शशिलेखा :–** प्रेमभरें, शब्दशरें कां उगीच मज छळतां
आणि मदनाला मति कां उगीच चेतवितां ?

**१ ली सखी :–** असं ! – असं !
रागावलीस वाटतं हं शशिलेखे !

**२ री सखी :–** गोड गोड गुपित कोण बरं बोललं ?
मनांत हंसुनी जनांत रुसलं !
अधीर पाऊल कुणाचं वाजलं
मनाचं सुध कुणी बरं हरलं ?

**शशिलेखा :–** नका सखींनो, नका अशा ग छळूं
भलतं सलतं नका असे बोलूं !

**सर्वजणी :–** बरं बाई बरं ! —

**शशिलेखा :–** (लाडांत येऊन...)
प्रणय मिठींत मीं धुंद बुडालें
कुणास तरी मीं अपुलें केलें !

**१ ली सखी :–** कोण बरं होता तो ?

**२ री सखी :–** कसा बरं होता तो ?

**शशिलेखा :–** जें मलाच माझ्या पुरतें नव्हतें कळलें
मी मलाच क्षणभर विसरून होतें गेलें !

**१ ली सखी :–** कां अशी लवते झांक पापणी
कुणी बसला ग दडुन लोचनीं ?

**शशिलेखा :–** कां मन माझें कां बावरलें
प्रेम कुणाचें मजला जडलें ?

**१ली सखी :–** शशिलेखे ! तो संमोह नाहीं ग !
प्रीति-शर असे ताडुनी पाही ग !

**२ री सखी :–** शशिलेखे ! – सांभाळ हं बाई, सांभाळ ! . . . .

**१ ली सखी :–** मनास लावुनी गोड लळा
जीवास दावुनी आंस खुळा
गेला कुठें तो वेल्हाळा ?

**२ री सखी :–** मनांत फुलवुनि प्रीति मळा
प्रीति-हंस बघ दूर गेला !

**१ ली सखी :–** अग दूर कुठं गेलाय् ?

**२ री सखी :–** मग सांग कुठं हाय ?

**१ ली सखी :–** (दूर अंगुली निर्देश करीत)
त्या तिथें दूर दूर पलिकडे
क्षितिज पक्षी जेथें उडे !

**२ री सखी :–** अग कुठें ?—

**१ ली सखी :–** अग दिसतात पहा त्या—
नागमोडी पाऊल खुणा
सखीस बोलावुन त्या—
करतात पहा खाणाखुणा !
(सर्वजणी परत मोठ्यानें हंसतात.)

ग्रंथालय
ग्रं. क्र. 12370

**शशिलेखा :–** मुशाफिराचें जडतां पिसें
मन माझें झालें कसें कसें !

**१ ली सखी :–** तें घडणारच, आम्हाला कोण विचारतो बाई !

**शशिलेखा :–** घडायला जें नकोच होतें, नको तेंच घडलें !
कां मन माझें अघटित त्यावरि जडलें जडलें ?
अवचित कुठला यात्री आला
प्रीति-स्वप्नें उधळुनि गेला
दर्शन मात्रें चुंबुनि गेला सर्वांग थरथरलें !

बोलुनि गेला केवळ नयनें
प्रीति दिली केवळ स्मृतीनें
केवळ त्या मधुमय स्मृतीनें मुग्ध बावरलें !
सखी होत्या अंवतीं-भंवतीं
ओळख त्याची पुरती नव्हती
कोणाची पण धरितां भीति । भूल मज पाडिलें !
स्मृति स्पर्श तो करितां आदा
झाला मज तो केवळ बाधा
मनिं बावरें मी लज्जित राधा
स्वप्न सागरीं शोधीन त्याला मी बळेंच बळें !
(सर्वजणी जातात.)

**निवेदक :–** दोन जीवांची जाय ताटातूट होतां
वियोग–दु:खें पोळे बाळा, मनिं आर्तता
जशि उगवते नभांत स्वप्निल रम्य पहाट
विरल्या स्वप्नीं शशिलेखा जी रडते निमूट

× × ×

(शशिलेखेचा महाल, महालांतील मंचकावर शोकांत शशिलेखा बसलेली असून तिची सखी सतारीवर तिचा शोक शमविण्यासाठीं गीत गाते.)

**सखी :–** सखये वीणे, प्रिये प्रियतमे
हृदय–रंजन करि सुर–विभ्रमें !
स्मृति मधुरा गा निर्झरा
दु:खित काया खुलव सुंदरा
नाद सागरीं बुडव स्वर सुषमे !

मन तरंगीं उठवुनी स्वर
मधु मदिरा तूं जीवा धुंद कर
स्वप्न संगमा उजळ ग प्रियतमे !
प्रिय प्रणय मधु गीत चतुर
गाऊनि लावि गोड अंकूर
गीत रसरंगीं मनोकुरंग गमे !

**शशिलेखा :–** कसलें गीत अन् कसले स्वर
विरहपातें छेदें अंतर
अवचित मन कां होई उदास
वृथा मनोरथ व्याकुळ हृदयां
विरह शरानें विंधितो काया.
शापित मी सुख-वंचित झालें
दैवचक्र कां माझें फिरलें ?
मनी निरंतर धुमसति ज्वाला
त्या शमविण्या द्या विष प्याला !
ये कपाळीं दुःख दारुण
हृदया करी विदारण
मनि पेटतां जणुं अंगार,
कां छेडितां स्वर झंकार
अन् रुमझुमतां पायीं नूपुर
हृदया विंधी शापित स्वर !
विस्मरुनि मम प्रेम चिरंतन
कठोर केलें कां इतुकें मन ?
मदना ! कां आणशी आपदा
सतत मज घडूं दे प्रभु पदा !

(एकाएकी करुण संगीत खंडाचे आर्त स्वर विरून मंगलसूचक स्वर पार्श्वसंगीत खंडांतून उठतात. दोन सेवक कवि विल्हणाला बरोबर घेऊन शशिलेखेच्या महालांत प्रवेश करतात.

**सेवकद्वय :–** राजकुमारी ! जयजयकार !
जोडूनिया कर करी नमस्कार !
आज योजना प्रासाद मठीं
काव्यशास्त्रें सकल कलांहि
चतुरें तुम्हां शिकविण्यासाठीं

(शशिलेखेसह बिल्हणास प्रणिपात करून दोघे सेवक निघून जातात. बिल्हणाच्या अकल्पित योजनेनें शशिलेखा क्षणैक काल आनंदानें चमकून उठते. मंगलदायक स्वर उच्चतर होत जातात.)

**शशिलेखा :–** पुनरपि मी शृंगारीं नटलें
चिरतरुणी मी सदैव झालें !
मन दावी उगी अधिरेपण
आणि हृदयीं उठतें कंपन
करुनि प्रीतीचें गुंजन
वसन वधूचें नव मी ल्यालें !
उगी फडफडे अधिरें लोचन
पुनरपि फुललें आशा–जीवन
चिर–वांछित घडण्या प्रिय मीलन
पंचप्राण मम आतुर झाले !
रुणझुण करतीं पदीं नूपुरें
रुंजि घालती अल्लद वारें
दरवळतें मम सर्वांग सारें
तन्वांगांतुनि रंग उमलले !

नील नभीचें धवल चांदणें
मनांत गुंफी निळीं कोंदणें
निळ्या मनाचें निळें पारणें
प्रीती कोडें सांग कसें कळलें ?

( क्षणैक काल नृत्यसंगीत खंडाला सुरुवात होते. पैंजणांचा आवाज घुमूं लागतो. )

**बिल्हण :–** छुम् छुम् छुम् छुम्
वनि वसंत-रतीचें नर्तन चालें
थै, थै थै थै, तक थै, तक थै
रत नाद पाउलीं नूपुर गुंजलें !
स्वर रागांच्या मधुर संगमा
उजळती मनाच्या भावतमा
लयललित मधुमधुर ललकार घुमले
मन हरिता ललित नादस्वरा
तालावर घे आवर्त पुरा
ताल नादललित पद वलयीं तरले !
थै थै तक थै नृत्य रंगलें
( तोड्यांचा ठेका घुमूं लागतो. )
थय थय ता, थय गिडितन तक तुना !
धिगित् धिगित् धिगित् धा धा धा ।।
घुमले कड्यावरी कथ्थकी तोडा
हृदयां थरारुनि ओळवी गडबडा
विकल मनाची विफल संभ्रमा
उजळुनि टाकी प्रीति-सुषमा
सुकल्या नयनांच्या या कंचनी कडा
( वेणूचा धुंदिल धून घुमूं लागतो. )

नाद भरें मोद भरें कुंजवन डोले रे
कृष्णाच्या वेणूंनीं गोपीजन डोले रे
गोप-गोपिका झाल्या गोळा
रासक्रिडेचा जमला मेळा
भूवरती स्वर्ग येऊनि मोद मधु डोले रे

( डमरूंचा आवाज निनादूं लागतो. )

डमक डमक डम् डम् डमरू बोले
कडड् कडड् कड् तडित कडकडुनी बोले
गौरीशंकर सांब शुभंकर
जय जय गर्जति हे गिरिकंदर
तांडव प्रतापीं विश्व गोल हाले

( मृदुंगाचा आवाज घुमूं लागतो. )

उदितनि धन दिन, उदितनि धन दिन
मृदुंग गाई मधुरंगीं गाना
घेऊनि तानावरी घे ताना !

( सतारीचे धुंद स्वर छेडले जातात )

सा रे ग म प ध नि सा
सा नि ध प म ग रे सा
मधुर सतार ही सुखविते काया
सप्तसुरांची जी मोहन माया

**शशिलेखा :–** तूं नसतां गातां मज सारें कळतें
हृदयांतुनि तुझिया स्वरवेल मोहरते

**बिल्हण :–** तूं हंसतां गालीं मज सारें कळतें
मौनांतुनि तुझी प्रीत उकलते
तूं न बोलतांहि मज सारें कळतें

**शशिलेखा :–** शब्दाविण प्रीतीचें गूढ उकलतें

**बिल्हण :–** तूं न दावितां मुख सुंदर तुझें तें
स्मृतींतुन तुझ्या मज नयनां दिसतें !

(दोघेहि क्षणभर गीतांचे स्वर धुंदींतच गुणगुणतात. शशिलेखेला निरोप देऊन बिल्हण निघून जातो. शशिलेखा मंचकावर प्रीतीचीं स्वप्नें रंगवीत बसली असतां वीरसेन राजाला तिच्या प्रीतीचें गुपित समजल्यानें बिल्हणाला देहान्ताची शिक्षा फर्मावल्याची दुःखद वार्ता घेऊन दासी प्रवेश करते. वातावरणांत उदासीनता पसरून करुण स्वर वाढत जातात. )

**निवेदक** :– प्रीत चोरटें शशिलेखेचें अखेर नृपा सारें कळलें
क्रोधांतुनि अति कवीस सुळीचें शासन त्यानें जें फर्माविलें !
प्रियकराचें शासन ऐकुन शशिलेखा जी दुःखित झाली
तिची प्रीति निर्माल्य होऊनि कल्पित स्वप्नीं अदयीं विरली.

**दासी** :- तुझ्या प्रीतीचें नाटकी इंगित सखये नृपास सारें कळलें
क्रोधुनि अति मनिं कवीस सुळीचें शासन त्यानें केलें !

(दुःखवार्ता ऐकून शशिलेखा मूर्च्छित होते. तिची दासी तिला उठवून अलगदपणें मंचकावर बसविते. पार्श्वसंगीताचे करुण स्वर अधिक उच्चतर होत जातात.)

**शशिलेखा** :– तडफडते तळमळते आणि झुरते
मन माझें उदास जोगिया गाते
अपराधाविण कसलें शासन
घडे न आतां वांच्छित मीलन
मन आतुरलें प्रिया भेटायाते
प्रणया कां जगिं देती दूषण
प्रणय जगतीं ठरेच भूषण
गाती सारे जन प्रीतीचीं गीतें
ओठीं प्रीतिचे बोल नुरले
दारुण विरह अंतरि भरले
प्रीत ठरे स्वप्नच पुरते सखे
मम आंसवांत विरलें सारें
प्रीतीचे जे अग्नि निखारे
प्रेमशल्य अति हृदयीं सलतें

सुरमांकित जें काळें काजळ
नयनां पोळे होऊनि जाळ
अस्थिर मन माझें सलतें सलतें.

(विल्हणाला घेऊन दोन सैनिकांसह राजा वीरसिंह प्रवेश करतो.)

**वीरसिंह :-** धिक्कार असो या नराधमाला
चला नेऊनी सुळी द्यायला
आणि कारटे शशिलेखे तूं
शरम वाटावे तुझ्या मनाला !

× × ×

(करुण संगीत खंडाचे स्वर उच्चतर होऊन हलके हलके मंद होतात सैनिक विल्हणाला दण्डाला पकडून नेताना ...)

**बिल्हण :-** "अद्यापितां कनक चंपक दामगौरीं।
विद्यां प्रमादगलितामिव चिन्तयामि।"
प्रीतीच्या धुंदींतच प्रीत जन्मतें
आणि शेवटीं अंत प्रीतित होते।
प्रीति कपाळीं असे अंतिम प्रीतिलेख
प्रीतिगीत जगिं गाती लाखोंलाख !

**निवेदक :-** पाहुनि कवीची उत्कट प्रीती हृदय नृपाचें विरघळलें
मरणांतरहि प्रीति अमर असे हें वच नृपास पुरतें कळलें!

**वीरसिंह :-** धन्य कविवरा। धन्य तुझी प्रीति
कर कन्येचे दिले तुझ्या हातीं
अन् शशिलेखे ! तुझिया प्रीतीची
होई आतां गे इच्छा पूर्ति !

(राजा एकमेकांच्या हातांत एकमेकांचे हात देतो. दोघेहि आनंदानें परस्परांच्या गळ्यांत पुष्पहार घालतात. वातावरण आनंदानें उजळून निघतें. पार्श्वसंगीताचे मंगल स्वर घुमून उठत असतांच पटक्षेप.)

★★★

उर्वशी

## कथासूत्र :

स्वर्गलोकीच्या इंद्रदरबारीं एकदां नारदानें पृथ्वीवरील पुरुरव्याच्या गुणांची पुष्कळ स्तुति केली असतां दरबारीं अप्सरा – उर्वशी ही त्याच्या गुणांवर अत्यंत लुब्ध झाली; आणि याच वेळीं मित्रावरुणांचा तिला भूतलीं जाण्याबद्दलचा शाप झाला म्हणून ती पृथ्वीवर आली असतां केशी नांवाच्या राक्षसाच्या तावडींत सांपडली. पुरुरव्यानें तिची राक्षसापासून सुटका केली, पण तो तिच्या प्रीति-कैदेंत अडकला गेला. उर्वशीनें त्याच्या प्रणयपूर्तीसाठीं ज्या चमत्कारिक अटी घातल्या त्या अटींचा भंग झाल्यास ती त्याला त्यागणार असेंहि तिनें सांगितलें. पुरुरव्यानें त्या अटी मान्य केल्या.... पुढें उर्वशी ही गंधर्वांची अत्यंत आवडती असल्यानें त्यांनीं तिला परत स्वर्गांत आणण्यासाठीं एक युक्ति योजिली. एके रात्रीं मंचकाला बांधलेला मेंढा गंधर्व चोरून घेऊन चालले असतां उर्वशीनें ओरडा केला तेव्हां पुरुरवा

हा उर्वशीकरितां नग्नावस्थेंत त्याच्यामागे धावला असतां विजेच्या प्रकाशांत तो उर्वशीला नग्न दिसला. तेव्हां उर्वशीनें कराराप्रमाणें त्याचा त्याग केला आणि ती स्वर्गलोकांत निघून गेली.

पुरुरव्याचा उर्वशीनें त्याग केला आणि काय ? — पुरुरव्याच्या मनावर या घटनेचा जोराचा आघात बसून तो अत्यंत दुःखी झाला. किंबहुना वेडा होऊन इकडे तिकडे भटकूं लागला. आणि पुढें....

***

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक ८५०९४ दि:
क्रमांक ९६०३८ नों. दि:

पात्रें :

- उर्वशी
- पुरुरवा

## पूर्वरंग :

ही संगीतिका महाभारत-कालीन घटनेवर आधारित असून पुरुरवा–उर्वशी या प्रेमी युगुलांच्या प्रेमकूजनांतील पुरुरव्याच्या प्रणयभंगाची ही शोकांतिका आहे.

या संगीतिकेचे दोन खंड पडतात. पहिला खंड स्वर्गलोकांतून शृंगार–पुतळी उर्वशी पृथ्वीवर येऊन पुरुरव्याला नेत्र-कटाक्षानें मोहित करते. या प्रसंगीं दोघांचें प्रेमभरित संवाद संभाषण होतें. या प्रसंगाला शृंगारिक पार्श्वसंगीतानें उठाव आणतां येईल. कोकिलेचें कूजन, नूपुरांचा मादक आवाज, निसर्गातील वनश्रीचें उत्तेजक वातावरण इत्यादि पार्श्वभूमि निर्माण करावी.

दुसरा खंड पुरुरव्याची प्रेमपूर्ति झाल्यानंतर प्रेमभंगाचा आहे. पुरुरव्याचा उर्वशीनें त्याग केल्यानंतर पुरुरव्याला बसलेला धक्का अधिक परिणामकारक करावा. येथें पार्श्वसंगीताच्या साहाय्यानें करुणार्त स्वरांचा उपयोग करून प्रसंगाची अनुरूपता वाढवावी. शक्य तेथें प्रकाशाची योजना करावी. उर्वशी–पुरुरव्याचा पोषाख अप्सरा आणि राजाला अनुरूप मौल्यवान वस्त्रालंकारांचा व ऐश्वर्याचा असावा.

***

## उ र्व शी

**निवेदक :–**

एके दिवशीं इंद्रसभेच्या राजस दरबारीं
नारदमुनिनें पुरुरव्याची केली स्तुति भारी
पुरुरव्याचें रूपौदार्य–शूरता ऐकून
देव–देवता सकल मुनीहि गेले संतोषून

रंग सभेच्या सकल अप्सरा सुकुमार सुंदरी
गेल्या मोहून पुरुरव्याच्या पराक्रमावरी
मीन लोचना उर्वशी जी मदनाची पुतळी
पुरुरव्याच्या रूपावरती पुरेपुर भाळली

भू–राजाच्या अभिलाषेस्तव मधुमादक अंगीं
मदन मोहरे ये सर्वांगा जी धुंदिल गुंगी
निदिध्यास रत पुरुरव्याचा मनाशीं लागून
पूर्तिकरितां भूवरीं आली वेगें स्वर्गांतून

पृथ्वीवर ती अवतरतां जी सुकुमार सुंदरी –
हास्य प्रभा प्रगटली जयिं वसुंधरा अधरीं
हंसल्या दाही दिशा उजळुनि हर्षें मनोमनीं
वनावनांतून घुमघुमली जीं गंधांकित गाणीं

सौख्यें मोदें दृष्टि फिरवी वरती अन् खाली
अवलोकुनिया शोभा येतां वृक्ष–सावली
उभी समोरी उर्वशी जी मदनाची पुतळी
मादक बिजली मदनाची जी मनांत सळसळली

नील नभीचा मेघ सांवळा करूनि जो संचार
गर्जत गर्जत षड्जामधुनी बोले मधु सुस्वर
तैसा राजन् मधुरा मंजुळ करूनिया अभिसार
पुसे नारीस कोण कुठली ? पुरता समाचार

मंजुळ वचनीं उत्तरली ती शुकशुभांग गौरी
सुर लोकाची परी उर्वशी मी सकल सुंदरी

सूर लोकीं मी अगाध सत्ता चालवितें भारी
इंद्रादिकहि मोहित होती माझ्या रूपावरी
परस्परांच्या हृद्‌विणेवर बोटेंहि फिरकतां
धुंदिल सुस्वर लहरींतुन ये मधु मधुर संगीता !
अन् नजरेशीं लाडिक सलगी करतां मधु चाळे
प्रीति लज्जित मनोमनोमय विश्वहि रंगलें !

(पुरुरव्याला उर्वशीच्या दर्शनानें अत्यंत आनंद होतो. तो तिजबरोबर प्रेमाच्या गोष्टी करीत राहतो. वातावरणांत प्रसन्नता नांदत असून संगीताचे प्रेमोन्मादक स्वर मनाला अधिकच सुखवितात.)

**उर्वशी :–** दो जीवांचें जुळलें नातें
नयन बोल जे नयना कळते !
उठे मनिं स्वर लोल लहरी
लय गीत गात मधु विभावरी
स्वप्नांतच मी धुंद नाहते !
रसरंगसंगीं रंगित गाणें
रजतरसामधि धुंद चांदणें
नजर चोरटी हृदयां सलते !
झालें मन मम अति प्रसन्न
स्वप्नावरती डोले तनमन
प्रेमें उडतें नेत्रपातें !

**पुरूरवा :–** सखे जिवलगे, सुकल्या ओठीं
स्वर्गामृतचि पहा विरघळलें !
तव प्रीतीनें मिटल्या नयनीं
मम प्रीत ज्यांत उजळ तेवलें !
अधरीं सस्मित गुलाबी गुंफण
नजरेची करि भिरभिर गोफण
वाक्सुमांची रंगित पखरण
सलत्या हृदीं भाव जागले !

नयनीं भिजली निळी सावली
ओठीं विरली लज्जा लाली
रंग रक्तिमा टपोर गालीं
हृद्‌पटावरि बिंब ठसलें !
शब्दरंगी भावसंगी
स्वप्निल धुंद नयन कुरंगी
सुललित वसना दिसे शुभांगी
उरोज उन्नत मदभारानें नागीणच डुले !
खटयाळ यौवन धुंद भुलावण
नजर चोरटी जाते थिरकुन
मन पंछी करी प्रीति गुंजन
धुंद केवडा मरवा अंगीं मन रुमझुमलें !

(दोघेहि प्रेमाराधनेंत मश्गुल झालेले असून दोघांच्याहि मुखावर प्रीतिसाफल्याची भावना उजळलेली आहे.)

**उर्वशी :-** शांत छेडितां मानस वीणा
स्वर सुखविती तृषित कर्णा
चैतन्य मिळे तरुवेलींना
चराचरांतुन गंध दरवळे

**पुरुरवा :-** पुनवेच्या ज्या रंगित रात्रीं
मंद निशिगंध सांडे गात्रीं
स्वप्न तरळें गीत होऊनी
स्वरगंध मनिं झणत्कारिले !

**उर्वशी :-** प्रेमोन्माद कां अजुनि सरेना ?
सुखद लाट कां अजुनि विरेना !
प्रीति मनाची आणि शमेना
तव प्रीतीचें परिस लाभलें !

**पुरूरवा :-** सहगम अपुल्या क्षाळुनि काया
प्रीति मंथन चला करूं या
संगमांत नत विरुनि हृदया
प्रीत मीलनां अधिर मन झालें !

(पुरुरवा उर्वशीच्या दंडाला धरून पर्णकुटींत प्रेमपूर्ति करण्यासाठीं घेऊन जायला लागतो; पण उर्वशी त्याला नकार देते आणि त्याच्याकडून कांही अटी मान्य करून घेते.)

**उर्वशी :-** अधीर नका असे होऊं प्रियकरा
प्रेमसंगमा मम आंस पूर्ति करा
युगांतरीचा मम मिळविण्या प्रीत-कोष
पुत्रवत पाळा मम जिवलग मेष
संगमाविणा दिसे कधि सख्या
तव वस्त्र विमलित नग्नांकित काया
ज्या क्षणीं होई मम वचनाचा भंग
तत्क्षणींच प्रीति अपुली हो दुभंग !

**पुरुरवा :-** तव 'पण' मज मान्य असे पुरा पुरा
मन आसुसलें मम त्वरें चल जरा

(दोघेहि पर्णकुटींत प्रवेश करतात. संगीत खंडाच्या पार्श्वभूमीवर प्रेमोन्मादक स्वर उठतात. क्षणैक काल मदनधुंद वातावरण निर्माण होऊन पक्षांची प्रेमसूचक कूजनें ऐकूं येऊं लागतात.)

**निवेदन :-** प्रीति सतारीं उठली धूंदिल
स्वरवेडी नादकंपनें
आशा-वेलीं मोदें खुलतीं
भावखुळी जीं मनगुंजनें
असें पुरुरवा-उर्वशीचें
जयि होतां मीलन एकांतांत
इंद्रें धाडिले गंधर्वाला
उर्वशीस शोधण्या त्वरित

कपटें गंधर्व मेषां नेत
राजा लागे तया मार्गासि
तेजें पडतां प्रकाश दीप्ति
नग्न दिसे राजा सखीस

वचन-भंगता आणिक होतां
तत्क्षणीं ती गुप्त जहाली
नृप त्यागितां प्रिय सखी तो
प्रेम विव्हळ पडे भू-तळीं !

( वातावरणांत क्षणभर करुण, गंभीर शांतता पसरून उठते, आणि संगीत खंडाच्या पार्श्वभूमीवर करुण रसाचे गंभीर स्वर उठले जातात. पुरुरवा मूर्च्छित होऊन पडलेला असतो तो उठून शुद्धीवर येतो, आणि कपाळावर हात मारून शोक करीत बसतो.)

**पुरुरवा :-** प्रिये प्रियतमे !
सोडुन मज तूं कोठें गेली ?

प्राण तळमळे
काया निपचित हो मम पडली !
अश्रूंनीं मम भरलें लोचन
मेघ दाटे मनिं अकारण
तव विरहाचें करितां रोदन
माथ्यावर मम—
विद्युत् नभीची कोसळली !
ओठीं प्रीतिचे बोल नुरले
घोर विरहें अंतर भरलें
सौख्य सुखाचे दिन ते सरले
भाव भैरवी—
अस्ताईतच कां ती विरली ?

मन्मतीची होई काहिली
चुंबनें निरस आज गमलीं
धुंद संगमीं गरलता भरली
मम प्रीतीची—
आंस सारी स्वप्नांतच विरली !
सखे प्रियतमे ! . . . .
जिव – जिवलगे ! . . . .
प्राण प्रियतमे ! . . . .

(रंगमंचकाच्या अग्रभागावर कपाळाला हात लावून पुरुरवा निपचित पडतो. संगीत खंडाचे करुण स्वर उच्चतर होत असतांनाच पटक्षेप. )

***

रा जा उ द य न

## कथासूत्र :

कौशांबी नगरीचा राजा उदयन हा अतिशय धर्मनिष्ठ नि सत्त्वशील असा होता. त्याच्या सात पत्नींपैकीं पट्टराणी विभावरी हीहि सात्त्विक आणि बुद्धदेवावर भक्ति करणारी होती.

एकदां संचार करीत भगवान् बुद्धदेव कौशांबी-नगरींत आले आहेत ही वार्ता विभावरीस समजते. तिला अत्यानंद होतो आणि ही सुवार्ता ती आपल्या पतीला बुद्धदेवाच्या अति मनोनिग्रहाचें वर्णन करून सांगते. राजा उदयनाच्या मनांत या वेळीं बुद्धदेवाच्या मनोनिग्रहाची परीक्षा घ्यावी असा विचार येऊन तो लटकेच विभावरीपुढें बुद्धदेवाची निंदा करूं लागतो. आणि प्रत्यक्ष जेव्हां बुद्धदेवाची परीक्षा करण्याचा प्रसंग येतो, त्या वेळीं विभावरी-ऐवजीं आपण स्वतःच विभावरीच्या वेषांत बुद्धाची सेवा करण्याच्या निमित्तानें त्याचें मनोहरण करावें आणि स्त्रीमोहांत त्यास फसवून त्याच्या मनोनिग्रहाची परीक्षा घ्यावी असें कपट-नाटक रचतो.

कपट-नाटक सुरूं झाल्यानंतर बुद्धदेवाचें मन अनेक मार्गानें वळविण्याचा प्रयत्न करूनहि जेव्हां बुद्धदेव

मोहवश होत नाहीं, तेंव्हां राजा उदयनाला पश्चात्ताप होऊन तो बुद्धाच्या पायीं आपलें मस्तक नत करतो.

— आणि शेवटीं आपल्या सात राण्यांसह तो बुद्धधर्म स्वीकारतो.

★★★

**पात्रें :**

- राजा उदयन
- राणी विभावरी
- बुद्धदेव
- राजाच्या इतर सात राण्या
- सैनिक, शिपाई व इतर पात्रें.

# पूर्वरंग !

वीतरागी बुद्धाच्या जीवनांतील एका महत्त्वाच्या – अग्नि-दिव्याच्या प्रसंगावर आधारलेली ही भावमधुर संगीतिका आहे.

या संगीतिकेचे तीन खंड पडतात. प्रथम खंडांतील प्रसंग राजा उदयनाच्या राजमहालांत घडतो. रंगभूमीवर राजवाड्यासह राजमहालाचें वैभव निर्माण करावें. बुद्धदेवाच्या स्वागताची तयारी होऊं लागल्याची कल्पनाहि पात्रांच्या धावपळीमुळें यावी.

दुसरा प्रसंग राजमहालांतील पूजागृहांत घडतो. पूजागृह पूजेच्या साहित्यानें युक्त असावें. विशेषतः बुद्धाला मोहपाशांत पाडण्याच्या संकल्पाप्रमाणें विभावरी-वेषधारी राजा शृंगाराच्या अभिनिवेशानें धुंद असावा. या ठिकाणीं विविध रंगाच्या प्रकाशाची कुशलपूर्ण योजना करून मदनधुंद वातावरणाची निर्मिति करावी. सोबत शृंगारोत्तेजक संगीत स्वरांची साथ द्यावी.

तिसरा प्रसंग राजवाड्याच्या उपवनांत असलेल्या वधस्तंभा-जवळ घडतो. हा प्रसंग अधिक भेदक आणि उत्कट व्हावा अशी खबरदारी घेतल्यास या प्रसंगाला उठाव येईल.

बुद्धदेवाचा पोषाख संपूर्ण वीतरागी, वैराग्यपूर्ण असावा, व उदयन, विभावरी व इतर राण्यांची वेषभूषा वैभवसंपन्न असावी.

प्रसंगानुकूल संगीत स्वरांची व प्रकाशाची योजना व्हावी. पार्श्वसंगीत खंडांतून तुतारी, कर्णे, सनई, चौघडा, नगारा इ. देशी वाद्यांचाच उपयोग करावा.

★★★

(**स्थळ** : कौशांबी नगर. बुद्धाच्या आगमनामुळें तुतारी, नगारे, कर्णे–सनई आदि मंगलसूचक वाद्यें वाजूं लागतात. पौरजन अत्यानंदानें बुद्धाच्या स्वागताची तयारी करूं लागतात.)

**उद्घोषक** :– (पडद्यांतून घोषणा करतात.)

सावधान ! सावधान !!
ऐका पौरजनांनो, ऐका सुमंगल गान
आले वितरागी महा बुद्ध देव निर्वाण
देऊनि मरणा अजय आव्हान
फुलविलें देहीं नव संजीवन
चौऱ्यांशी योनीचें सारें तत्त्व शोषून.
कषाय वस्त्र देहि विराजे
वैकल्य मूर्ति ओंकार साजे
मृत्युंजय व्याधींचा चक्रवर्ती योगिन् !

(पडदा उघडतो. राज मंदिराचें दृश्य, राणी विभावरी आपल्या सखी संध्या नि उपादि समवेत फुलें उधळित बुद्धाच्या स्वागताची तयारी करूं लागलेली आहे.)

**विभावरी** :– चला सखींनो, करा साजशृंगार
शुचित पावलें बुद्धदेव येणार
आक्रमुनि पथ घोर तपाचा
निवृत्तीचा वैराग्याचा
प्रसन्न करा ग उदास तव अंतर !
पौर जनांनों, गुढ्या उभारा
मंगल तोरण बांधा नगरां
आनंदानें भरूं दे धुंद सागर !
युगायुगींची मम पुण्याई
आलें फलास अघटित बाई
घड्या फुलांच्या घाला पथीं सुंदर !

नभांगणींच्या सुरबालिका
उभवा भूवरि रंगवल्लिका
तेज पखाली करा रित्या भूवर !

(सर्वजणी फुलें उधळित जातात. रंगमंचकावर विभावरी तेवढीच समईतल्या वाती वर चढवीत उभी असते. इतक्यांत राजा उदयन प्रवेश करतो.)

**निवेदक :–** येतां राजन् राजमंदिरीं
झाला दिङ्मूढ वहु अंतरीं
जाऊनि पुसतो राज्ञी निकट
सांग प्रिये कां काया पालट ?

**विभावरी :–** सुभाग्य अपुलें आज उदेलें
बुद्ध देव अजि नगरां आले
मूर्ति सांवळी वैराग्याची
योगियांचा योगिन् साची
जरा-मृत्यूचें चक्र तोडिलें
व्योम व्यापिते ज्याची मनिषा
कवेंत ज्याच्या विश्व कोषा
ब्रह्माण्डाचें रूप पाहिलें

(विभावरीचे हे उद्गार ऐकून राजाला बुद्धाची सत्त्वपरीक्षा घेण्याची लहर येते. आणि यावर तो बुद्धाला मिथ्याच बोल लावतो.)

**उदयन :** पुरे प्रशंसा वैराग्याची
फसवित सुटला जगतां साची !
करिन तयाचा तपोभंग मी
हरीन शांतीसत्त्व गनीमी

**विभावरी :–** (कानांवर हात ठेवून.. )
शिव ! शिव ! !
काय वदतां अमंगळ त्यालें ?
अभद्र वाणी हो दोषांते !

**उदयन :–** (राणीच्या कानाशीं कांहीतरी गुपित सांगण्याचा अभिनय करीत.)
सखे, साकारली एक कल्पना मनीं
कपट नाटक पाहूं गे योजुनी !

**विभावरी :–** नका धरूं मनिं उगी वल्गना
बुद्धाची मज पुरी कल्पना
विष परीक्षा कोण घेई का ?
गगना गवसणी कोण घाली कां ?

**उदयन :–** बुद्धमनाची घेऊं परीक्षा
जाऊं शरण वा, ना तरि शिक्षा !

**विभावरी :–** ( हर्षानें )
कपटनाटकीं हार हो जरी
मग बुद्धधर्म स्वीकार करी

**उदयन :–** ठरलें देवी ! अभय तव करीं
नाटकास गति कशी भरी !

( **स्थळ :–** राजमंदिर. शृंगारलेलें पूजागृह. रंगभूमीच्या मध्यावर सुवर्णासनावर गौतमबुद्ध तपाधिष्ठित झालेले असून त्यांच्या दोन्ही बाजूला दोन रत्नदीप तेवत आहेत. पूजासाहित्यासह विभावरी गौतमाच्या समोर बसून पूजा आटोपूं लागलेली आहे. तिच्या सान्निध्यांत तिच्या दोघी दासी — संध्या नि उषा उभ्या असून त्या विभावरीला पूजेस मदत करीत आहेत. मंगलवाद्यांचा पुसट ध्वनि मधून मधून उमटलेला आहे. )

**विभावरी :–** पूजिन बुद्धां मम देव्हारीं
मनोकामना पुरवतिल तरी
सौंदर्याची सारी किमया
विणीन त्याची मोहन माया

प्रीती पंकीं फसेल ना तरी
भावतंतुनीं प्रीति सुंदर
विणेन मृदुल उदास अंतर
अनंग मनास घायाळ करी
कटाक्षपातें मनास विंधिन
यौवन रंगीं मत्त झिंगीन
बुद्धत्वाची फोड करि पुरी

( गौतम आपल्या ध्यान समाधींतून जागे होतात. विभावरी त्यांच्यापुढें हात जोडून वंदन करीत . . . . )

धन्य झालें आज किती मी
अर्पुनि सेवा तुझिया कामीं
अनुसरूनिया मदिय अर्चना
पादसेवा तव घडवी मन्मनां
भाग्य उदेलें मम विरामीं
राजगृहाचा करितां त्याग
विश्व शांतीची अंतरीं आग
व्योम व्यापिलें तुझिया नामीं
(संकोचून) परि बुद्धदेव ! क्षमशि मजला
' एकांति व्रत ' कां अनुसरिला ?

**बुद्ध** :- (चमकून) -देवी, एकांति व्रत ?
काय तूं वदसि मला न उमगे
कसलें व्रत हें वच ना वेगें ?

**विभावरी** :- (हंसून) बुद्धदेव ! कां तुम्हां न उमगे ?
वदवितां मुखे कां अनुरागें ?
निमंत्रिलें कां तुम्हां एकांति
राजाच्या या अपरोक्ष राति
न आठवे कां संगत अनंग
जयी खेळला शृंगार रंग !

**बुद्ध :–** (कानांवर हात ठेवून) शिव ! शिव !!

काय वदशि हें अमंगळ तूं तें
वृथा वचनां काय शिणविते !
कां आलों मी या पाप-पंकीं ?
कालिंदी ती रम्य तटाकीं
शुद्ध हरवलिस तूं कां उन्मनीं ?
जागृति जाग शुचित्वा निदानीं

**विभावरी :–** शुद्धित वदें मी महाराज
बुरखा सारुनि करा हितगुज !
अन् वेड्याचें कां घेतां सोंग ?
लुटा मम धुंद यौवन तरंग
फुका न घाला सुवर्ण हा क्षण
निर्माल्य कळी उमलें उन्मन !

**बुद्ध :–** अंतीं यौवन मिळें मातींत
लावण्य होय राख क्षणांत
अन् सारें इथें क्षण-कणाचें
कोण न कुणाचा–भंगुर साचें

**विभावरी :–** जन्म मृत्यूचा फोल संकेत
कुणास ठावें कुणास अंकित ?
करा सिद्धता सत्वरि आतां
क्षणास भजी क्षण जागतां !

**बुद्ध :–** अजुन अज्ञ तूं मूढहि बाला
नसे विदग्धहि विचार माला
देवी ना देऊं मरणां-आव्हान
वीतरागी मी देईन प्राण
पापपंकीं पद रुततां संतत
देह अडकेल व्याधि-वेगांत

**विभावरी :–** क्षणैक सारें विसरा देवा
अर्पुनि घ्यावी मनोज्ञ सेवा
माझी दृष्टि प्रेम शोधित
मधु गोड आस मनीं वहरते
नक्षत्र नभींची विणता रात्र
चंद्रिका करी तेज वरसात
भृंग रुंजितो कमल कोषांत
स्वप्न धुंद मधु फुले जोषांत
पिऊन वारा नाग मंथरा
केतकी वनांत करि अभिसारा
नयन ज्योतीस हवी प्रीति वात
वा वीज होऊनि ती करी पात !

**बुद्ध :–** शिव ! शिव ! !
काय ऐकतो भलतें सलतें
कटु शब्द मम मनां विंधिते
जाग आपुल्या धर्माला निज
सतीची ठेव जरा तरि बुज !

**विभावरी :–** कसला धर्म नि कर्महि राया
सारेंच भूल, शाब्दिक किमया
अजुन ना कळें तुज रूप-रहस्य
जरा–शृंखला सुटतें लास्य
(थोडेसें विनवून...) दिसे न कां मी मनोज्ञ रती
घ्यावी सेवा माझी विनती
मूर्तिमंत मी उमा सामोरी
लावण्यें मी मारि भरारी
अंगांग नाहून मधु किरणांनीं
प्रीत मागणें तुझ्या निदानीं

**बुद्ध :–** प्रभो ! कैसे तुटतिल बंधन ?
जागपणीं मज ओढवें मरण !

**विभावरी :** प्रेमच मात्रा या मुक्तीला
अमरत्वाचा अमृत प्याला !

**बुद्ध :–** (कानांवर हात ठेवून) शिव ! शिव !!

(पुन्हा गौतम ध्यानस्थ होतात. ते ध्यानस्थ झाल्यानंतर विभाव-रीच्या सर्व सखी शृंगारादि साधनांनीं नटून पूजागृह शृंगारिक साधनांनीं सजवून गाणीं गात प्रवेश करतात.)

**१ नर्तिका :–** रंग भरा ग रंग भरा, तुम्ही अनंग चषकांत
वैराग्याचा होईल लोप एका स्पर्शांत
यौवनोत्सव करा साजरा
रसरंग गडे मधु त्यांत भरा
कटाक्षपातें मना विंधून अंजन डोळयांत

**२ री नर्तिका :–** उत्फुल्ल नयनीं घाला सुरमा
नखांत चढवा मेंदि-रक्तिमा
भाळीं लेऊनी चंद्रकुंकुमा तळपा जोषांत

**३ री नर्तिका :–** विद्ध करा ग कटाक्ष बाणीं
आग भडकवा अंत:करणीं
ओढा त्याच्या मन:सुधीला अनंग कोडयांत !

(सर्वजणी टाळयांच्या गजरांत बुद्धाला वेढतात. थोडया वेळानें त्यास जाग येऊन तो दिङ्मूढ होतो. महालांतील सर्व वस्तूंकडे न्याहाळतो, आणि अशा वेळीं नर्तिका जातात व विभावरी तेवढीच त्यांच्यापुढें उभी राहते.)

**विभावरी :–** फसेल आतां यौवनपाशीं
मोहा वेढून होई नाशी

**बुद्ध** :-(संभ्रमांत) कुठुन उठति हे उन्माद स्वर
उग्र फुलांचा दरवळे बहर
कुठें लोपल्या मंगल मूर्ति
दिव्यत्वाची येथ प्रचीति !
मादक चित्रें येथ दिसतीं
कामुकतेची केवळ पूर्ति
जागोजागीं फुलें सुवासिक
घालती मनास जाळें मोहक
उलें मंदिरिं मधु अत्तरें
अन् उटण्याचा जयिं दर्प विरें
रुणझुण करती इथें पैंजण
मरणाला जणुं घालति विझण
प्रीतीची ही उन्माद गीति
कोण छेडिती या एकांतीं ?
स्वप्नांतरिं मी नाहीं फसलों !
आणिक जरि कां जागा चुकलो ?
( दरवाज्यांतून हास्यध्वनि उमटतात. )

**विभावरी** :- ( विनवून )
कळी-पाकळी लागे बहरूं
समईची वात लागली सरूं
मधुरात जाऊं लागली कलत
नको साजणा पाहूं रे अंत !
(विभावरी बळेंच त्याचे हात धरूं लागते. तो रागावून तिला झिडकारतो)

**बुद्ध** :- धिक्कार कुलटे धिक्कार जन्मा
कामाग्नि तूं भस्म अधमा
स्त्रीजन्मा कां लावी कलंक
नरकीं पडुनि जा बेलाशक

**विभावरी :–** रे वैराग्या कां वडबडशी ?
कटु बोल लावी तूं कोणाशी ?
पट्टराणी मी या नगरीची
क्षीति कुणाची मज रोधण्याची
करील कोणी आज्ञालंघन
देईन त्यास मी घोर मरण.

( विभावरी टाळ्या वाजवून सेवकांस बोलाविते. सेवक हातांत तरवारी परजून येतात. ती त्यांना आज्ञा फर्माविते. )

सेवक हो, 'त्या वैराग्याला
नेऊनि बांधा वधस्तंभाला !
उदयापूर्वी याचें जीवन
यमलोकीं तें घेईल लोळण !'

( क्षणैक रंगमंचकावर अंधार पसरून पार्श्वसंगीतावर करुण स्वर उठतात. बुद्धाला घेऊन सेवक जातात. )

× × ×

(**स्थळ** : राजवाड्याचें उपवन. बुद्धाला वधस्तंभाला बांधलेलें असून त्याच्या सभोंवतीं आठ वेषधारी मारेकरी हातांत तरवारी परजून सरसावून उभे आहेत. रंगमंचकावर मंद पुसट प्रकाश पहाटेच्या वेळेची कल्पना देतो.)

**निवेदक :–** काय ठरलें अंतीं संकेत ?
'स्वीकार मम' वा 'मरणाला साथ' !
(कठोरतेनें) मम प्रतिस्तव दे ही संधी
देहान्ता मग घालिन बंदी

**बुद्ध :–** निश्चयाचा कधि न हो अंत
तत्त्वाकरितां साहीन मरण

मरणानें मम जिव्हा उठतील
अन् निष्ठेचा घोष करतील !

**विभावरी :–** मरणा हो तूं वळेंच तयार
भाव मनीचा पाहिन सत्वर

(विभावरी मारेकऱ्यांना तरवारी उगारण्याकरितां आज्ञा करते.)

उडवा उडवा याचें मस्तक
उडवुनि टाका प्रीति-कंटक

(सर्वजण आपल्या तरवारी उगारून त्याला मारण्याकरितां सज्ज होतात. बुद्ध आपल्या वक्षःस्थलावर हाताचें स्वस्तिक करून मस्तक नत करून धीरगंभीरतेनें मरणाला सज्ज होतात. स्वतः विभावरी वधस्तंभावर चढून त्यांच्या गळयास फांस लावते. बुद्ध धीरगंभीरतेनें मंत्रांचा उच्चार करतात.)

बुद्धं सरणं गच्छामि ।
धम्मं सरणं गच्छामि ।
संघं सरणं गच्छामि ।

(आतां फांस ओढला जाणार तोंच वेषांतरित राजा उदयन आपलें अवगुंठन बाजूला सारून बुद्धाच्या पायांवर आपलें मस्तक ठेवतो व त्यांना अभय मागतो. )

**उदयन :–** क्षमस्व मुने ! क्षमा करा !
न जाणिलें मी तुम्हांस पुरा
निग्रहापुढें मी हरें पुरा
द्या सदाचा अभय उदारा !
कपट नाटकी वेषांत राजन्
न मी विभावरी, असे उदयन !

**बुद्ध :–** (आश्चर्य मिश्रित आनंदानें) उठ राजन् कोशांबी पति राजेश्वरा,
सुश्रुत नाम, नट शोभे खरा !

**उदयन :–** मुने क्षमस्व; द्या आधि अभय
करीन मी तव सेवा निर्भय

**बुद्ध** :– (उदयनाला उठवीत) राज, सदा तुज दिलें अभय मी
विकारविण हा वीतरागी मी
(आठवून) आणि हो ! कुठें आहे राणी
थोर पतिव्रता, दिव्य खाणी !

(त्या अवगुंठित व्यक्तींपैकीं एक व्यक्ति आपलें अवगुंठन बाजूला झुगारून गौतमाच्या पायांवर आपलें मस्तक ठेवते.)

**विभावरी** :– पदारविंदीं प्रणाम देवा !
उभयतां आम्हां अभय द्यावा

**बुध्द** :– अभय तुम्हांला ?– तुम्ही तर गुण भांडार
(बाकींच्या व्यक्तींकडे पाहून...)
हो ! या नाटकीं हीं पात्रें कोण थोर ?

**उदयन** :– कपट नाटकीं हीं पात्रें अवगुंठित
अभिनय चतुर, राण्या माझ्या ह्या सात !
(सर्वजणी आपलें अवगुंठन बाजूला सारून बुद्धाला प्रणाम करतात)
मुनिवरा ! चरणिं अपुल्या एक मनीची आस
बुद्धधर्म सेवण्या द्या अनुमति आम्हांस !

**गौतम** :– तथास्तु !—
धन्य उदयना ! अन् विभावरी
विश्वप्रेम मनिं तुम्हां वास करी !

(सर्वजण बुद्धाच्या समोर हात जोडून वंदन करतात. सूर्योदय होऊं लागतो. आनंदानें वातावरण पुलकित होऊं लागतें. मंगलसूचक वाद्यांचे स्वर कानांवर येऊं लागतात. बुद्ध आपल्या वक्षःस्थलावर हाताचें स्वस्तिक करून त्यांना बौद्ध धर्माची दीक्षा देतात.)

**बुध्द** :– बुद्धं सरणं गच्छामि।

**सर्वजण** :– बुद्धं सरणं गच्छामि।

**बुध्द** :– धम्मं सरणं गच्छामि।

**सर्वजण** :– धम्मं सरणं गच्छामि।

**बुध्द** :– संघं सरणं गच्छामि।

**सर्वजण** :– संघं सरणं गच्छामि।

(मंत्रध्वनि धीर गंभीर पार्श्वसंगीतावर परिणामकारक होत असतांनाच पूर्णपणें सूर्योदय होऊन पटक्षेप.)

★★★

# चित्र-दर्शन

## कथासूत्र :

वनवासगमनानंतर प्रभु रामचंद्र लक्ष्मण-सीतेसह अयोध्येस आल्यावर त्यांचा थाटानें राज्याभिषेक होतो. या आनंदाच्या प्रसंगीं सीता गर्भवती असल्याचें समल्यावर सर्वांच्या आनंदांत अधिकच भर पडते. सीतेचे डोहाळे पुरविण्याचीं स्वप्नें श्रीरामचंद्र मनांत योजतात. परंतु राज्याभिषेकाच्या वेळीं वसिष्ठांकडून मिळालेल्या 'प्रजानुरंजन करणें हें तुझें परम कर्तव्य आहे. यांत तूं कधीहि खंड पडूं देऊं नकोस,' या गुरुमंत्राला जागून कर्तव्य-पालनासाठीं प्रसंगीं जानकीचा त्याग करण्याचा जरी प्रसंग आला तरी करीन!' अशी राम प्रतिज्ञा करतो.

कर्तव्यपालनाप्रीत्यर्थ प्रजेची हालहवाल समजण्याकरितां तो आपला विश्वासु सेवक दुर्मुख याला नगरांत पाठवितो. दुर्मुख परत येऊन सर्व कुशल-समाचार रामाला निवेदन करून सीतेच्या चारित्र्याविषयीं लोक दुर्वचन बोलतात असें सांगतो.

झालें ! लोकरंजनासाठीं सीतेचा त्याग करण्याचा विचार मनांत योजून सीतेला वनांत सोडून येण्याची आज्ञा राम लक्ष्मणाला देतो

★★★

पात्रें :

- प्रभु रामचंद्र
- सीतामाई
- लक्ष्मणभाई
- दुर्मुख
- इतर पात्रें

# पूर्वरंग :

ही संगीतिका रामायणकालीन एका घटनेवर आधारलेली आहे.

या संगीतिकेचे दोन खंड पडतात. पहिला प्रसंग अयोध्येच्या राजमहालांतील चित्रगृहांत घडतो. सीतेला डोहाळे लागल्यानें तिच्या मनाची करमणूक व्हावी या उद्देशानें रामानें चित्रगृहांत वनवासांतील प्रसंगांची रम्य स्मृति व्हावी म्हणून कुशल चित्रकारांकडून वनवासांतील प्रसंगांवर चित्रें काढून घेऊन तीं येथें प्रदर्शनार्थ ठेवलेलीं असतात. हीं चित्रें लक्ष्मणभाई सीतामाईला दाखवीत असतो. तेव्हां चित्रगृहाची कल्पना रंगभूमीवर दिसावी.

दुसरा प्रसंग दुर्मुखाचा संदेश. हा प्रसंग करुणार्त प्रसंगांनीं भरलेला दाखवावा. कारण दुर्मुखाच्या वार्तेनें रामाच्या मनावर आघात होऊन पुढील दुःखद घटनेला येथूनच सुरवात होते ! रामानें केलेला सीतेचा त्याग, सीतेला वनांत नेऊन सोडण्याची लक्ष्मणाला दिलेली आज्ञा हे प्रसंग शक्य तों उत्कट करावेत.

प्रसंगानुकूल संगीत स्वरांची व प्रकाशाची योजना करावी.

★★★

# चित्र-दर्शन

( **प्रसंग :–** वनवासोत्तर कालांत सीता गर्भवती असल्यामुळें तिच्या मनाची करमणूक करण्याकरितां रामानें विविध साधनांची योजना केलेली असते. या वेळींच राज्याभिषेक झालेल्या रामाला 'प्रजानुरंजन हें तुझें मुख्य कर्तव्य आहे, हें तूं कदापि विसरूं नकोस.' असा वसिष्टांकडून गुरुमंत्र मिळालेला असतो. त्यावर 'कर्तव्यपालनाच्या कामीं प्रसंगीं जानकीचा देखील त्याग करीन', अशी प्रतिज्ञा रामानें केलेली असते. कर्तव्यपालन करण्याकरितां त्यानें आपल्या दुर्मुख नांवाच्या विश्वासू सेवकावर नगरांतील परिस्थिति अवलोकण्याची जबाबदारी टाकलेली असते. तो आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावितो. )

**निवेदक :–**

वनवासाचें तिमिर वितळुनी
तेजें भरल्या धुंद दशदिशा
अवधपुरीमधिं मोद भरूनी
फुलारल्या कीं, जनमन आशा

राम-लक्ष्मण सखी जानकी
मुदित मनें दिन घालविती
रघुकुल भरण्या जानकी सती
जग उजळण्या हो गर्भवती

प्रिय सखीची हौस पुरविण्या
कौड-कौतुकें अन् डोहाळे
रामसख्यानें अन् प्रदर्शन
निज महालांत जें मांडियलें

गतकालाच्या स्मृतीकरितां
चित्र-दर्शनें निर्मिला पट
तो चित्रपट कसला, असे
जिवंत भरला जणुं जीवनपट !

( राजमहालांतील भिंतीवर दिसणारीं विविध चित्रें राम-लक्ष्मण आणि सीता पाहत असतात. सीतेला 'तो पहा' असें म्हणत लक्ष्मण एकेक प्रसंग प्रत्येक चित्राकडे अंगुलीनिर्देश करून मोठ्या कुतूहलानें दाखवीत असतो. )

**लक्ष्मण :–** पहा माई, कहाणी, जीवितपट अपुला
फलकावरि हा साच सुंदरें जणुं रेखाटियला
रामप्रभूला तीं दिव्यास्त्रें दिलीं गुरु तातें
दुष्ट त्राटिका बळें धाडिली पहा नरकातें

**सीता :–** खरोखर चित्र कसें भावुक हें जिवंत भासे
माया मोहित त्राटिका रुदन कशी ती करतसे

**राम :–** प्रिय जानकी ऐक सखे ग,
कुटिल जनांना मिळतें शासन
' असत्यावरीं सत्य जयते '
जगाची नीति अशी तूं जाण

**सीता :–** ( आतुरतेनें )
सत्य; जगति ताप खलजनां
सांग बंधो चित्र-घटना

**लक्ष्मण :–** ही जनकाची मिथिला नगरी
इथें खेळली सीता सुंदरी
अन् पहा तो श्रीरामानें
धनुर्भंगला – अभिमानानें
घालुनि कंठीं जी जयमाला
मोदें नादें सीता वरिला !

**सीता :–** अहा खरोखरी मुदित मिथिलानगरी
बाळपणीच्या लीला आठवती
स्मृतीनें अंतरीं

**लक्ष्मण :–** आणि पहा तो जनकानंदा कन्यादान करी
हर्षित झाले पौरवासी, गुढ्या उभविण्या पुरीं

सीता :— सहर्षें भरे मधु रजतराग कोंदला मंदिरीं
मांडवी, श्रुतकीर्ति, उर्मिला मोदल्या अंतरीं

राम :— प्रिय जानकी आठवते तुज स्वयंवर वेला
करांत देऊनि कर पातली मधुर प्रीतीची माला

सीता :— हं ! पुढें चला भावोजी,

लक्ष्मण :— पहा आपुली ही अवधपुरी
रत्नमण्यांनीं नटली भूवरी

सीता :— कौशल्या माय ते पहा तात
करिती चिंतन बसुन एकांत

राम :— ( दुःखी होऊन )
तात स्मृति मम मना विदारी
माय प्रीति अन् उठे अंतरीं
हाय लक्ष्मण, हाय जानकी
रुतून बसलों वियोग पंकीं !

लक्ष्मण :— बंधु विस्मरा पूर्व स्मृति——
नसतीं शल्यें मनांत खुपतीं
पहा मंथरा कैकयि माता
नको वदु मना कांही कटुता

सीता :— प्राणनाथ कां स्मरते कांहीं ?
कालिंदीचा वटवृक्ष पाही

राम :— गोदावरिच्या शुभ्र रात्रीं
दाटें चांदणें अपुल्या गात्रीं

लक्ष्मण :— शूर्पणखाहि व्हायचि होती
जन्माची ना माझी वहिनी

सीता :— कसली थट्टा ! ही भावोजी
करतां माझी जीवघेणी !

**लक्ष्मण :–** आणि तो पहा, मृग वेषांत
मारीच दिसे कपटी–असूर
हन्त ! रावण नेई सीता
आकाश पथें वेगें सत्वर

**सीता :–** मज पुढें नका सांगूं कांही
मज ती स्मृति साहत नाहीं !

**राम :–** प्रिय सखी ते विरह क्षण
प्रिय लक्ष्मणा ! आठव ते दिन

**लक्ष्मण :–** पहा माई वीर जटायु हा
हनुमान, वाली अन् शूर महा
दशानन दिसे तो पहा क्रूर
तया वधोनि न ठेविले असुर

**राम :–** नको आठवूं ते मलिन दिन
त्या आठवें मनिं उठें कंपन

**सीता :–** नाथ या चित्रदर्शनें नवें
वाटें पुनरपि वनीं रहावें !
गीत झऱ्यांचें, वाऱ्याचें नर्तन
स्वरास्वरांतुन सत्य चिरंतन
भागिरथीच्या जलीं नहावें
मुक्त होऊनी फल सेवावें !

**राम :–** तथास्तु !
हा लक्ष्मणा बंधो पुरवी
सीतेचे जे मधु डोहाळे
रथीं बसवुनी अलगद नेई
वनीं – अरण्यीं जनकबालिके !

**लक्ष्मण :–** आज्ञा ! आर्य पुत्र !

(सीतेला घेऊन लक्ष्मण जातो...तोंच दुर्मुख नांवाचा दूत प्रवेश करतो.)

निवेदक :– प्रजा कुशलता ऐकण्या राम
सुता धाडिले होते नगरीं
सुत घेऊनि ये विपरित वार्ता
त्या वार्तेनें हृदय विदारी

दुर्मुख :– महाराजांचा जयजयकार असो !

राम :– करी दुर्मुखा, सादर वार्ता
पौर जनांची आणि कुशलता
सांग मजविषयीं लोक प्रशस्ती
दोप माझ्यांत कांही दिसती ?

दुर्मुख : क्षेम ! आदरें तुम्हां पाहती
(अडखळून) परि ?—

राम :–(अधिरतेनें) अरे सांग ना मग सत्वरी
ऐसा कां मम मना विदारी ?

दुर्मुख :– परगृहवासी सीतामाई
अशीं दूषणें देतीं कांही

राम :– (दुःखानें) पुरें ! पुरें !...
दुर्मुखा हाय ! पुरा समजलों
(कपाळावर हात मारून घेऊन)
देवा ! तूं कसा साधिला डाव ?
पुरा न हो कां तव मनोभाव
बा दुर्मुखा, लक्ष्मणा सांग
वनिं सोडावें मम मन-कुरंग

दुर्मुख :– प्रभो ! धीर धरा !...

राम :– अरे, ...
" स्नेहं दयां च सौख्यं च
यदि वा जानकीमपि ।
आराधाय लोकस्य
मुञ्चतो नास्ति मे व्यथा ॥ "

जा--

जाऊनि आणि तया कथावें
सीता सोडुन वनिं त्यागावें ! ...
सीता सोडुन वनिं त्यागावें !

(संगीताचे करुण स्वर उच्चतर होत जातात राम शोक करीत जमिनीवर निश्चल पडतो. पटक्षेप.)

★★★

◆
◆
◆

# कि रा त - भि ल्ली ण

## कथासूत्र :

भगवान् शंकर-पार्वतीच्या जीवनांतील एक मधुर प्रसंग या संगीतिकेंत रेखाटिला आहे. एकदां कैलास पर्वतावर शिव-पार्वती सारीपाट खेळत असतां सारीपाटाचा डाव शंकरावर उलटला. एका सामान्य स्त्रीनें आपल्यावर मात केल्याचें पाहून शिव मनांत वरमला आणि अत्यंत दुःखी होऊन वनांत तप करण्यासाठीं म्हणून पार्वतीचा त्याग करून निघून गेला

शिव गेल्यामुळें पार्वतीहि दुःखी झाली आणि तीहि त्याच्यामागें जाऊन त्याला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करूं लागली. शिव कांही प्रसन्न होऊन जागचा उठेना; म्हणून पार्वतीनें एक युक्ति योजिली तिनें भिल्लिणीचा वेष परिधान केला आणि मोठ्या शृंगारानें शिवापुढें येऊन नृत्याविष्कारानें तिनें शिवाचें मन घायाळ करून टाकलें. शिव आपल्या तपास विसरून भिल्लिणीच्या प्रेमाची याचना करूं लागला.

सुरवातीस भिल्लीण वेषांतील गिरिजा हिनें त्याच्या प्रेमास नकारच दिला होता. आणि पुढें....

***

पात्रें

- किरात (श्रीशंकर)
- भिल्लीण (पार्वती)

## रचना :

भगवान् शंकर आणि जगन्माता पार्वती यांच्या जीवनांतील एका रम्योदात्त प्रणयमूलक घटनेवर आधारलेली ही संगीतिका आहे.

या संगीतिकेंतील सर्वच प्रसंग वनांत घडतात. तेव्हां रंगमंचकावर वनाचें दृश्य साकार करावें. उत्तुंग पर्वतराशी उंच झाडी आणि निरभ्र आकाशाच्या घुमटाखालीं श्रीशंकर पद्मासन घालून पूजेला बसलेले असून गिरिजा पूजेचें साहित्य घेऊन त्यांच्या पूजेची मांडणी लावूं लागली आहे. वनाची पार्श्वभूमि निर्माण करण्याकरितां पक्षांचा किलबिलाट, मंद वाऱ्याची झुळूक, पर्णांचा आवाज इ० पार्श्वसंगीतांतून निर्माण करावें.

साध्या पूजेनें सांब प्रसन्न होत नाहींसें पाहून भिल्लीण वेषांत येऊन शृंगारिक नृत्याभिनयानें ती शंकराला वश करते. यावेळीं शृंगारिक वातावरणाची निर्मिति करून प्रसंगाला उठाव आणावा.

शंकराची वेषभूषा व केशभूषा एखाद्या शंकराच्या तस्वीरींतील पोषाखाप्रमाणें असावी. भिल्लीणीची वेषभूषा व केशभूषा भूमिकेनुरूप असावी.

प्रसंगानुकूल पार्श्वसंगीताची योजना करावी. शंख, टाळ, पखवाज, डमरू इत्यादि देशी वाद्यांचा मधून मधून पार्श्व-संगीतासाठीं उपयोग करावा.

★★★

निवेदक :– एके दिवशीं शिव-दरबारीं सारिपट रंगला
येतां अपयश खेळ खेळतां, शिव मनीं वरमला
लावियली कळ नारदमुनिनीं, दुःखित शिव झाला
शिवा जिंकिलि गिरितनया, शिव भणंग हो झाला
कैलासपति शिवशंकर जहाले हो भणंग भिकारी पार
घोर तप आचरण्यास निघाले सर्वसंग त्यागुनि गिरिवर
कैलासराणा शिवशंकर, घेई करांत भिक्षा झोळी
घोर वनिं गेले करुनि निज सर्वस्वाची होळी

× × ×

तपास बसले वनांत शंकर घालुनि पद्मासन
गतक्रोधाचा ताप शमविण्या करीत चिरचिंतन
संसाराचा त्याग करोनि सदाशिव होता अंतर्धान
पडतां फांसाहि उलटा गेली गिरिजा पोळून
भग्न-मनोरथ होतां प्रीतींत वरमून ती गेली
धिक् हें जीवित, धिक् हें जीवित ! मनांत ती वदली
प्रीतिविना ती एक सारखी खिन्न दिसे वदनीं
स्वप्निं देखिली तिनें शिवाची ध्यानमूर्ति वनीं
प्रीतीसाठीं तिनें तपस्या कठोर अनुसरली
भेटण्या शिवा होऊनि भिल्लीण सुकुमार सजली
भ्रतारास्तव सुगंधित जे मौक्तिक मणी हार
वल्कल नेसुनि, टाकिले तिनें तलम-वस्त्राभार

× × ×

मृदु मृदुला कमला सम जें तनू कांतिमान
जिंकिती नयन मधुनच उठाव दावी भर यौवन !

(शंकर वनांत पद्मासन घालून तपास बसले आहेत. गिरिजा हातांत पूजेचें साहित्य घेऊन त्यांची पूजा करूं लागते. वनांत पक्षांचा किलबिलाट मंद वारा वाहूं लागलेला असतो. सर्वत्र वातावरण शांत पसरलेलें आहे. )

**गिरिजा :–** जय जय शंकर सांब शुभंकर
तुला वंदितें जुळवुनि मी कर
पंचतुंड नररुंडमालधर
स्वर्णचंद तो भालभस्म हर
गर्जति जयजय हें गिरिकंदर
अष्टमूर्ति परमेश सदाशिव
त्रिनेत्रधारी प्रलय हें विप्लव
कलकल गंगा तूं प्रलयंकर
पशुपति रुद्रा मीनाशनया
कैलास कर्पुरी गौरी जाया
डमडम डमरू, गिरिजा शंकर

(गिरिजा पूजा संपविते. तरीहि शिव डोळे उघडून तिजकडे पाहत नाहींत, ती दुःखी होते.)

**निवेदक :–** पूजा अर्चनें भक्तीनें शिव विचलित न झाला
तपांत रत तो, नारिस ना भुलला !
कठोर ऐसें व्रत करोनि मृणाल तनु सुकली
दुःखित झाली गौरीबाला, धीर ना सोडियली
शृंगाराचा साज करोनि येतां गिरिबाला
उन्मत्त वक्ष, सिंहकटि ज्यांत मदन संचारिला

(गिरिजा शृंगारित होऊन भिल्लीण वेषांत शंकरापुढें येते व शंकराचें मन वळविण्याचा प्रयत्न करूं लागते.)

**गिरिजा :–** रुणझुण रुणझुण नाद पैजणें
मुनिवरा, उघडा जरा लोचनें !
भृंग करती कमळण बद्ध
मत्त मयूरहि मादीस विद्ध
मदन उठवी रोमिं गुंजनें !

रूपगर्विता तुजपुढें सिद्ध
करि मजला तूं पुरा निबद्ध
स्वर्ग-सुखाचीं प्रीतिपारणें

**निवेदक :-** विचलित होउनि, रतीस शंकर पुरतां तो भुलला
पाहुनि मन्मथ पुतळी, तपास बाजू सारियला

**शंकर :-** कोण तूं, कां सोडिलीं यौवन-सुंदर आभरणें ?
नर्तनीं निपुण अनुचित वल्कल कां धारण करणें ?
यौवनसुलभा, वसन वधूचें रेशिम झुळझुळीत
उरोज उन्नत, ओष्ठीं निथळें चंदनहि आरक्त

**गिरिजा :-** पूजाया तुज ये सामोरी
मी भिल्लीण वनवल्लरी
द्या मज पदचरण करण्या पूजन
सेवाधर्म हा पहा आचरीं

**शंकर :-** कशास तूं गे परांवंदिशी – घे हात तव करीं !
नयन तुझे असे रोखुं नको गे – होशी कां बावरी ?
त्रैलोक्यांतिल एकवटुनिया सारें लावण्य
निर्मिलें तुझें विधीनें असें अमूप तारुण्य
व्यर्थ तपस्या करतां मिळे स्वर्गाची प्राप्ति
मिळे न कांही इच्छित तुझिया लावण्या पुढती
कां मम चित्त विदारते तूं रूपगर्विता नारी
अनसरुनि मज सखे सत्वरी, मदन-बाण कां उरीं ?

**गिरिजा :-** (संतापून)
गोसावड्या ! तूं जटाधारी इच्छिशी कां परनारी ?
तुझी न माझी कधीं तरी कां होई बरोबरी ?
कुसुम भूषणें कर मम दिसती आरक्त शोभित
भुजंग वेटोळें तुझ्या करावर सदैव वेष्टित

असे अकिंचन भस्मभूपित स्मशान तूं धारी
रम्य सुगंधी आंथरल्या मी लोळें शेजेवरी

**शंकर :–** (संतापून)
गोसावड्या म्हणशि कां तूं अदय दुराचारी
मी असे सांब कैलास राज हा गंगाधारी
असे अकिंचन जगन्नियंता सकल संपदेचा
जटाधारि परि स्मशानांतरिं, नाथ त्रैलोक्याचा
माझ्या अंगें चिता–भस्म होई पुरता गे विशुद्ध
तांडव करतां त्रिलोक डोले होउनि निबद्ध

**गिरिजा :–** क्षमा करा मज गौरीशंकरा ! क्षमा मजला करा
घ्या मज सोबत आपुल्या सवें प्रणय प्रियकरा
भालभस्म, शिरिं चंद्रकोर व्रत कां अनुसरिला !
तुम्हांविण असेल झाली गौरी अति प्रेमविव्हला !

**शंकर :–** (रागानें)
पुरा जाणतों त्या गिरिजेला, रूपगर्विता नारी
तुच्छ जनास्तव न झुरणारा मी, आलों वनांतरीं

(दोघेहि एकमेकांच्या हातांत हात देऊन उठतात.)

**निवेदक :–** शरीर कंपित घर्मबिंदु ये माथ्यावर उजळोनी
हळु देखियली शिवास बाला, लज्जित नयनांनीं

**शंकर :–** सखे नतांगी मी तुझाच दास।
इच्छे कांही मज प्रीति आंस
कैलाशीचा तुजला राणा
ये तव शरणा देई चरणां

**गिरिजा :–** कैलासनाथ प्राणप्रियकरा
चला मज गृहिं राजेश्वरा !

(दोघेहि हातांत हात घालून आनंदानें नृत्य करीत उठतात.)

★★★

## नि र्वा ण

## कथासूत्र :

कपिलवस्तु नगरीचा राजपुत्र सिद्धार्थ हा आपल्या पूर्ववयांतच आपल्या जीवनासंबंधीं अतिशय उदासीन होता. त्यांतच त्याच्या दृष्टीला कांहीं जीवितक्षणभंगुरतेचीं प्रतीकें दिसलीं. त्यामुळें जीवन हें नाशमय आणि अस्थिर, भंगुर असल्याची त्याच्या मनाला खात्री पटली आणि तो आपल्या सर्वस्वाचा त्याग करून जीवनाचें अंतिम साध्य – मुक्ति मिळविण्याचा विचार करूं लागला.

सुख म्हणजे काय? दुःख म्हणजे काय? या विचारांच्या संक्रमणावस्थेंत असतांनाच तो आपली प्रिय पत्नी यशोधरा आणि प्रिय पुत्र राहुल यांना एकाकी टाकून वनांत जाण्यास निघतो.

वाटेंत त्याचा निश्चयभंग करण्याकरितां अनेक अडचणी आल्या, तरीहि तो आपल्या निश्चयापासून ढळत नाहीं. शेवटीं तर मार नांवाचा दैत्य मायावी रूप धारण करून यशोधरेच्या वेषांत येऊन सिद्धार्थाचा मार्ग रोखण्याचा प्रयत्न करतो; परंतु एकाएकीं आकाशवाणी होऊन व वायुमार्गें संचार

करीत असलेल्या महाबलि नामक देवदूतानें मार-दैत्याचें कपट सिद्धार्थापुढें उघडें केलें व त्याचा निर्वाणाचा मार्ग मोकळा केला आणि मोहाला वश न होतां पुढील सत्पथाचा मार्ग आक्रमिण्याचा थोर संदेश दिला.

★★★

पात्रें :

- सिद्धार्थ
- यशोधरा
- मदयंतिका
- चणक
- इतर पात्रें

# पूर्वरंग

सिद्धार्थाच्या जीवनाला कलाटणी देणाऱ्या एका नाजुक घटनेवर ही संगीतिका आधारलेली आहे. तेव्हां मोहपाशाची बंधनें तोडतांना होणाऱ्या मानसिक यातनांची खळबळ सिद्धार्थ–यशोधरेच्या मुखावर प्रतिबिंबित व्हावी.

या संगीतिकेचे दोन खंड पडतात. प्रथम खंड – पूर्व रात्रीं सिद्धार्थाच्या राजप्रासादांत घडतो. वातावरणांत भयाण शांतता पसरलेली असते. करुणार्त स्वर या प्रसंगाला अधिकच भीषणता आणतात. सिद्धार्थाची मार्गप्रतीक्षा करीत असलेल्या यशोधरेच्या अंतर्यामि.तील गूढ खळबळ तिच्या प्रत्येक हाल-चालींतून व्यक्त व्हावी.

दुसरा प्रसंग त्याच पुर्वरात्रीचा आहे. सिद्धार्थापुढें पडलेला जीवनासंबंधीचा पेंच उत्कटतेनें दाखवितां आला तर गंभीर प्रसंगाला अधिक गंभीरता आणतां येईल.

तिसरा प्रसंग उत्तर रात्रीं राजप्रासादाचें उपवन व उपवना-बाहेर घडतो. हा प्रसंग अतिशय दक्षतेनें उभा करावा. मायावी यशोधरेचा पोषाख, विनवणी, अभिसार इत्यादि गोष्टींत शृंगारतेबरोबर उत्कृष्ट अभिनयहि साधतां यावा.

पार्श्वसंगीत खंडांतून घोडयांच्या टापांचा आवाज, आकाश-वाणी आवाज व इतर संमिश्र संगीत स्वर योजनापूर्ण निघावेत. संमिश्र, अंधुक, तरल प्रकाशाची योजना कुशलता-पूर्वक व्हावी.

★★★

# नि र्वा ण

( स्थळ :– गौतमाचा प्रासाद. मध्यरात्रीची वेळ. आकाशांत ढगांचा गडगडाट नि विजांचा कडकडाट. वातावरणांत भीषण वाऱ्याचा आवाज. क्षणभर भयाण शांतता . . . यशोधरा मदयंतिकेला कातर स्वरांत विचारते . . .)

**यशोधरा :–** मदयंतिके ! मदयंतिके ! !

**मदयंतिका :–** आज्ञा युवराज्ञी !

**यशोधरा :–** कां न अजुनि मम ये प्राणनाथ
प्रतीक्षेमध्यें काळोखे पथ ?

**मदयंतिका :–** येतील स्वामी आतां सत्वर
तमा उजळण्या चंद्र शशीधर

**यशोधरा :–** वृथा करसि कां मनोवंचना ?
कुणास अंकित दैवी घटना !
आणि लवे मम उजवा डोळा
हृदिं भडके अग्नि गोळा
व्रतस्थ जळे मी विरहिणी
जावज्जीव कां व्रत प्राक्तनीं ?

**मदयंतिका :–** (साधु स्वामिनी, साधु ! )
नका वदुं गडे भलतें कांही
व्यथा मनास भेदित राही

**यशोधरा :–** मदयंतिके—
...मम दैव बाई !

**मदयंतिका :–** गोपे, येते. कर तूं घाई

(उद्विग्नावस्थेंत गौतम येतो. त्याचें मुख कोमेजलेलें असून क्षीण नि कातर स्वरांत तो यशोधरेस हांक मारतो. . . . )

**गौतम :–** यशोधरे ! यशोधरे ! !
कोठें असशी ये सामोरी
जीवित कोडें ठावें तुज तरी ?

**यशोधरा :–** नाथ ! नाथ ! !

(स्वगत) अवचित बाई अजि काय घडे ?

हृदय पांखरूं मम पहा उडे !

**गौतम :–** सखि यशोधरे सत्वरी बोल

ठावे कां तुज जीवित मोल ?

ठावें कां तुज दुःखादि मरण

पुष्पांचें हो निर्माल्य तन

मिळें कां कुणां अमर यौवन

जरा मृत्यूंचीं बंधनें भेदुन ?

**यशोधरा :–** (आर्त स्वरांत) स्वामी !

**गौतम :–** यशोधरे !

तुझा अंत कां असा ठरावा ?

फुलांतुन जसा गंध गळावा !

**यशोधरा :–** स्वामी !

नका वदुं असें कांही

जीव कसा मम छेदुन जाई !

**गौतम :–** जीवनासक्ति मम उडुनि जाय

ना बंधन ना, आतां उपाय

(संभ्रमावस्थेंत बोटानें यशोधरेला खुणा करूं लागतो.)

यशोधरे !

तो पहा जराजर्जर वृद्ध

वार्धक्यें हो कितीतरि विद्ध

कमरेची हो त्याची धनुकली

सुरकुत्यांचीहि वदनीं जाळी

आणि पहा तो रोगी-विकृत

बसके डोळे, पीडा अविरत

मऊ गालफडें, क्षीण पावलें

मरण मोल जें देहीं दडलें

यशोधरे ! कां पाहिलें प्रेत
मरण बुचकेंहि जें मांसल बृत
आकांक्षाची जीवंत झोळी
मरणाची तर रितेच झोळी !

**यशोधरा :–** नाथ ! अजि तुम्हां हो काय तरी ?

**गौतम :–** तें उमगेना मज प्रिये परी !
सुख म्हणजे, दुःख म्हणजे
काय ? हेंचि आजपरि ना मज समजे !
सुख म्हणजे ...
दुःख म्हणजे....

**यशोधरा :–** स्वामी !
नाथ ! पहा तीं हिरवीं कुरणें
व्योमधरेचीं मृदुल कवनें
आणि पहा ती नदी रोहिणी,
गजगति गाते मंजुळ गाणीं
पहा चंद्रमा तो अवकाशीं
प्रीत करी मधु चंद्रिकेशी
चला राजसा पाण-विहारा
चांदणी फुलवूं मधु अभिसारा

**गौतम :-** यशोधरे ! मज हवा एकान्त
मनसुधिस तडा जाईल ज्यांत !
यशोधरे ! मज हवा एकान्त
हवा एकान्त हवा एकान्त....
....एकान्त......

(वातावरणांत उदासीन करुण आवाज पार्श्वसंगीतावर उच्चतम होऊन पटक्षेप.)

(स्थळ . तोच राजप्रासाद, आणि तीच रात्र. यशोधरा नि राहूल शांत झोपलेले असून गौतम अस्वस्थावस्थेत उठतो आणि विचार करूं लागतो.)

**गौतम :–** हे प्रभो ! कशी तुझी अघटित लीला
सुख उदवुनि तूं प्रसवि दुःख गोळा
मनीं अंकुरे तृष्णापाश
मरणाचें तें धगधग लास्य
मांसल देहीं भंगुरतेची ज्वाला
चपर्का नाचति धुंद कंचनी
यौवन मदपरि क्षण जीविनी
लागे माथीं कुणां अमरत्व टिळा ?
कां घडविशी जगिं सुंदर मूर्ति
जीवंतपणीं हो मृत्यु पूर्ति
शून्य जीवित, विश्वीं शून्य कळा !

(संगीताचे स्वर उच्चतम होत जातात. गौतम मंचकावरून उठतो. एक प्रेमळ नजर झोपलेल्या यशोधरा–राहूलवर टाकीत...)

यशोधरे, मी जातों सत्वर...
तोडुनि तुझिया रेशीम मिठी
जाग येण्याच आधि राहुला...
कोमल चुंबन घेऊनि ओठीं
यशोधरे तूं क्षमशी मला...
नाकळे मला जीव–सांगता
हृदयांतील प्रेमझरा मम...
वैराग्यानें हो पुरा रिता !
यशोधरे, मी जातों सत्वर....
..मी जातों सत्वर....जातों सत्वर...

(वातावरण गंभीर होत जातें. पार्श्वसंगीताचे स्वर तीव्र होत जातात. गौतम उठून तडक निघून जातो...क्षणांतरींच यशोधरेस जाग येते आणि गौतमाच्या अनुपस्थितीची जाणीव होतांच तिच्या हृदयाला धक्का बसतो. चेहऱ्यावर भीति पसरून राहते. क्षीण आवाजांत ती आपल्या सखीला–)

**यशोधरा :–** मदयंतिके ! मदयंतिके ! !

**मदयंतिका :–** आज्ञा युवराज्ञी !
अवचित कैशी ये तुम्हां जाग
मुखीं मालवें प्रीत्यनुराग ?

**यशोधरा :–** घात झाला ग, बाई ग घात
दैवें केला घोर आघात !
राहुल आतां गे उठेल ना;
तात खुशाली पुसेल तो ना ?
काय सांगु मी त्याला आतां ?
दैवें घेतला सूड पुरता !

(पार्श्वसंगीत खंडांतून करुण रसाचे स्वर उमटूं लागतात.)

आज प्रियाचा मंचक कां ग रिता ?
मनास माझ्या साहे न ही व्यथा !
मांडवांतला साजशृंगार
गळाला रिते मंचकावर
कुणा सांगु मी आंसवांतली कथा !
भग्न झालें माझें घरकुल
घराबाहेर पडतां पाऊल
हीच कां मम जीवनाचि सांगता ?
प्रीतिगीत मी गातां तुझें
अन्तरीची मम ज्योत बुझे
चंद्राविण नभि ताऱ्यांचा हा जथा !

आज अभागी, दुःखीं बुडतें
अंजली अश्रु उष्ण कढतें
कातर दृष्टि कोरूं लागते पथा !

(गंभीर वातावरणाच्या पार्श्वभूमीवर पटक्षेप.)

(**स्थळ** : राजप्रासादाबाहेरचें कुंजवन. आकाशांतील तारे निष्प्रभ झालेले असून वातावरणांत भयाण शांतता पसरलेली आहे. गौतम हलक्या आवाजानें आपल्या सारथ्यास हांक मारतो.)

**गौतम** :– चणक ! चणक !!

**चणक** :– (प्रवेश करून) आज्ञा युवराज !
आपण इतक्या रात्रीं ?
चंद्र वितळे ना नभ-गात्रीं ?

**गौतम** :– होय ! – चाललों दूर–प्रवासा
अंत शोधण्या मी गूढ देशा !

**चणक** :– आज्ञा युवराज !

(घोड्यांच्या टापांच्या मंद आवाजांत चणक पुढें नि गौतम पाठीमागे अशा अवस्थेंत जाऊं लागतात. ते कपिलवस्तुची सीमा ओलांडतात तोंच त्यांच्यासमोर कसला तरी अद्भूत प्रकाश चमकूं लागतो आणि त्या प्रकाशांतून एका तेजस्वी व्यक्तीचा आकार साकार होतो )

**गौतम** :– (आश्चर्यानें) चणका ही तर रत्न खाणी
यशोधरा ही रूपमति राणी !

**मायावी यशोधरा** : आर्यपुत्र ! ...
तुमची प्रिया मी यशोधरा
नका त्यजुं मज, स्वीकार करा !

**गौतम** :– (भांबावून) यशोधरे ! यशोधरे !!

**मा. यशोधरा** :– स्वामी ! ना बघुं आतां अन्त
तुम्हास्तव मी साहतें अंत

**गौतम** :– मम यशोधरे ! गे यशोधरे ! ....
आतां कसलें प्रेम नि पूर्ति

संचारली अंगीं माझ्या . . . .
धगधगती अति वैराग्य मूर्ति

**मा. यशोधरा :-** प्रसन्न अतीव उपेहून मी
मनोज्ञ युवति तुझ्या विरामीं
शाक्य सुताची निस्तुल ललना
अलकीं नाहे रंग यौवना !

(पार्श्वसंगीतावर शृंगारोन्मादक स्वर उठूं लागतात. नृत्याचा एक तुकडा.)

काजळ काळ्या नयन कडा मम . . .
झोप घे धवल पांखरें दोन
नखाग्र चरणीं टचटचल्या ज्या . . .
मेंदि रक्तिमा मधु मदनबाण
अन् माथ्यावर धर्मविंदुहि . . .
रक्त कुंकुम, हिणवि चंद्राला
मन्मथ पुतळी, भडके अंतरीं . . .
अनुरागाची धगधग ज्वाला
चांदण्यास मी चुंबुनिया मम . . .
नजरेंत स्वप्न मधु वितळलें
ओठस्मिताचि पहाट मुखीं . . .
नयन डोहांत गगन बुडालें !

**गौतम :-** यशोधरे मी विरक्त दास
निश्चय न ढळे, पुरविण्या आंस !
तृष्णासर्प करण्यास दूर
जगन्नेमिचक्र तोडण्या पार
जीवन-मृत्यूचा झगडा चाले..
कितीक मेले, अन् किती बुडाले
अनंत शतकें आणिक शतकें
धैर्यधर तो उभाच ठाके !

मृत्युंजय तो खरा अक्षय
जो मिळविला मृत्युवरि जय

**मा. यशोधरा :–** नाथ !
न आठवे कां विवाह स्वामी ?
सप्तपदि वदे ' नाति चरामि '
न आठवे कां तर्धिचि तव वदा
" आर्ये ! मी गे तुझाच सदा !"

( अत्यंत उन्मादित होऊन गौतमाला कवटाळण्याकरितां आपले दोन्ही बाहु पुढें पसरविते .)

मज स्वीकारा राजेश्वरा !
आलिंगुनि मम प्रेमपूर्ति करा

( गौतमास आपल्या दोन्ही बाहूंनीं आलिंगन देण्यास पुढें होते; तोंच आकाशगामी अनोळखी आवाज वातावरणांतून घुमतो...

**आकाशगामी आवाज :–** सिद्धार्था तूं हो सावधान !
ती यशोधरा, न असे डाकिण

**गौतम :–** कोण तुम्ही ? कोण ?

**आ. आवाज :–** महाबलि ! फिरे मी वायुगामी
सत्पथिक मी सेवक नामी
निर्वाणाचा मार्ग बिनधोक
जा तूं खुशाल असा निर्धोक
जा तूं खुशाल ...
जा तूं खुशाल....

( पार्श्वसंगीताच्या पार्श्वभूमीवरील शब्द हलके हलके विरत जातात. घोड्यांच्या टापांचा आवाज पुसट होत जातो. मंगलसूचक वाद्यांचे पडसाद संगीन ध्वनीवर मंद मंद विरत जातात. गंभीर शांततेच्या वातावरणांत पटक्षेप.)

★★★

# ऋतुराग

सं.... ११

## कथासूत्र :

ऋतुराज वसंत महाराजांचा दरबार भरलेला आहे. दरबारांत त्याचे इतर लहान मोठे आश्रित मांडलिक राजे आपापल्या आसनांवर अधिष्ठित झाले असून वसंत राजांच्या जन्मदिन–निमित्तानें दरबारांत 'वसंतोत्सव' साजरा होत आहे. नृत्यांगनांनीं उत्सव साजरा केल्यानंतर या शुभदिनीं वसंतसखा शरद् हा वसंत राजांचा जयजकार करून त्यांचें अभिष्ट चिंतन करून आपली एक इच्छा प्रगट करतो– "या आनंदाच्या प्रसंगाला एका गोष्टीची उणीव आहे, आणि ती म्हणजे महाराजांची आपल्या वैभवाला साजेशा व अनुरूप अशा राजकन्येशीं विवाह ! आणि अशी अनुरूप वधु म्हणजे आषाढ राजाची सुकुमार कन्या वर्षाराणी होय !"

ही गोष्ट वसंतराज दरबारांतील मेघराजावर सोपवून देतो. वर्षाची मैत्रीण – मेघरंजनी – मेघराजाची पत्नी असते म्हणून मेघरंजनी वर्षेकडे जाऊन वसंत राजाचा मानस व्यक्त करते. वर्षेलाहि वसंताचें वैभव – वीरश्री श्रुत असल्यानें ती होकार देते. पण तिच्या वडिलांनी – त्याच्या शत्रुशी–ग्रीष्म-

राजाशीं युद्ध करून जो कोणी युद्धांत त्याचा पराभव करेल त्यालाच आपली सुकन्या वरेल असा – 'पण' लावल्यानें ती मेघरंजनीला तसा निरोप देते. मेघरंजनीचा वृत्तांत ऐकून वसंतराज ग्रीष्मराजाशीं युद्ध करण्याच्या तयारीला लागून युद्धांत त्याचा पूर्ण पराभव करतात. युद्ध जिंकल्यानंतर वसंत-राजाला वर्षाराणी आनंदानें वरते .. पुढें दरबारांत दोघांचें भव्य स्वागत होऊन जयजकार होतो.

***

पात्रें :

- ऋतुराज वसंत
- रूपमती वर्षाराणी
- सदय मेघराज
- प्रियसखी मेघरंजनी
- वसंतसखा शरद्राज
- शीतल हेमंतराज
- निर्माल्य शिशिराज
- दाहक ग्रीष्मराज

## रचना :

सृष्टिसुंदरीला नवजीवन देणाऱ्या वेगवेगळ्या ऋतूंवर रूपकद्वारें सजीवता कल्पून ही संगीतिका साकार केली आहे.

या संगीतिकेचे सर्वसाधारणपणें चार खंड पडतात. प्रथम प्रसंग ऋतुराज वसंताच्या दरबारीं घडतो. दरबाराचा थाट प्रत्ययास यावा अशी सजावट रंगभूमीवर करावी. सर्वांचा पोषाख उंची असावा.

दुसरा प्रसंग वर्षेच्या महालांत घडतो. तिच्या महालाचीहि ऐट भव्यतेनें उभी करावी

तिसरा प्रसंग वसंत आणि ग्रीष्म यांच्या युद्धाचा आहे. हा प्रसंग मात्र कौशल्यपूर्ण करावा. दोघांच्या द्वंद्व युद्धाला उठाव येण्यासाठीं नेपथ्यांतून रणांगणावरील युद्धवाद्यें वाजवावींत.

चौथा प्रसंग परत वसंतराजाच्या दरबारांतील आहे. हा प्रसंगहि पूर्ववत् वैभवाचा दिसावा.

प्रसंगानुकूल संगीत स्वरांचा आणि प्रकाश योजनेचा कौशल्यपूर्ण उपयोग करावा.

***

( **स्थळ** :– ऋतुराज वसंतमहाराजांचा भव्य दरबार. मधल्या उच्च आसनावर वसंतराज व त्यांच्या दोन्ही बाजूला इतर लहान-मोठे मांडलिक ऋतुराज विराजमान झालेले आहेत. नृत्यांगना ‘ वसंतोत्सव ’ साजरा करूं लागलेल्या दिसत आहेत. . . हुजरे राजांचा जयजयकार ललकारीत आहेत. मंगलसूचक वाद्यें – कर्णे, नगारा, शिगें वगैरे वाद्यांचा आवाज घुमूं लागलेला आहे. . )

**पार्श्वगायक :–** आकम्पयन् कुसुमिताः सहकारशाखा
विस्तारयन् परभृतस्य वचांसि दिक्षु ।
वायुर्विवाति हृदयानि हरन् नराणां
नीहारपातविगमनात् सुभगो वसन्ते ॥

**नर्तिका** :– करा जयजयकार – नृपांनो ! करा जयजयकार !
सकल ऋतूंचा अधिपति शोभे वसंत ऋतुराज
दशदिशांत भरली सुवर्ण कांती
शृंगार नूपुरहि रुणझुण करती
मदन-रतीचा मधुमास फुले झुले धरा–अंबर.
जलवंती फुलली नील जलवेली
आकाशाची तर्यि विरति स्वर बोली
रूपमदें धरति लाजते छुम् छुम् छेडी पद झंकार.
छुम् छुम् छुम् छुम्—
थै, थै, थै, थै, तक् थै तक् थै
मधु गुंजनीं उठती स्वर नूपुर
राग रागिण्या छेडती स्वर
धा धा, धिधा, किट धा, धिदा
कथ्थकि तोडा पायीं करती मधुर घन झंकार

(नृत्य संपवून नर्तिका दोन्ही बाजूंनीं विभागून जातात. . . )

**पार्श्वगायक :-** शरदि कुसुमसङ्गाद् वायवो वान्तिशीता।
विगतजलदवृन्दा दिग्विभागा मनोज्ञाः।
विगतकलुषमम्भः शयनिपङ्का धरित्री।
विमलकिरणचंद्र व्योम तारा विचित्रम् ॥

**शरद् :-** या आनंदोत्सवा आज एक उणीव भासे
चंद्रिकेविण नभांत, चंद्र कसा बरे हंसे !
ऋतुराज ऋतूंचा सकलाधिपति जो महान्
श्रुत वैभवा शोभित राज्ञी हवीच जी भूषण !
आषाढसुता वर्षाराणी सुशिल कन्या थोर
ऋतुस्नात रूपमती जी मदनबाला धुंदार
कोरिव नयनकडा ज्या मधु सुरंगित मीनाकार
नसनसांतुन उठति जे उन्मादक धुंद झंकार
कंठीं नक्षत्रजडित रुळतो चंद्रकला हार
सोलीव बाहूंस घट्ट बैसतो बाजुबंद न्यार
इंद्रधनुचा स्वर्ण मेखला कटि रुचे सुंदर
रुमझुमत्या नर्तनीं गळतसे मोत्यांची धार
पंचाग्नि साधन तपिं घडविली तिची तेज कांति
धुंद केळीच्या देहिं प्रगटे रतितूल्य मूर्ति !

**वसंत :-** (उत्सुक होऊन..)
जिवलग मम शरद्सख्या, ऐशी सौंदर्याची खाण
मिळतां राणी मजला होई मी धन्य धन्य !
राजदूत तो धाडा आषाढ राजप्रति चतुर
" प्रसन्न मी सुकुमार सुता तव, वराया सत्वर "

**शरद् :-** मोदित मन वर्षेचें करण्या युक्ति योजावी
सखयं मेघरंजनी प्रथम तिजप्रति धाडावी

**वसंत :-** मेघराज ! —

**मेघराज :-** — आज्ञा तव अनुकरणीय महाराज
कार्य सिद्धित करण्या धाडितों प्रियेला आज !

(मेघराज प्रणाम करून जातो . . . परत ऋतुराज वसंताचा जय-जयकार होऊन दरबार बरखास्त होतो . . . पटक्षेप.)

× × ×

(**स्थळ** : वर्षाराणीचा भव्य आरस्पानी सजलेला महाल. रंगमंचका-वरील स्वर्णमंचकावर वर्षाराणी एकटीच आपल्या पुढ्यांत सतार घेऊन तिच्या तारा छेडीत बसलेली आहे. तोंच मेघरंजनी प्रवेश करते. मेघरंज-नीस पाहिल्यावर वर्षाराणीला हर्ष होतो. त्या दोघी कडकडून भेटतात.)

**पार्श्वगायक :-** मुदित इव कदम्बैर्जातपुष्पैः समन्तात् ।
पवनचलितशाखैः शाखिभिर्नृत्यतीव ।
हसितमिव विधत्ते सूचिभिः केतकीनां ।
नवसलिलनिषेकाच्छिन्नतापो वनान्तः ।।

**निवेदक :-** वर्षेला भेटाया मेघरंजनी आली
सखीस बघतां वर्षा मनिं अतीव हर्षली

**मेघरंजनी :-** ऐक प्रियसखे, आज वदतें मी एक गुपित
या कानाचें ना त्या कानां करावें ज्ञात !

**वर्षाराणी :-** सांग सखये तें गुपित ऐकिण्या मन आसुसलें

**मेघरंजनी :-** तर ऐक मग, सुभाग्य तुझिया उदया आलें !

**वर्षाराणी :-** (हर्षानें) खरंच ? . . .

**मेघरंजनी :-** – हो ! – खरंच ! –
प्रिय सखे कां शब्दानें तें सांगावें लागतें ?
प्रीति–विहंग आला वसंत, गात प्रीति-गीतें !
गुंफ सखे तूं मधु गीत मधुर
अन् मोगरिचे धुंद कर हार
भिर भिर अंजन लोचन शर अति सलत असे नयनांतें
अनुरूप मीलन हो प्रीतीचें
जडेल नातें दो जीवांचें
मदन छेडील प्रीतीचे सुर सुरेल पातें
प्रणय तुझें ग अमर चिरंतन
सकल जगाला होई भूषण
युगायुगाचीं मरणें जिंकुनि तरतील प्रीति-गीतें !

(सतारीवर क्षणैक आनंदाचे स्वर छेडिले जाऊन दोघीहि क्षणभर आनंदांत बुडून जातात . . . पण वर्षेला एकदम आठवण झाल्यागत होऊन ती धीर-गंभीर होते आणि . . . )

**वर्षाराणी :-** परिसुनि मनीषा सखे प्रमुदित मी झालें
त्याच क्षणाची वाट पाहण्या मन आसुसलें !
चिरवांछित वसंत ज्या मीलनास 'पण' ठरला
ग्रीष्माच्या संहारा तात-मनीं 'पण' केला
श्रुत वसंत वैभवहि आणिक महाअति शक्ति
तात 'पण' पूर्ण करोनि, अनुसरावें जन रीति !
जा जिवलगे सत्वरी . . . जा शुभस्य शीघ्रम् ।

**मेघरंजनी :-** जातें सत्वर वर्षे ! करुनि तुवा प्रणाम !

(मेघरंजनी वर्षेचा निरोप घेऊन गेल्यानंतर क्षणैक पार्श्वसंगीतावर करुण स्वर उमटतात . . . वर्षाराणी उदासीन होते . . . )

**वर्षाराणी :-** जा मदना रे जा प्रेमभरें – ना छळूस मज तूं कुसुमशरें
व्रतस्थ मी चिर वियोगिनी
प्रेम मीलना प्रीत रंजनी
होय विरह प्रीत मीलनीं
चंचल मन रे झालें अधिरें
मन वांछित मधु पीया मीलन
करि उदास रे माझे जीवन
ना आळवूंस तूं प्रीतिगान
शपथ रतीची तळमळते रे

(अत्यंत उदासीन अवस्थेंत मंचकावर अंग टाकते . . . पटक्षेप.)

× × ×

(रंगमंचकावर वसंताला युद्धास आव्हान देत भेसूर – भयानक उग्र रूपांत ग्रीष्मराज प्रवेश करून मोठमोठ्यानें गर्जना करतो . . . )

**पार्श्वगायक :-** ज्वलति पवनवृद्धः पर्वतानां दरीषु
स्फुटति पटुनिनादैः शुष्कवेशस्थलीषु ।
प्रसरति तृणमध्ये लब्धवृद्धिः क्षणेन
ग्लपयति मृगवर्ग प्रान्तलग्नो दवाग्निः ॥

**निवेदक :-** मतिमंद धुंदमति ! नाचत ये ग्रीष्मराज
उजाडित त्रिभुवना अन् सौंदर्याचा साज
कपट नीति – प्राण घातकी, कर्कश हंसत
उरिं पेटे तांडव, ये अग्निस ललकारित
धरणीवरति करुनि उन्मत्त पद प्रहार
कवटीसम विचकित दांत भयाण भेसूर
श्वासांतुन उष्ण उच्छ्वास अग्नि फूत्कार
मुखांतुन आळवित तप्त भैरवाग्नी सुर

**ग्रीष्मराज :–** सर्व जगाचा मी कर्दन काळ
पेटवीन बळें निज अग्निलोळ
हलाहलाचा डोंब भयंकर
ज्वालामुखिचा पिऊनि अंगार
तक्षकहि मी ताप भयंकर
नीच वसंता करि खाक–चूर
(मोठ्यानें गर्जना करीत . . . )
कुठें आहे तो अधम वसंता
मोहविणारा रतीस पुरता

**निवेदक :–** घेत आव्हान धुंद मतीचें
वसंत बाहूंत बिजली नाचे
करीं घेऊनी तळपति तलवार
ग्रीष्मा भिडला करित ये वार

(वसंतराज हातांत तरवार परजून प्रवेश करतात . . .)

**वसंतराज :–** येई धुंदा मतिमंदा कृतान्त काळा
खड्गानें जें क्षणांत करिन लोळा गोळा

(दोघेहि आपापल्या तरवारी परजून द्वंद्व युद्धास सरसावतात. परस्परांचे तरवारीचे वार होतात . . . त्या वारांचे भयंकर कर्णकटु आवाज वातावरणांतून घुमून उठतात . . .)

**निवेदक :–** परस्परांचे भिडले संगिनी-वार
अन् अग्निचे उठले लोळ भयंकर
धगधगती अति नेत्रीं लाल निखारे
गरगर फिरती जे लोह बाहु चक्रें
छातीचे रण दोघे झुंजार वीर
धरणी स्रवूं लागली रक्तांगार

हाय ! अचानक करतां भयंकर वार
क्षत होऊनि पडे ग्रीष्म धरेवर
गडबडा लोळत आक्रंदितो अनिवार
काढी आर्त अन् कृतांत – चीत्कार
ऋतुराजाचा हो विजय जयजयकार
जयगानें दशदिशा धुंदित धुंदार

(" ऋतुराज वसंत महाराजांचा जयजयकार असो ! . . . जयजयकार असो ! . . . असे जयजयकार सर्व वातावरणांतून घुमत असतांनाच पटक्षेप)

× × ×

(ऋतुराज वसंत महाराजांचा पूर्ववत् दरबार . . . दरबारांतील आसनांवर पूर्वीप्रमाणेंच सर्व मांडलिक ऋतुराजे वसलेले असून रूपमती वर्षाराणीला सोबत घेऊन वसंतराज प्रवेश करतात.)

(राग :– मेघमल्हार. ताल – दादरा)

**पार्श्वगायक :–** कदंबवृक्षस्थित दिव्यमूर्ति:
मयूरवाह: करवीरपात्र: ।
हारीतवस्त्रो बहुनीलवर्ण:
सा वर्षा कथितो मुनींद्रै: ॥

**निवेदक :–** सावधान ! – सावधान ! –
वसंतराजा ! ऋतु अधिपती
दरबारीं सवें ये वर्षा-रती

(सतावरीवर आनंदाचे मधुर स्वर छेडिले जातात . . .)

ये मनहरिता वर्षाराणी
चकोर वसंता मनें वरोनी

सुंदरतेचा आगळिक नूर
लजवंती ती लाजेंत चूर
छेडित आली स्वर रागिणी
जीवा करीत नव हर्षित
साज जगाचा सुंदर कोरित
जीवनदायी ये प्रमुदिनी !

(सतारीवर आनंदाचे मधुर स्वर क्षणैक काल छेडिले जाऊन संगीत खंड सुरूं होतो. आणि नंतर पुन्हा रंगमंचकावर दोन्ही बाजूंनीं नृत्यांगना प्रवेश करून पहिल्या दृश्यांतील "करा जयजयकार" हें गीत गात नृत्य करतात व नंतर पटक्षेप.)

★★★

# बि ल्व मं ग ल

**कथासूत्र :** ‘ कृष्ण कर्णामृत ’ या काव्यकृतीचा कर्ता बिल्वमंगल हा बंगालमध्यें होऊन गेला.

चिन्तामणी नांवाच्या एका धार्मिक स्त्रीशीं बिल्वमंगलचा संबंध होता. ही स्त्री बिल्वमंगलला आपल्या वडिलांच्या ‘ श्राद्धाच्या दिवशीं ’ यायला आणि भेटायला मनाई करी; परंतु अशाच एके दिवशीं प्रणयविकारानें बिल्वमंगल तिच्या अटीची पर्वा न करतां रात्रीच्या वेळीं चिन्तामणीच्या घराकडे आला. पण काय ? दरवाजा बंद. चिन्तामणीला हांक मारली तरी ती घरांत घेणार नाहीं या विचारानें तो सापाची दोरी करून तिच्या घरांत शिरतो. पण हाय ! — या प्रयत्नांत साप त्याला डसतो; आणि तो बेशुद्ध होतो.

चिन्तामणीला बिल्वमंगलविषयीं वाटत असलेल्या आत्यंतिक जिव्हाळ्यामुळें ती त्याच्यावर उपचार करून त्याचा प्राण वांचविते. पण बिल्वमंगलचा आपल्या देहावरील अंध आसक्तीचा नाश व्हावा म्हणून तो शुद्धीवर येतांच अत्यंत विद्रुप वेषांत ती त्याच्यासमोर उभी राहते आणि देहाच्या क्षणभंगुरतेची त्याला जाणीव करून देते.

या दृश्यानें बिल्वमंगलला उपरति प्राप्त होते व तो उत्तरायुष्य कृष्ण-भक्तींत व्यतीत करतो.

---

**पात्रें :** ■ बिल्वमंगल : ■ चिन्तामणी

# बि ल्व मं ग ल

**निवेदक :–** वृन्दावनीं 'कृष्ण अमृत'
फुलते भक्ति ताटव्यांतून
हरिनामाच्या मधु गजरानें
भरूनी गेलें अवघें जीवन
त्या भक्तीचा गंध दरवळे
वसुंधरेच्या अंतर नसांत
धुंदीनें नभ धुंद डोललें
नक्षत्राचें गीत मधु गात
प्रेमरसानें न्हाऊन निघती
कृष्ण मूर्ति राजमंदिरीं
भक्ति रसाला येऊनी पूर
अभंग वाहे जे घरोघरीं

× × ×

दामोदर अन् निळी कुशींत
बिल्वमंगल जन्मे लीला
हरिचरणीं रत सदाची असे
फुलवुनी हृदिं भक्तीचा मळा !

(**स्थळ :** चिन्तामणीच्या महालाचें दृश्य. चांदण्या रात्रीची वेळ, आंतून पार्श्वसंगीताचे स्वर प्रथम उमटून स्पष्ट गीत-अभंग ऐकूं येतो. अभंग संपल्यानंतर रंगपीठावर बिल्वमंगल प्रवेश करून हलक्या आवाजांत चिंतामणीला हांक मारतो )

**बिल्वमंगल :** चिन्तामणी ! चिन्तामणी !
मी हा आलों माझ्या राणी
तुला सांगण्या प्रीति कहाणी
आरस्पानी आकाश फुलें
मधुचंद्रानीं गीत नाहलें
गा निर्झरा स्वैर गाणीं

तुला सांगण्या प्रीति कहाणी
चिन्तामणी ! ऐकलंस कां ?

(चिन्तामणी लगबगीनें बाहेर येऊन किंचित् भीतीनें, किंचित् आनंदानें बिल्वमंगलला आलिंगन देण्यास आपले बाहू पुढें करते.)

**चिन्तामणी :–** कोण मंगल ?
कां आला तूं ऐशा रात्रीं ?
रात्र सरे चांदण्या गात्रीं !

**बिल्वमंगल :–** मी कां आलों विचार चंद्रा
चंद्रिका झुरे शिवाय चंद्रा
प्रीत भ्रमरा कां सांगावें ?
पुष्पाजवळी धाऊनि यावें !
तसेंच तुझिया आलों द्वारीं
मागण्या भीक, प्रीति भिकारी !

**चिन्तामणी :–** असं होय !...
शब्दावांचुन सारें कळलें
प्रीत मनाचें मी आकळलें
तूं छेड मनीं प्रीति तारा
स्वर तयांचे मी अभिसारा
वसंतबहार नसांत फुलले
सुस्वर तुझे, माझे पैंजण
गीत तुझें तें, माझें कथन
मैफलीस रे रंगत भरले
स्मरति कां तीं प्रणय गाणीं
मधु करवंदी त्या आठवणी ?
तव प्रीतिं मी धुंद नहालें !

**बिल्वमंगल :–** चिन्तामणी !

**चिन्तामणी :–** मंगल !

**बिल्वमंगल :–** तें शब्दानें कां वदायचें असतें ?
प्रीतिभाषा प्रीतीस पुरे कळते !
उफाळतें तें धुंद अंतरीं
हवें नकोचें भान वितळतें
तरळावे मम नयनां पुढती
चांदण्यांतील प्रणय गीती
प्रीत प्रीतिचें जुळलें नातें

**चिन्तामणी :–** मंगल !

**बिल्वमंगल :-** चिन्तामणी !

(दोघांनाहि आनंद न साहून ते परस्परांना भेटण्याकरितां आपुलें बाहू पुढें करतात. पार्श्वसंगीताचा मधुर स्वर उच्चतम होत जातो.)

सखये जाऊं चल कुंजवनीं
पहा, वसंत फुलला ग वनीं
प्रीत गीत मधु चल गाऊं मधुर
मृदु मोगरा ग गुंफूं हार
गीत स्फुरती कोकिळ वदनीं !

**चिन्तामणी :–** घमघमला हा धुंद मोगरा
निशिगंध मंद येई बहरा
मत्तमयूर डोलतो वनीं !

(दोघेहि द्वंद्वगीत संपवून बागेंत जाण्यास निघतात; पण चिन्तामणीला आपल्या पित्याची आठवण होऊन ती थबकते, आणि थोडा वेळ थांबून मंगलला सांगते.)

**चिन्तामणी :–** सख्या ऐक तर एक विनवणी
नकोस येऊं उद्याच्या दिनीं

तुला सांगण्या प्रीति कहाणी
चिन्तामणी ! ऐकलंस कां ?

(चिन्तामणी लगबगीनें बाहेर येऊन किंचित् भीतीनें, किंचित् आनंदानें बिल्वमंगलला आलिंगन देण्यास आपले बाहू पुढें करते.)

**चिन्तामणी :-** कोण मंगल ?
कां आला तूं ऐशा रात्रीं ?
रात्र सरे चांदण्या गात्रीं !

**बिल्वमंगल :-** मी कां आलों विचार चंद्रा
चंद्रिका झुरे शिवाय चंद्रा
प्रीत भ्रमरा कां सांगावें ?
पुष्पाजवळी धाऊनि यावें !
तसेंच तुझिया आलों द्वारीं
मागण्या भीक, प्रीति भिकारी !

**चिन्तामणी :-** असं होय !...
शब्दावांचुन सारें कळलें
प्रीत मनाचें मी आकळलें
तूं छेड मनीं प्रीति तारा
स्वर तयांचे मी अभिसारा
वसंतबहार नसांत फुलले
सुस्वर तुझे, माझे पैंजण
गीत तुझें तें, माझें कथन
मैफलीस रे रंगत भरले
स्मरति कां तीं प्रणय गाणीं
मधु करवंदी त्या आठवणी ?
तव प्रीतिं मी धुंद नहालें !

**बिल्वमंगल :-** चिन्तामणी !

**चिन्तामणी :-** मंगल !

**बिल्वमंगल :-** तें शब्दानें कां वदायचें असतें ?
प्रीतिभाषा प्रीतीस पुरे कळते !
उफाळतें तें धुंद अंतरीं
हवें नकोचें भान वितळतें
तरळावे मम नयनां पुढती
चांदण्यांतील प्रणय गीती
प्रीत प्रीतिचें जुळलें नातें

**चिन्तामणी :-** मंगल !

**बिल्वमंगल :-** चिन्तामणी !

(दोघांनाहि आनंद न साहून ते परस्परांना भेटण्याकरितां आपुले बाहू पुढें करतात. पार्श्वसंगीताचा मधुर स्वर उच्चतम होत जातो.)

सखये जाऊं चल कुंजवनीं
पहा, वसंत फुलला ग वनीं
प्रीत गीत मधु चल गाऊं मधुर
मृदु मोगरा ग गुंफूं हार
गीत स्फुरती कोकिळ वदनीं !

**चिन्तामणी :-** घमघमला हा धुंद मोगरा
निशिगंध मंद येई बहरा
मत्तमयूर डोलतो वनीं !

(दोघेहि द्वंद्वगीत संपवून बागेंत जावयास निघतात; पण चिन्तामणीला आपल्या पित्याची आठवण होऊन ती थबकते, आणि थोडा वेळ थांबून मंगलला सांगते.)

**चिन्तामणी :-** सख्या ऐक तर एक विनवणी
नकोस येऊं उद्याच्या दिनीं

**बिल्वमंगल** :– हं, इतकेंच ना ? किती तूं वेडे !
प्रमाद कसा सांगतां घडे ?
हं चल आतां ! . . . .

(दोघेहि परस्पर हातांत हात घालून बागेंत जावयास निघतात. पार्श्वसंगीताचे करुण स्वर उठतात नि पटक्षेप.)

× × ×

(**स्थळ** : बिल्वमंगलच्या घराचें दृश्य. दुसऱ्या दिवसाची चांदणी रात्र. वातावरण आनंदानें नाहून निघालें आहे. संगीताचे मधुर स्वर वातावरणाला उठाव आणतात. पण बिल्वमंगलच्या मुखावर मात्र याच्या उलट स्थिति दिसते. तो अत्यंत अस्वस्थ झालेला आहे.)

**बिल्वमंगल** :– (उद्वेगानें)
आज मनाला अवचित कांही
मनोमलिनता कैसे येई
हृदी शल्यें आणि बोचतां
कांही मनास उमजत नाहीं
मनांत माझ्या अति धगधगते
विफलतेची धुंद वेदना
गहिंवरलेल्या मूक नयनीं
अतृप्तीची उठे वंचना
मनास भासे आतां वैरी
आज नभीचा हा चंद्रमा
होता आषक अनावर ओढ
मनां झांकले दारूण तमा
उन्मनींमधि सुकतो मनिचा
अर्धोन्मीलित भाव-मरंद

आणिक शिशिरीं जैशी गळतीं
पानें सुकुनिया निर्जिव मंद
स्वप्न शय्या सांगे मजला
मुग्ध लाडिक रेशिम गूज
आज भासते परि तीच मला
कठोर कटंक नागिण शेज !

(भयाण वातावरणाच्या पार्श्वभागांतून कुणाचे तरी अदृश्य आवाज उठतात. बिल्व किंचित् भांबावून इकडे तिकडे पाहूं लागतो. चिन्तामणीच्या अदृश्य आवाजानें त्याला थोडेसें हायसें वाटूं लागतें. तो तिला शोधण्याकरितां पुढें जातो तोंच..)

**बिल्वमंगल :-** (आनंदून..) चिन्तामणी !

**गुप्त आवाज :-** मंगल !

**बिल्वमंगल :-** चिन्तामणी !
सखे सांग तूं आहे कोठें ?

**गुप्त आवाज :-** मी आहे तूं असशी तेथें !

**बिल्वमंगल :-** खरंच !
(तिला भेटण्याकरितां पुढें जाऊं लागतो तोंच...)

**गुप्त आवाज :-** हं, थांब मंगल !
नकोस होऊं तूं अधीर असा
होशिल ना तरि वेडापिसा
न आठवें कां त्वदीय वचन
निजधर्मास तूं जाग वंदून
वासना ओढ मनां भेदून
ओढवी घोर भयाकुल मरण

आसक्तीची धुंद नागीण
दंशुनी करी विकल प्राण

**बिल्वमंगल :–** चिन्तामणी !
स्थितप्रज्ञांच्या चितेवरील
मरण पाहिजे मजला जळते
तव प्रीतिस्तव माझी प्रीति
तुझ्यांत जळते आणिक उलते !
जीवनाच्या स्वप्न वेदिवर
प्रीतिकलिका एकदां फुलते
आणि भंगतां स्वप्नें मनिंची
सर्वस्वाची हानि होते !
चिन्तामणी !
सखे सांग तूं आहे कोठें !

(उद्विग्नावस्थेंत तिला भेटण्याकरितां धांवत सुटतो. वातावरणांत भयाण उदासीनता पसरूं लागते... करुण पार्श्वसंगीताचे स्वर उच्चतम होत जातात नि पटक्षेप.)

× × ×

(**स्थळ :** चिन्तामणीचा महाल. बिल्वमंगल या पूर्वीच्या रात्रीं सापाची दोरी करून चिन्तामणीच्या घरांत शिरत असतां त्या प्रयत्नांत साप त्याला डसतो. त्यावर उपचार करून चिन्तामणीनें त्याला बरें केलेलें आहे...)

**निवेदक :–** येतां अधिरें सखीच्या घरां
दार बंद तो दृष्टीस पुरा
अंतरिं वाढे प्रेमातुरता
भेटीविन ना शमेच पुरता

येतां नजरे साप भयंकर
दोरी वाटून चढे त्यावर
दोरी न, हाय ! फांस दोरी
डंसतांच पडे मरणा द्वारीं

चिंतामणीच्या प्रीतीनें त्यास
लाभे जीवन आणि उल्हास
परि सौंदर्य मिळवी मातींत
वेड जयाचें अति असे अमित !

(बिल्वमंगल मंचकावर कण्हत झोपलेला असून धडपडून उठण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याच्यासमोर पडद्याच्या आड चिन्तामणी अत्यंत विद्रूपावस्थेंत उभी असून तिच्या तोंडावरचें सौंदर्य पूर्ण लयास गेलेलें असून तिथें घृणा वास करीत आहे.)

**बिल्वमंगल** :– (कण्हत) चिन्तामणी !

**चिन्तामणी** :– (निर्विकारपणें) मंगल !

**बिल्वमंगल** :– (स्वतःकडे पाहून) चिन्तामणी !
हाय ! काय ही माझी अवस्था
लागे कैसे शून्य व्यथा !
ये सामोरी चिन्तामणी !
दुःख मनींचें पुरते वितरी
चिन्तामणी !–
सखे सांग तूं आहे कोठें ?

**चिन्ता०** :– मंगल ! आहे मी तूं जेथें !

**बिल्व०** :– मग ये ना गे, मज सामोरी

**चिन्ता० :–** (उद्वेगानें) हं, नको मंगल. नको नको रे !

**बिल्व :–** चिन्तामणी ! –माझी शपथ ! . . . .

(खरकन् पडदा सारून पडद्याआडून चिन्तामणी बाहेर येते नि त्याच्यासमोर उभी राहते. तोंच .. तिच्याकडे पाहून बिल्वला आकाश कोसळल्यागत वाटून त्यास रडूं कोसळतें.)

**बिल्व० :–** चिन्तामणी !

हाय ! काय हें केलें वैरी
मम प्रीति तूं ग मारली पुरी
संमोहन मज कां नावारलें
नको तेंच गे घडलें जडलें
मूढे दुर्बल तूं किती तरी
प्रिय प्रियतम मन मीलनास
आतुरले मम मनोज श्वास
स्वप्नें विरलीं मृत्तिकांतरीं
प्रीत मी तुवां सदय मागतां
त्याची हो परि अशी सांगता
आर्त विराणी आंसव-सरी
फुललेली मम मधु प्रीतिकळी
निर्माल्य कां तूं तें केली
मत्प्रीतीला कां शाप-सुरी ?

**चिन्ता० :–** मंगल !

किती रे तूं असशी वेडा
भावभुकेला जणूं भाबडा !

बिल्व० :– चिन्तामणी !

वेड पांघरून न हो मन-पूर्ति
प्रेम निदान करी मन तृप्ति !

चिन्ता० :– प्रेम मरण हें भीति कुंपण
सुखसंचिताचें जळकें गान
अतृप्तवास वासना जळे
समागमांतुन शून्यच गळें

बिल्व० :– चिन्तामणी !

प्रणय मम कां गेली विसरून
कठोर इतुकें कां केलें मन ?

चिन्ता० :– आसक्तींत मम क्षाळुनि काया
विकल मन हो व्याकुळ हृदया
मोहपाश हा पाप अभिशाप
जरा मृत्युचा घोर प्रलाप
योगिनी व्रत उठे हुंकार
हृदयां प्रीति दग्ध अंगार !

बिल्व० :– (गहिंवरून) चिन्तामणी !

होई सुटका कसे बंधाचे
तुटती कैसे पाश जरेचे ?

चिन्ता० :– तनमन झिजवी प्रभुपराणी
आणि व्रतस्थ रहा निशिदिनीं !

(रंगपीठाच्या कोपऱ्यांत श्रीकृष्णाच्या मूर्तीजवळ दोघेहि जाऊन थोडा वेळ ध्यानस्थ होतात. आणि नंतर हातात टाळ-चिपळ्या घेऊन अभंग गातात.)

बिल्व०, चिन्ता० :– जय कृष्ण हरि। जय कृष्ण हरि
ताप मनीचे तूं नाश करी

तुझ्या पदिं रत हो मनोकुरंग
भक्तिरसाला येऊं दे रंग
चंचल मन शमवि प्रतिहारी
पेटतां अंतरि दुःख निखारे
उबवुनी मना शमवी सारें
दीन नाम तूं दूर विदारी

(वातावरणांत गंभीर शांतता. मंगलसूचक पार्श्वसंगीताचे स्वर आणि शंख, घंटादीचे स्वर उठतात नि पटक्षेप.)

***

शु क – रं भा

**कथासूत्र :**

शुकाला चिरतारुण्याचा वर मिळालेला असतो. तो पुरा ब्रह्मचारी असून अजय असतो. त्याचें ब्रह्मचर्य हरण करण्याकरितां इंद्र आपल्या दरबारांतील लावण्यलतिका रंभा या अप्सरेस पृथ्वीवर पाठवितो.

यौवनगर्वा रंभा ही मोठ्या साजशृंगारानें पृथ्वीवर येऊन विविध शृंगाराभिनययुक्त चाळे करून आणि वेगवेगळ्या नृत्याविष्कारानें शुकाचें मन मोहित करण्याचा प्रयत्न करते.

परंतु मनोनिग्रही शुक हा तिच्या प्रणय पाशांत मुळींच फसत नाहीं. रंभा आपल्या प्रयत्नांची शिकस्त करते. पण हाय !—

***

पात्रें :

- शुक
- रंभा

## रचना !

या संगीतिकेचे सर्व प्रसंग जंगलांतच घडतात. रंगमंचकावर जंगलाचें दृश्य साकार करून एका बाजूला घनदाट झाडी, दुसऱ्या बाजूला उंचच उंच पर्वतश्रेणी दाखवाव्यात. जवळूनच नदी वाहत असल्याचीहि कल्पना यावी.

शुक पद्मासन घालून घोर तपास बसलेला असून त्याच्या चेहऱ्यावर पूर्ण ब्रह्मचर्याची आभा पसरलेली दाखवावी.
संगीतिकेच्या प्रथम खंडांत धीर गंभीर वातावरणाची निर्मिती करून नंतर रंभेच्या प्रवेशाच्या वेळीं वातावरणांत शृंगाराचा बदल करावा.

रंभेचें आगमन हें ऋतुविलासाचें आगमन असें दाखवितां आलें तर शृंगार रसाला अधिकच उठाव मिळेल.

शुकाचा पोषाक एकाद्या ब्रह्मचर्य महर्षीला शोभेल असा वैराग्यपूर्ण असावा. आणि रंभेची वेषभूषा आणि केशभूषा मौल्यवान् वस्त्रालंकारित असावी.

प्रसंगानुकूल संगीत खंडांतून शांत वा शृंगारोत्तेजक स्वरांची योजना करावी.

★★★

# शु क – रं भा

(शुक पद्मासन घालून तपास बसला आहे. आजूबाजूस धीरगंभीर वातावरण पसरलेलें असून सृष्टींत प्रसन्नता नांदू लागली आहे. पार्श्व-संगीत खंडांतून मधूनच शृंगारिक स्वर निघून नादमय नूपुरांचा आवाज हळूहळू कानीं पडूं लागतो. मोठ्या शृंगारानें रंभा रंगमंचकावर नृत्याचीं आवर्तनें घेत प्रविष्ट होते.)

**रंभा :–**

सुंदर किती नंदनवन फुललें
या हरित तृणानें तव कोंदण भरलें !
नसनसांत भरला वासंतिक हा मदन
रतिरंग अनंगें सोडियला जणुं बाण !
फुलवाया नवजीवन या अवनीवरती
प्रत्यक्ष प्रगटला कुबेर धरणीवरती
विशाल अपुल्या पंखाच्या छायेंत
पातला घेऊनी स्वर्गाची दौलत
खळखळ कड्याकपारीं होऊन धुंद
जोषांत झोकुन अंग करि मति दंग !

(नृत्याचा परत एक बहारदार तुकडा. शृंगारोत्तेजक संगीताचे स्वर उच्च होतात. नृत्याबरोबर तोडीची साथ सुरूं होते.)

**निवेदक :–**

धिगित धिगित धा धा।
थय थय था। थय थय था।
थय गिडितन तकतुन।
गिडित तकतुना। थय थय था।
धिगित धिगित धा धा।

**रंभा :–**

आकाशीच्या अवखळ तारका
हंसल्या कमळाच्या नयनांनीं
ती धुंद कलिका नवथर बाला
बोलली भ्रमर-पक्ष्यांच्या बोलांनीं

नसनसांत फुललें वासंतिक वारें
जोषांत गुंगलें जीव अर्पुनि सारें

(परत तोडीची साथ घुमूं लागते.)

**निवेदक** :- धा धा दिता कीट धा दिता
थीटकत गदि गन धा
धा कीट धा कीट कीट
धा धा कीट तक धा कीट

(नूपुरांचा आवाज घुमूं लागतो.)

**रंभा** :- छूम छूम छूम छूम छूम
पदि नूपुर हें मत्त वाजें

(पखवाजाचा आवाज होऊं लागतो.)

ठम ठम ठम ठम ठम
पखवाजहि धुंद साथ साजे

(पेटीचे आलाप निघतात.)

स्वर गाण्याचे मनीं दाटले
सा रे ग म प ध नी सा
सा नि ध प म ग रे सा
पसा नीध धनी धप नीध पऽम गरेसा
गरेसा ऽ नीध नीध रे ऽ रे ऽ प ऽ प ऽ
तव प्रीतीनें मला बांधिलें !

(नृत्याचीं अनेक आवर्तनें होत असतां धुंद वातावरणाच्या पार्श्व-भूमीवर संगीत स्वर क्षणैक काळ उच्चतर होऊन पटक्षेप.)

***

थो रा तां ची  क म ळा

## कथासूत्र :

छत्रपति शिवाजी महाराजांच्या काळांत होऊन गेलेल्या थोरात नांवाच्या सरदार कुळांत स्वरूप-सुंदर कमळेचा जन्म झालेला असतो. तारुण्याची कळी नुकतीच उमलूं लागल्यानें कमळा ही चार-चौघींत उठून दिसत असे. अशी ही सौंदर्यखाणी भोळी हरिणी छत्रपति संभाजीच्या नजरेच्या टप्प्यांत येते आणि संभाजी तिला लग्नाचें अभिवचन देऊन रायगड किल्ल्यांत नेऊन ठेवतो. संभाजीच्या जाळ्यांत आपण पूर्णपणें फसलों याची कल्पना आल्यानंतर कमलेला झाल्या गोष्टींबद्दल फार पश्चात्ताप होतो.

आपल्या देहाची विटंबना झाली, आतां जगून काय करायचें असें वाटून किल्ल्याच्या बुरुजावरून ती आपल्या देहाला खालीं लोटून आपल्या जीवनाचा अन्त करून घेते

★★★

पात्रें :

- कमला
- संभाजी

४५०९४ दि:
१६३८

## पूर्वरंग :

या संगीतिकेंतील प्रसंग शिवकालीन असून संभाजीच्या रंगेल जीवनाची छटा यांतून पहायला मिळते . .

या संगीतिकेचे दोन खंड पडतात. एक पूर्व खंड आणि दुसरा उत्तर. प्रथम खंड निसर्गानें नटलेल्या वनराईत घडतो आणि दुसरा खंड रायगडच्या किल्ल्यांत घडतो.

प्रथम खंडांतील वनराईची कल्पना येण्यासाठीं जंगलाचें अथवा वनराईचें दृश्य मंचकावर उभें करावें. वनराईतील वातावरण नव्या वसंतोत्सवानें नटल्यानें मंगलता नांदत असल्याची प्रचीति सहजपणें यावी. अधून मधून कोकिलेचें मधुर प्रेमी कूजन ऐकूं येत असल्याचा आभास पार्श्वसंगीतांतून निर्माण करावा.

पहिल्या प्रसंगांतील संभाजी–कमलेच्या भेटींत शृंगारिक वातावरणाची पार्श्वसंगीतांतून निर्मिति झाल्यास प्रस्तुत प्रसंगाला उत्कटता येईल.

दुसऱ्या खंडांतील रायगड किल्ल्याचें दृश्य पडद्यानें रंगमंचकावर साकार केल्यास अधिक बरें. शेवटच्या प्रसंगांत कमला किल्ल्याच्या बुरुजावरून उडी ठोकते या प्रसंगीं पार्श्वसंगीतांतून परिणामकारक आवाज निर्माण करून त्यास करुणार्त स्वरांची साथ द्यावी.. शक्य तों हा प्रसंग संध्याकाळीं घडतो असा आभास निर्माण करून संधिप्रकाशाची कुशलतेनें योजना करून प्रसंगाला उठाव द्यावा.

संभाजी आणि कमलेची वेषभूषा ही शिवकालीन असली पाहिजे, त्यांत आधुनिकता मुळींच दिसतां कामा नये.

प्रसंगानुकूल पार्श्वसंगीताची व प्रकाशाची योजना करावी.

★★★

# थोरातांची कमळा

**निवेदक :–**

सत्या देई नित्य आत्नबल
दुष्टां होई कर्दनकाळ
प्रिय आमुचा महाराष्ट्र देश !
नरवीरांची इथेंच खाण
साधु-संतां इथेंच मान
गुरुस्थानीं हो अखिल जगास !
तापी – गोदा, कृष्णा – कोयना
नित्य चेतना देती प्राणां
सौंदर्य महा दिपवि नयनांस !

× × ×

इथें जन्मला शूर शिपाई
मराठ मोळा शिवबा राणा
धर्मास्तव अन् सत्यास्तव
प्राणाचा तो करी नजराणा
नीति–नियमांचा पालनकर्ता
परस्त्रीस तो मानी आई
सूर्यापोटीं शनि संभाजी
इष्कबाजीनें मदांध विषयी

× × ×

थोरात कुळीं जणु कमलकळी
मदन मनोरम मूर्ति साजिरी
यौवन लावण्य अंगीं रूपीं
अनंग – ध्वजा असे अंतरीं

राजस गोरी रंग गव्हाळी
पित शेवंती मृदु नहाळी
आतुर नयनीं सस्मित वदनीं
धुंदिल धून अंगि झळाळी

(**प्रसंग :** निसर्गानें विनटलेल्या वनराईंत कमलवाला निर्भर आनंदानें बागडूं लागलेली आहे. वातावरणांत प्रसन्नता भरलेली असून कोकिळेचें मधुर कूजन घाललेलें आहे. संगीताचे मंगल स्वर उमटूं लागलेले आहेत.)

**कमला :–** आंबराईंत कोयल बोले
प्रीतीनें कुंजवन डोलें !
राघू-मैनेची जमली जोडी
तयां प्रीतिची लागली गोडी
वनवल्लरींत गीत रंगलें !
वनीं मोहरे लता मंजिरी
झुले डहाळी आंब–सेंदरी
नंदनवन जणुं तळिं अवतरलें !
किलबिलतीं गगन पांखरें
झुळझुळतीं निर्झर, वारे
रोमरोमीं रसरंग भरले !

**निवेदक :–** अनंगरंगें रुंजी घालीत
कमळणी प्रति भ्रमर – यावा
ये संभाजी इष्कबाजी
धरुन मनि मधु-रंग लुटावा

(रंगमंचकावर संभाजी प्रवेश करतो. एकाएकीं तो आल्याचें पाहून कमला प्रथमतः किंचित् घाबरते. नंतर दोघांची दृष्टादृष्ट झाल्यावर तिच्या अंगावर प्रणयाचे रोमांच उभे राहतात.)

**कमला :–** (किंचित् भीतीयुक्त लज्जेनें)
कोण, कुठले तुम्ही शिकारी ?
वाट चुकली कां सांगा तरी !

**संभाजी :–** मर्द मराठा शूर शिकारी
झालों तत्र मी प्रीत-भिकारी !

(दोघांची परत दृष्टादृष्ट होते. संभाजी तिचा हात हलक्यानें धरतांच ती लज्जेनें चूर होते.)

**कमला :–** थोर कुळींची मी तर कन्या
वरणार कशी मग सामान्या ?

**संभाजी :–** शंभु–पुत्र मी शिवरायाचा
भावी राजा या देशाचा !

**कमला :–** क्षमस्व राज ! क्षमा करावी
अपराधाची चुकी असावी

**संभाजी :–** नेईन उद्यां तुज शिवनेरी
करीन तुजला कांता-सुंदरी

(संभाजी निघून जातो. त्याच्याकडे ती प्रणय भावनेनें पहात राहून त्या आनंदांत गाणें गुणगुणूं लागते. )

**कमला :–** माझें कांही आज हरवलें
मनास माझ्या कुणीं जिंकिलें !
प्रीतीच्या त्या लेखित रेषा
नयनांची ती नाजुक भाषा
स्वप्नसमयीं भान कुणां नुरलें !
रंग कुसुंबी वसंत कालीं
कोकिळ राणी हंसली गालीं
तन्वांगावर रंग रंगले !

× × ×

**निवेदक :–** भोळी हरणी सहजीं फसली
प्रणय मदाच्या जाळीं पडली
नागाचा जणुं व्याळ फूत्कार
चंदनाला विळखा घाली.

कौमार्य चिर चूरित झाले
उमलण्याधि चुरुनि गेलें
पतित जिणें ये अदय कपाळीं
काय करी नियती कवणें काळीं ?

(रायगडच्या किल्ल्यांत कमलेला बंदी घालून ठेवलेलें आहे. ती अतिशय दु:खी झालेली असून पापाच्या पश्चात्तापानें एकसारखी तळमळत आहे. गंभीर वातावरणाच्या पार्श्वभूमीवरून करुण संगीताचे स्वर मनाला अधिकच चटका देतात.)

**कमला :–** सुभाग्य माझें भंगुन गेलें
जीवन माझें अवघें सरलें !
पतित जिणें मम लाजिरवाणें
हें जिणें कसलें ! जिवंत मरणें !

प्रेमभाव जगिं नाहीं उरला
स्नेहभावहि पुरता सरला
निरपराधी कलंक भाळीं
या जीवाची करतो होळी !

(दु:खावेगानें कमला कपाळाला हात लावून नेपथ्याकडे पळत जाते. एकदम मोठ्यानें आंतून करुण किंकाळी ऐकायला येऊन बुरुजावरून ती पडल्याचा जोराचा आवाज निघतो. करुण – गंभीर वातावरणाच्या पार्श्वभूमीवर संगीत खंडाचे आर्त स्वर उच्चतर होत असतांनाच पटक्षेप.)

***

मु र ली

## कथासूत्र :

राधा-कृष्णाच्या प्रणयाची ही एक मधुर कहाणी आहे.

राधेला कृष्ण कुंजवनांत भेटनि असें आश्वासन देतो. परंतु तो आपलीं आश्वासनें पाळत नाहीं. राधा त्याची मार्गप्रतीक्षा करून दुःखित अंतःकरणानें घरीं परतते. असेंच किती तरी दिवस आणि रात्री लोटतात. परंतु एकदां कृष्णानें राधेला दिलेलें भेटीचें आश्वासन पूर्ण केलें.

राधा त्याच्या धुंद वेणूमधून निघणाऱ्या स्वर-बोलांनींच हारोहारीं मनांत खुलून गेली, आणि कृष्ण जवळ येतांच त्याला तेच बोल परत परत घुमविण्याचा आग्रह करूं लागली.

....आणि मग कृष्णाच्या बांसरींतून निघणाऱ्या नादब्रह्मांत ती विलीन होऊं लागली. ....अगदीं पूर्णपणें.

★★★

पात्रें :–

- राधा
- कृष्ण
- इतर गोपी

# पूर्वरंग

या संगीतिकेंतील सर्वच प्रसंग कुंजवनांत घडतात.

रंगमंचकावर कुंजवनाचें दृश्य साकार करावें. प्रसंग दुपारचा असल्यानें निसर्गांतील विविध हालचालींची कल्पना आल्यास अधिक बरें होईल !

प्रथम दृश्यांत राधा ही कृष्णाच्या आगमनाची वाट पाहते. तेव्हां तिच्या मनांत उठणारे नैराश्यानंदाचे विविध भावतरंग सूक्ष्मपणें साकार करतां येतील.

दुसऱ्या प्रसंगांत कृष्णाची भेट झाल्यानंतर राधेच्या चेहऱ्यावर घडणारा प्रसंग सूक्ष्मपणें टिपतां आला पाहिजे.

वेणूच्या धुंद स्वरांबरोबर इतर भावसंवेदक स्वरांचीहि योजना पार्श्वसंगीत खंडांतून झाल्यास या प्रसंगाला उत्कटता मिळेल.

★★★

# मु र ली

( स्थळ :– वृंदावन, सखींसमवेत राधा क्रीडा करूं लागली आहे. मधून मधून दूर दृष्टी फिरवून कुणाची तरी ती वाट पाहूं लागली आहे. निसर्ग-सौंदर्याच्या पार्श्वभूमीवर पार्श्वसंगीताचे आनंदवर्धक स्वर आसमंतांत दरवळूं लागले आहेत. कृष्णकन्हैयाची वाट पाहून पाहून राधा थकून जाते. ती मनांतल्या मनांत उदास होते. तिला सुचत नाहीं. ती अधिऱ्या नजरेनें परत कृष्णाच्या वाटेकडे पाहूं लागते. पार्श्वसंगीत खंडातून किंचित् करुण स्वर उमटतात. )

**राधिका :–** वाट पाहुनि थकले रे गोपाला
सावळचा ! चांदचकोरा ! घननीळा !
हांसती गोकुळीच्या ललना
नाचती मनिं प्रीतिभावना
अनुराग नयनीं, हृदयीं दाटे प्रेमकळा
श्यामल तव कंठीं गळां
कोमल कर माझ्या गळां
अधर चुंबुनी वेड जिवा लाविशी वेल्हाळा
श्यामल नयनीं तुझीच मूर्ति
कोमल ओठीं तुझीच पूर्ति
प्रेममया, स्नेह जिवा देई नंदलाला !
बावरी राधा, सुटला तोल
सावरी हृदया प्रीति बोल
रिझवी मना, सुखवी दिना, लावुन गोड ळळा !

( एकाएकीं पार्श्वसंगीत खंडांतून बांसरीचे धुंद स्वर उठतात. बांसरीची धुंदिल धून ऐकतांच राधेला अत्यानंद होतो. ती मनांतल्या मनांत हारोहारीं फुलते. आणि आपल्या मैत्रिणींसमवेत आनंदानें नाचूं लागते. कृष्णकन्हैय्या आपल्या हातांत बांसरी घेऊन प्रवेश करतो. वातावरणांत आनंदी छटा तरळून उठतात. रंगमंचकावर कन्हैया परत बांसरीचे धुंद स्वर काढतो. त्या स्वराला राधिका गीताची साथ देते. )

**राधिका :-** जादु तुझ्या मुरलींत नंदकिशोरा !
नाद मुरलीचा घुमव जरा
सप्त सुरांची धुंद रागिणी
तालावरती नाचती गौळणी
टिपरीच्या रे मधुर रिंगणीं
मुरलीरवें नाच मानस-मोरा !
नभिं पसरलें टिपुर चांदणें
नाचवी छुम् छुम् किरण पैंजणें
रात्र सरली कुठवर छळणें ?
प्रीत तुझी रे कळली चतुरा !

( बांसरीच्या आलापाबरोबर कृष्ण, राधा व इतर गोपी फेर धरून क्रीडा करतात. पार्श्वसंगीतांतून आनंदवर्धक स्वर उच्चतर होत जात असतांनाच पटक्षेप. )

***

म हा श्वे ता

**कथासूत्र :** नादलुब्ध पुंडरिक हा महाश्वेतेच्या सतारगीतावर अतिशय मोहित असतो. महाश्वेतेच्या सतारीवर गायिलेल्या गीतानेंच त्याला महाश्वेतेच्या प्रेमपाशांत ओढलेलें असतें.

पुंडरिक कोठेंहि असो महाश्वेतेच्या स्वरगीताच्या आलापानें तिजकडे आकर्षिला जाई. जणुं महाश्वेतेचें संगीत म्हणजे पुंडरिकाचे प्राण !

महाश्वेता सतार छेडीत असे आणि पुंडरिक तिच्या स्वराला गीताची साथ देई. दोघेहि गीतस्वरांच्या कल्लोळांत बुडून जात असत.

अशी ही महाश्वेता-पुंडरिकाची नादब्रह्म संगीतमय कहाणी आहे !

★★★

**पात्रें :–** ■ महाश्वेता ■ पुंडरिक

## रचना :

या संगीतिकेंतील सर्वच प्रसंग पौर्णिमेच्या रात्रीं शुभ्र प्रकाशाच्या पार्श्वभूमीवर घडतात. वातावरण प्रशांततेनें भरलेलें दाखवावें आणि अशा शांत वातावरणांतून सतारीचे धुंद स्वर निनादले जाऊन वातावरणाला अधिकच उजाळा आणल्याचा आभास निर्माण करावा.

रंगमंचकावर पौर्णिमा रात्रीचें दृश्य साकार करण्यांत यावें.

पुंडरिक आणि महाश्वेता यांच्या युगलगीतांतून परस्परांवरील प्रणयाची उत्कटता प्रतीत झाल्यास अधिक बरें !

पुंडरिक महाश्वेतेची वेषभूषा साधी पण सोज्वळ असावी.

★★★

(शुभ्र पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर सतार छेडीत महाश्वेता बसली असून सतारीच्या धुंद स्वराबरोबर अत्यंत मधुरतेनें गीत आलापीत आहे.)

**महाश्वेता :–** नाचती गगनांगणीं या सुरबालिका
मोदें नादस्वरें धरुन फेर-मालिका
प्रणयसिंधु हृदय विकल करी
बरसे वरतुन तेजाच्या सरी
उठति मनिं तरंग स्तवें मदन-वीचिका !
शांति सुधारसें सृष्टि नहाली
पुष्प गळे, गंध झरे भंवताली
गगनांगणीं खुले साजिरी चंद्रकलिका !

(पार्श्वसंगीत खंडांतून धुंद सतारीचे स्वर आणखीन छेडिले जातात. या धुंदींतच पुंडरिक प्रवेश करतो.)

**पुंडरिक :–** नभिं लांच्छना जरी चंद्रमा
ना संभ्रमा तव प्रेमा !
झगमग झगमग डोले दुनिया
प्रणयकला तव फुलवी काया
नयनीं बसली तुझी प्रतिमा !
तुझ्या प्रीतीचा गोड जिव्हाळा
हृदया दे मम चिर उजाळा
विमल हृदय हें सुखवी गरिमा !
प्रीति तव अनुरागें रंगे
घालुन कर हे करांत वेगें
फुलवुं प्रीति यामिनी सुषमा !

(क्षणैक काल परत सतारीचे स्वर उच्च होतात, दोघेहि आनंदानें गीताचे आलाप देतात.)

पुंडरिक :- नयनीचें रूप तुझें मनीं माझ्या झांकळतें
मनीं माझ्या झांकळतें !

महाश्वेता :- वदनाचें तेज तुझें मम नयनां दीपवितें
मम नयनां दीपवितें !

पुंडरिक :- अधरीचें स्मित तुझें माझ्या मना नाचवितें
माझ्या मना नाचवितें !

महाश्वेता :- ओठाचे स्पर्श तुझे मम ओठां सुखविते
मम ओठां सुखविते !

पुंडरिक :- हृदयीचें गूज तुझें मन्मनास रंजवितें
मन्मनास रंजवितें !

महाश्वेता :- प्रीतीचें गीत तुझें मम प्रीति जिंकियतें
मम प्रीति जिंकियतें !

(दोघांच्या जुगलबंदी गीतानंतर सतारीच्या स्वराच्या पार्श्वभूमीवर पटक्षेप.)

***

मीरा

**कथासूत्र :**

राणा कुंभाची पत्नी मीरा ही अतिशय कृष्णभक्त व कृष्णप्रेमी असते. तिचें सर्व लक्ष कृष्णभक्तीवर केंद्रित झालेलें असतें. अशा रीतीनें संसारांतून तिचें मन उडाल्यामुळें आणि कृष्णासच तिनें आपला सखा मानल्यामुळें राणाच्या मनांत अर्थात् तिच्या-बद्दल रोष होतो.

कृष्णाच्या भजन कीर्तनरंगीं एकदां अशीच मीरा-बाई रंगली असतां राणा क्रोधांत येऊन लाथेनें तिची एकतारी दूर भिरकावून देतो आणि तुझा कृष्ण तुला तारणार असें तूं सांगतेस तेव्हां या विषाचें सेवन केल्यास तो कसा तुला तारतो तें मला पाहूं दे !' असें म्हणून विषाचा प्याला तिला प्राशन करण्यासाठीं देतो.

मीरा मोठ्या आनंदानें पतीच्या हातून विषानें भरलेला प्याला घेऊन कृष्णनाम घेत विषप्राशन करते !.... आणि कृष्णाच्या साक्षात्कारांत विलीन होते.

★★★

पात्रें :

- मीराबाई
- राणा कुंभ

## रचना :

या संगीतिकेंतील सर्व प्रसंग कृष्ण मंदिरांतच घडतात. पहिला प्रसंग कृष्णपूजेचा असल्यामुळें कृष्ण-मंदिराचें दृश्य पहायला मिळावें. मंदिर कृष्णभक्तीनें गजबजून गेल्याचाहि आभास निर्माण केल्यास अधिक बरें ! पार्श्वसंगीतातून घंटा, टाळ, एकतारी, चिपळ्या इत्यादि वाद्यांचा आवाज सूचित व्हावा. कृष्णमूर्तीपुढें मीरा बसून प्रथम कृष्णपूजेची सांगता रचत असतांना पूजेचें सर्व साहित्य मूर्तीपुढें व्यवस्थित मांडलेलें असावें.

दुसऱ्या प्रसंगांत पार्श्वसंगीत खंडांतून करुण स्वर काढून राण्याच्या क्रुद्धतेला अधिकच उठाव आणावा. विषप्राशनाचा प्रसंग करुणोदात्त करावा व तो अधिक भेदक होण्या-साठीं पार्श्वसंगीत खंडातून करुण भेदक स्वरांचा उठाव व अंधुक प्रकाश योजना करावी.

***

# मीरा

(**स्थळ** : कृष्ण-मंदिर. कृष्णाच्या मूर्तीपुढें मीरा एकतारीवर कृष्णाची आराधना करूं लागली आहे. कृष्णमूर्तीपुढें पूजेचें साहित्य मांडलेलें असून दोन्ही बाजूला दोन मोठ्या समया ठेवलेल्या असून उद-बत्तीचा धूप चोहोंकडे दरवळूं लागला आहे.)

**मीरा** :— जय कृष्ण हरि, जय कृष्ण हरि
ताप मनींचा दूर करी !

(या गीतपंक्तीचे दोन तीनदां आवर्तन झाल्यानंतर एकतारीवर परम गीत आळवूं लागते.)

विटलें मन संसारा !
हे प्रभो ! विटलें मन संसारा !
विकट भाळीं, संसार जाळीं
नच विसावा जळीं-काळीं
पुरता नाहीं आसरा ! प्रभो.
प्रेमभाव जगिं नाहीं उरला
स्नेहभावहि पुरता सरला
नाहीं जगिं उबारा ! प्रभो.

(एकतारीवर क्षणैक काळ सुर छेडिले जातात. पूजेची परत एकदां सांगता करून परत एकतारीवर गीत आलापूं लागते.)

कैसें पाहूं रूप तुझें
कृष्णा ! या लोचनानें
कैसें गाऊं गान तुझें
कृष्णा ! या आननानें !
पळभर भक्ति तुझी न अडली
तीर्थाटणेंहि कधीं न केली
तुझ्या प्रीतीची मी विरहिणी !

प्रकाश पसरो तव भक्तांचा
घोष घुमूं दे तव नामाचा
वंदिते तव पदां मी भाविणी !

(एकाएकीं वातावरणांत परिवर्तन घडून पार्श्वसंगीतावर क्षणैक काळ करुण स्वर छेडिले जातात. राणासंग क्रोधांत प्रवेश करतो आणि मीरेच्या हातांतील एकतारी लायेनें दूर करतो.)

**राणा :–** कुठें आहे तुझा देव ?
दाव कुलटे मला दाव !
देव तुझा जर असे महान्
सत्वर कर हें विषपान !

(मीरा विषाचा प्याला आपल्या हातांत घेऊन विषपान करते.)

**मीरा :–** जय कृष्ण हरि, जयकृष्ण हरि
ताप मनीचा दूर करी
जयकृष्ण हरि, जयकृष्ण हरि

(विषाचा प्याला खालीं पडतो. वातावरणांत बदल घडून पार्श्व-खंडावर करुण रसाचे स्वर उच्चतर होत जातांनाच पटक्षेप.)

★★★

# प त्र ले ख न

**कथासूत्र :**

शकुंतलेच्या जीवनांतील एका अत्यंत मधुर अशा प्रसंगावर ही संगीतिका आधारलेली आहे.

कण्व ऋषींच्या न कळत शकुंतलेशीं गांधर्व विवाह करून व एक महिन्यानें परत येऊन जाईन असें आश्वासन देऊन दुष्यंत जो जातो तो कायमचाच ! इकडे शकुंतला अत्यंत दुःखी होते आणि शोकाकुल होऊन दुष्यंताची मार्ग प्रतीक्षा करूं लागते. ....पण हाय ! —

मालिनी तीरावर आपल्या सखी प्रियंवदा, अनुसया व इतरांबरोबर क्रीडा करीत असतांना तिला दुष्यंताची आठव येते, आणि ती त्या स्मृत्यावेगांत कमल-पत्रावर कमलाच्या देठानें दुष्यंताला पत्र लिहूं लागते.

तिच्या जीवनांतील दुसऱ्याला तिनें लिहिलेलें हें पहिलेंच पत्र आणि तेंहि साधेंसुधें नसून प्रेमपत्र !

....तिच्या मनांत काय भावतरंग उठले असतील याचें वर्णनच करतां येणार नाहीं. तिच्या मैत्रिणी तर तिची थट्टा करून तिच्या नाकीं नऊ आणतात. आणि अशा वेळीं ती—

★★★

पात्रें .–

- शकुंतला
- प्रियंवदा
- अनुसया
- इतर शकुंतलेच्या सखी

# पूर्वरंग

या संगीतिकेंतील प्रसंग कण्वऋषींच्या आश्रमाजवळील मालिनीतटावर घडतो

निसर्गसौंदर्याच्या पार्श्वभूमीवर शकुंतला आपल्या सर्व सखीं-सह खेळते आहे असें क्रीडावातावरण सुरुवातीला निर्माण करावें. या प्रसंगीं पानांचा कुजबुजाट, पक्षांचे विविध आवाज नदीच्या पाण्याचा खळखळाट आणि मंगलवर्धक वाद्य-संगीताची पार्श्वभूमी निर्माण करावी.

शकुंतलेसह सखीसखींचें हंसणें-खिदळणें मधून मधून ऐकूं यावें. सर्वांची वेषभूषा आश्रमांत राहणाऱ्या आश्रम-तरुणींप्रमाणें असावी. आणि केशभूषा अजिंठा येथील चित्रांत दाखविल्या-प्रमाणें असावी.

पत्रलेखनाच्या वेळीं शकुंतलेच्या मनांत निर्माण होणाऱ्या विविध प्रणयाविष्काराच्या भावना प्रत्यक्ष मुखावर प्रतिबिंबित झाल्यास प्रसंगाला अधिक उठाव मिळेल.

प्रसंगानुकूल संगीतस्वरांची योजना व्हावी.

★★★

# पत्र लेखन

( शकुंतला आपल्या सखींसमवेत तळ्याच्या किनारीं बसली असून कमलपत्रावर कमलदेठानें दुष्यंताला प्रेमपत्र लिहीत आहे. वातावरण आनंदी असून संगीतांतून आनंदसूचक स्वर निघूं लागत आहेत. )

**शकुंतला :–** सखींनो प्रेमपत्र हें पहिलें वहिलें !
हृदयावरि हृदयानें जें लिहियलें !
थरथरती गे अधर पाकळी
हृदयीं उमले प्रीति कळी
प्रीत माझी, मलाच पुरतें कळलें
मी स्वत च हरवुन बसलें बसलें !

**प्रियवंदा :–** सखे ! सांभाळ ग बाई, सांभाळ !

**शकुंतला :–** एकदांच मम हृदयीं ये
नयन भरुन तुज पाहूं दे
गुंफिल्या मी प्रणय-फुलांच्या माळा
नको करूं तूं तयांचा चोळामोळा
येऊन हृदयाची सारी तमा
सुखे गीत गाऊं दे !

**अनुसया :–** अग, एकदांच कां ?
अनेकदां येऊं दे ना !

( सर्वजणी हंसतात. सर्व सखींना उद्देशून शकुंतला शृंगारायला सांगते. )

**शकुंतला –** फुलवित हृदयीं प्रेमकळा
सखींनो, भाळीं लावा चंद्रटिळा
पिवळ्या हळदीनें तनु ही भरली
त्यांत प्रीतीची लाली विरली
मन लज्जेनें काया थरथरली
उन्मलित नयनीं भावकळा

हळूंच पसरे गुलाल लाली
प्रीतकळी फुले कपोलीं
हृदयां सुखवी स्निग्ध बोली
नजरेनें फुलतो प्रीतमळा !

रंग भरा ग नखानखाला
चंदनाची उटी अंगाला
रसरंगाला चढे तजेला
मनि वसे प्रीतीचा डाव खुळा

( सर्व मैत्रिणी परत एकदां मिस्किलपणें हंसतात. हास्याच्या धुंदींत असतांनाच पटक्षेप. )

***

# श र्मि ष्ठा

पात्रें :-

- शर्मिष्ठा
- ययाती

**कथासूत्र** : वृषपर्वासुता शर्मिष्ठेच्या जीवनांतील ययातीच्या प्रेमयाचनेची ही उत्कट शोकांतिका आहे.

गुरुकन्या देवयानीचा अपमान केल्यानंतर शुक्राचार्याला वृषपर्व्यानें दिलेल्या वचनाप्रमाणें शर्मिष्ठेनें देवयानीचें दास्य पत्करल्यामुळें ययातीच्या प्रेमाला ती वंचित राहते.

ययातीलाहि उघडपणें शुक्राचार्यांच्या अटीप्रमाणें शर्मिष्ठेवर प्रेम करणें संकटाचें वाटतें. म्हणून शर्मिष्ठा ही ययातीच्या प्रणयाराधनाला युगायुगाची भुकेलेली असते; पण तिची साफल्याची पूर्ति केवळ विरहांतच पूर्ण होते युगायुगांतून ती ययातीच्या प्रेमाची याचना करते आणि ती निष्फळ झाल्यानंतर दु:खित निश्वासितें सोडीत बसते. ***

**रचना** : ही संगीतिका अत्यंत करुणपूर्ण असल्यानें यांतील सर्वच प्रसंग प्रकाश-अंधार या संधिप्रकाशाच्या पार्श्वभूमीवर घडतात असे दाखवावेत.

ययातीच्या असहाय्य कथेला करुण संगीत स्वरांची साथ देऊन आणि दुसऱ्या प्रसंगांतील शर्मिष्ठेच्या दु:खित प्रणयवंचनेला करुणार्त संगीत खंडाची पार्श्वभूमि देऊन तो प्रसंग अधिकच उठावदार करतां येईल.

शर्मिष्ठेची वेषभूषा ही विरहिणीला शोभणारी असावी· पांढरें पातळ असल्यास अधिक बरें. ययातीचा पोषाखहि साधा असल्यास चालेल.

प्रसंगानुकूल संगीत स्वरांची योजना करावी. ***

(रंगमंचकावर प्रकाश-अंधार या संधिप्रकाशाच्या पार्श्वभूमीवर ययाति अत्यंत औदासीन्यानें आपली दुःख-व्यथा निवेदन करतो. संगीत खंडाच्या पार्श्वभूमीवर क्षणैक काळ करुणार्द्र संगीताचे स्वर उठतात अंधुक प्रकाशामुळें या प्रसंगाला अधिकच उठाव येतो.)

**ययाति :–** तूं आलीस एकदां जीवनीं
शिशिरांतल्या पहाटेपरी
मिठींत बुडवून गेलीस
गीत आर्त आसावरी !
वंचित, तृषार्त मी कधींचा
युगायुगाचा विरही पांथ
अजुनहि तुजसाठीं आहे
पिऊनी मृगजळ अतृप्त
विकलतेच्या जाणिवेंत गे
उन्मनस्क, विवश मी
स्वप्नस्मृतींचीं रेशिम शल्यें
मनां बोचतीं माझ्या विरागी
निशिगंधाच्या आर्त निश्वासीं
गंधवेडी रात तळमळे
विवशतेची वेदना गात्रीं
अभिशाप होऊनिया पोळे
गाळिती नयन-पक्षी एक
उष्ण जलथेंब उन्मनित
तत्क्षणीं तें हो मातीच्या
ओठावरलें अधुरें गीत !

(अशाच अंधाऱ्या वातावरणांतून मार्ग चाचपडत आणि शब्दांचा वेध घेत हळूहळू शर्मिष्ठा येते. करुण स्वर अधिकच उच्चतर होतात.)

**शर्मिष्ठा :-** कोण तुम्ही कां आला येथें ?
**ययाति :-** मी ययाति आलों सखी जेथें !
**शर्मिष्ठा :-** होईल कैसें प्रिया शक्य हें
देवयानी मजवर जळते आहे !
**ययाति :-** सखे मी तृषार्त तव प्रीतीचा
युगायुगाच्या तव भक्तीचा !
**शर्मिष्ठा :-** तें शक्यच नाहीं !
तें अशक्य !...तें अशक्य !...
तरीहि—

मृद्गंधाच्या परिमल लहरींत
तुझ्याच कबरींत विसावेन मी
व्योम-धरेची मीलन रेषा
भंगुन, प्रीत हो जरि निकामी
भंगल्या, विवशतेच्या मनाला
शृंगारिन मी वासना रंगीत
ओठांत दडलेल्या आर्त व्यथेला
उन्मनि कालवीन मूक मनाला
चिरवांच्छित तव स्पर्श दुखरा
धुंद मिठींतील लाडिक शपथा
गुलमोहोराची लाज कोळून–
विटकी सांगे अपुली भग्न व्यथा
जोगियाची तव आर्त सुरावट
हृदयां विदीर्ण भेदून जावें
उरीं फुटलेली प्रीतकळी...
तव कबरींत निर्माल्य व्हावें !

(अत्यंत असहाय्य स्थितींत असतांनाच पार्श्वसंगीताच्या पार्श्वभूमीवरून अत्यंत करुणार्त संगीताचे स्वर उच्चतर होत असतांनाच पटक्षेप.)

***

४५०८४ दि: ...... ७/०४
१८३८

राग रंग

सं.... १५

## कथासूत्र :

भारतीय रागसंगीताची एक परंपरा आहे. या रागपरंपरेंत प्रत्येक रागाला आपल्या परी स्वतंत्र असें अस्तित्व आहे. यांत कोण शांत स्वभावाचा आहे, कोण वीर रसानें भरलेला आहे, कोण शृंगारिक आहे तर कोण क्रुद्ध आहे. प्रत्येकाला मानवाप्रमाणें विविध भाव-भावना आहेत.

संगीत सृष्टीच्या काल्पनिक प्रदेशांत असाच एकदां रागराजाधिराज मालकोश महाराजांचा दरबार भरतो. त्याच्या दरबारांत त्याच्या कुळांतील त्याचे आश्रित राग-रागिण्या त्याचें स्वागत-गुणगान–करण्यासाठीं जमलेले आहेत. दरबारांत सर्वत्र मालकोश महाराजांचा जयजयकार होतो; परंतु हें कीर्तिवैभव दीपक रागाला सहन न होऊन तो मोठ्या रागानें मालकोश राजावर चाल करून येतो.

दोघांचें दरबारांत युद्ध सुरू होतें. त्यांत मालकोशाचा पराभव होत असतांनाच त्याचा गुरु-समान मित्र भैरव येऊन दीपकाला युद्ध थांबविण्याची विनंती करतो. परंतु मदानें धुंद झालेला दीपक त्याचें ऐकत नाहीं. नंतर भैरवपत्नी भैरवीहि

येऊन युद्ध थांबविण्याची प्रार्थना करते. दीपक कुणाचेंहि ऐकेनासें पाहून भैरव भैरवी आपला सखा मेघराजाची प्रार्थना करतात.

मेघराज त्यांची प्रार्थना ऐकून त्वरित् मालकोश राजाच्या दरबारांत येतो आणि मालकोश-मेघराज मिळून दीपकाबरोबर घनघोर युद्ध करून त्याचें पारिपत्य करतात. या विजयानें परत दरबार आनंदानें मालकोश व मेघराजाचा जयघोष करतो. दरबारांत पुनश्च आनंदोत्सव साजरा केला जातो.

★★★

पात्र :

- रागराज मालकोश
- रागसखा वसंत
- रागसखा भैरव
- रागप्रिया बागेश्वरी
- रागदासी भीमपलासी
- भैरवपत्नी भैरवी
- रागारि दीपक
- इतर दरबारांतील पात्रें – सेवक वगैरे

## रचना :

भारतीय राग-संगीत सृष्टीवर मनुष्य स्वभावाचें रूपक करून ही संगीतिका साकार केली आहे.

या संगीतिकेचे सर्व प्रसंग रागराज मालकोश महाराजांच्या दरबारांतच घडतात. तेव्हां रंगमंचकावर दरबाराच्या थाटाची सजावट करावी. दरबार भरलेला असून दोन्ही बाजूला राजाचे आश्रित बसले असून मध्यें सिंहासनाधिष्ठित मालकोश महाराज स्थानापन्न झालेले आहेत. बागेश्वरी आणि भीमपलासी या सर्वांची शृंगारिक वेषभूषा मौल्यवान् असावी. पार्श्वसंगीत खंडांतून आनंदवर्धक स्वर उठावेत. बागेश्वरी आणि भीमपलासी यांनीं प्रवेश केल्यानंतर त्यांच्या स्वभावाला साजेसे स्वर-बोल संगीतांतून काढावेत. भैरव आणि त्याची पत्नी भैरवी यांची वेषभूषा साधी वैराग्यपूर्ण असावी.

दीपक रागाचा पोषाख आणि चेहरा यांतून त्याच्या विध्वंसक वृत्तीची आणि क्रुद्धतेची कल्पना यावी.

दरबारांत युद्धाच्या प्रसंगीं शक्य तों वास्तवतेचा आभास निर्माण करावा.

प्रसंगानुकूल संगीत स्वर बोलांची आणि प्रकाशाची योजना करावी.

***

(संगीत रागराज मालकोश महाराजांचा दरबार भरलेला आहे. वादकवृन्द त्याची स्तुति गातात. नर्तिका नृत्य साकार करून त्याचा जयजयकार करतात.

**निवेदक :-** बह्वाकारैर्विरचितवपुर्योऽखिलस्थानकस्थो ।
स्तोकं शोकं नुदति नितरां यः श्रुति श्रामवर्ती ॥
योऽलंकारैरधिकसुभगो रागपूराभिगम्यो ।
वंदे कालत्रितयसहितं माधवं तं च नादम् ॥

(पार्श्वसंगीत खंडांतून त्रिविध रागांचे बोल क्षणैक काल छेडिले जाऊन वातावरण धुंद केलें जातें.)

**पार्श्वगायक :-** रागो यं मालकौशिर्मृदुलगमधनिः प्रौढपंचस्वरढ्या।
गंभीरः सुस्वरश्च त्यजति य ऋषभं पञ्चमं चापि नित्यम् ।

**नर्तिका :-** जय हो जय हो, मालकोशचा जय हो

**सर्वजण :-** जय हो जय हो, मालकोशचा जय हो !

**नर्तिका :-** मालकोश हा आमचा राज
अवनीवरती उधळितो साज
वंदति सारे सोडुनी लाज
जय हो जय हो, मालकोशचा जय हो !

(क्षणैक काल तबल्यावर तोडी घुमून संगीत खंडांतून वेगवेगळे स्वर-बोल साकार होऊं लागतात. या संगीत खंडाच्या धुंद पार्श्वभूमीवरच नर्तिकेचे नूपुर घुमूं लागून नृत्याचा एक बहारदार तुकडा सादर केला जातो. एवढ्यांत मालकोशसखा वसंतराग दरबारांत प्रवेश करून त्याचा जयजयकार करतो.)

**निवेदक :-** श्यामः सुवेशः कुसुमांगवासः
पलाशपुष्पाभरणानि यस्य ।
सानंदवदनो धृतचापबाणो
गजाधिवासः कथितो वसन्तः ॥

**वसंतराग -** जय हो जय हो, मालकोशचा जय हो !

(शांत सुस्वभावी वागेश्वरीचा दरबारांत प्रवेश होतो. क्षणभर सर्वांचे डोळे तिच्यावर खिळतात. पार्श्वसंगीत खंडांतून वागेश्वरीचे बोल उठतात.)

**निवेदक :-** आली आली धरणीवरी
राससुंदरी वागेश्वरी !

(मालकोशाची दासी भीमपलासी ही पण दरबारांत प्रवेश करते. पार्श्वसंगीत खंडांतून भीमपलास रागाचे बोल क्षणैक काल उठतात.)

**निवेदक :-** आली प्रिय भीमपलासी
रागराजाची पददासी

(परत एकदां नर्तिकेचा नृत्याचा बहारदार तुकडा सादर केला जातो. पण एकाएकीं कां कोण जाणे वातावरणांत बदल घडून करुण स्वर निघूं लागतात. नेपथ्यांतून क्रोधायमान दीपक-रागराजाचें आगमन होत असल्याची आरोळी ऐकूं येते–

"सावधान मालकोश रागराज! सावधान!"

अशी परत परत आरोळी ऐकू येते आणि दरबारांत अतिशय क्रुद्धतेनें दीपक-रागराज प्रवेश करतो. क्षणभर सर्वांनाच भय वाटते.)

**निवेदक :-** बाला रतार्थं प्रविलीनदीपे
गृहेऽन्धकारे सुभगा प्रवृत्ता ।
तस्याः शिरोभूषणरत्नदीपैः
लज्जाः दधौ दीपक रागराजः ॥

(मालकोश राजाच्या कीर्ति-वैभवाचा दीपक राजाला हेवा वाटून तो त्याला लढण्याचें आव्हान देतो. दरबारांत दोघांच्या तरवारी झडूं लागतात. दीपकाच्या भयंकर अग्नियुक्त प्रहारापुढें मालकोशाचें कांहीहि चालेनासें होतें. तो असहाय्य होतो न होतो एवढ्यांत त्याचा हितचिंतक भैरवराग येतो.)

**निवेदक :-** भस्मांग विप्तावयवः सुगात्रो
भालस्थले शोभितशीतरश्मिः ।
त्रिशूलहस्तो वृषभाधिरूढः
स भैरवो यः कथितो मुनीन्द्रैः ॥

(भैरव दीपकाला युद्ध थांबविण्याची विनंती करतो; परंतु मत्त दीपक युद्ध थांबविण्यास नकार देतो. परत तलवारीवर तलवारी परजूं लागतात. एवढ्यांत भैरवपत्नी भैरवी येते.)

**निवेदक :-** स्फटिकरचित पीठे रम्य कैलास शृंगे
विकचकमलपत्रैरर्चयन्ती महेशम् ।
करधृत घन वाद्यां पीतवर्णा भैरवस्त्री ।

(तीहि दीपकला युद्ध थांबविण्याची विनंती करते. पण हाय ! तो कुणाचेंहि मानत नाहीं. तेव्हां दोघेहि मिळून आपला हितचिंतक सखा मेघमल्हार याची प्रार्थना करतात.)

**भैरव :-** बरस बरस मेघा, जलद अमृताच्या सजल धारा
प्रभा प्रीतीच्या बल शक्तीनें आर्त तोषवि ही धरा

**भैरवी :-** कुंभ भरुन ते पखालीचे अवनीवर तरुवेलींवर
शतसुमन-सुधा ओत फुलण्या कळया चेतोहरे

**निवेदक :–** कदंबवृक्षस्थित दिव्यमूर्तिः
मयूरवाहः करवीरपात्रः।
हरीतवस्त्रो बहुनीलवर्णः
स मेघरागः कथितो मुनींद्रैः ।।

( दरबारांत मेघराग प्रवेश करून आपल्या असीम पराक्रमानें दीपकाचा उच्छेद करतो. दरबारांत मेघरागाचा आणि मालकोश रागाचा जयजयकार घुमतो. संगीत खंडांतून परत आनंदवर्धक स्वरांचे बोल उठतात नि पटक्षेप.)

★★★

शबरी

## कथासूत्र :

पंपा-सरोवराच्या पश्चिमतीरीं असलेल्या मातंग ऋषींच्या आश्रमांतील मातंग ऋषींची परिचारिका शबरी हिला राम-लक्ष्मण-सीता वनवासप्रसंगीं आपल्या आश्रमाच्या परिसरांत आल्याची सुवार्ता लागते. त्याबरोबर तिला अत्यानंद होतो. कारण ती रामदर्शन भुकेली होती ना ?

प्रत्यक्ष राम आपल्या आश्रमांत येणार या वार्तेबरोबर ती रामाच्या स्वागताची जोरांत तयारी करूं लागली. आणि राम जेव्हां तिच्या आश्रमांत उपस्थित झाला तेव्हां तिला स्वर्गप्राप्ति इतका आनंद झाला !

रामाच्या स्वागताबरोबरच रामाला भेट द्यावी म्हणून तिनें स्वकरें तोडून आणलेलीं वनांतील गोड बोरें रामाला उपहारार्थ दिलीं.

बोरें खात असतांना त्यांवरील दंतव्रणांमुळें लक्ष्मण, सीता शंकाकुल होतात. परंतु ती भक्तिभावानें अर्पित केलेलीं बोरें असतात, म्हणून राम त्यांकडे दुर्लक्ष करून तीं मोठ्या आनंदानें खातो, व शबरीला धन्यता देऊन लक्ष्मण-सीतेसह पुढें जातो.

***

पात्रें :— ■ शबरी ■ राम

■ लक्ष्मण ■ सीता

# श बरी

( स्थळ :– मातंग ऋषींच्या आश्रमांतील परिचारिका शबरी हिला प्रभु रामचंद्र हे वनवासानिमित्त भ्रमण करतांना आपल्या आश्रमाच्या परिसरांत आल्याची वार्ता समजते. या वार्तेमुळें तिला अत्यानंद होतो. ती रामाच्या स्वागताची साधीसुधी पण भव्य तयारी करते; आणि रामाच्या उपहाराकरितां वनांतील बोरें आणते. आनंदी वातावरणाच्या पार्श्वभूमीवर मंगल सूचक संगीताचे स्वर उमटतात.

**निवेदक :–** वनवासगमनीं राघव येतां
मातंगाच्या आश्रमांतरीं
अर्पुनि धन्य झाली शबरी
भोळी वनवल्लरी

**शबरी :–** रघुनंदन माझे, आज घरां आले
हृद्‌फुलांच्या मी पायघड्या केले
वृक्षलतांनीं माथा खाली;
द्या रघुराया शीत सावली
धन्य शबरी पावन झाली
हृदयां ये भरते, रघुनंदन फुलले

कमलांकित या शय्येवरती
बसतिल श्याम सितेसंगतीं
भक्षी बोरें भाई सोबतीं
भाळि लावितां रज पावन मी झालें !

( मधून मधून राम, लक्ष्मण आणि सीता क्षति पडलेल्या त्या बोरांकडे शंकित दृष्टीनें पाहतात. )

शंकाकुल कां बघतां सारे
आणिलीं बोरें मी स्वकरें
सेवा तुम्ही तीं निर्भरें
आनंदाश्रु मी पदीं वाहियले !

**राम :–** माते शबरी ! तव भक्तीनें
धन्य जाहलों तव प्रीतीनें !

**सीता :–** शबरी माई आणिक माता
प्रेम असूं दे उत्कट पुरता !

( राम-सीता शबरीला आशीर्वाद देतात. आणि लक्ष्मणासह परत वनवास-गमनास निघतात. पटक्षेप )

★★★

रा स क्री डा

## कथासूत्र :

ही संगीतिका कवि जयदेवाच्या ‘गीत गोविंद’ या काव्यावर आधारलेली आहे.

कृष्ण-राधेच्या प्रेममय जीवनाचे अनेक मधुर पैलू या संगीतिकेंतून दाखविलेले असून राधा-कृष्णाच्या उत्कट प्रेमाचें दर्शन यांतून दाखविलें आहे.

कृष्णवेडी राधा ही कृष्णाच्या प्रेमाकरितां युगायुगाची आसुसलेली असते. परंतु कृष्ण कसला खट्याळ ! राधेच्या मनोक्षय प्रेमाकडे दुर्लक्ष करून तिला खिजविण्यांत त्याला धन्यता वाटत असते ! कुंजवनांत कालिंदीतीरीं राधेला भेटण्याकरितां दिलेलीं आश्वासनें तो पाळीतहि नसे. या गोष्टीनें राधेला चीड येई. परंतु कृष्णावर रागावून करणार काय बिचारी ?

आपली सखी ललिता हिच्या साह्यानें कृष्णाची मार्गप्रतीक्षा, व त्याच्या प्रेमाची याचना या पलीकडे ती करणार तरी काय ?

....कृष्णाच्या भेटींची कितीतरी आश्वासनें, आणा-भाका हुकून, राधेचा रुसवा-फुगवा होऊन कृष्ण शेवटीं राधेला भेटत असे. आणि या भेटींतच राधा कृष्णाचे मागील सर्व अपराध विसरून जात असे. —कृष्ण-राधेच्या प्रणयजीवनाची ही उत्कट कथा या संगीतिकेंत सांगितलेली आहे.

★★★

पात्रें :–

- कृष्णकन्हैया
- मोहनमाया
- राधेची सखी – ललिता
- इतर गोप-गोपी

# रचना -

ही संगीतिका इतर संगीतिकांहून थोडीशी वेगळी आहे. यात एका अभिनव पद्धतीचा अवलंब केला आहे, आणि ती पद्धत म्हणजे गद्य आणि पद्य यांचा सरसहा साकल्यानें उपयोग ! पात्रांना वा प्रयोग करणाऱ्यांना द्याव्या लागणाऱ्या सूचना ह्या सुरुवातीस कंसांत न देतां त्या प्रसंगोपात्त वर्णनात्मक गद्यांतच दिलेल्या आहेत. अभिनयाच्या दृष्टीनें त्यांचा उपयोग करावा. या संगीतिकेंतील पहिला प्रसंग बिंदुबिल्व या गांवांतील मंदिराच्या प्रांगणांतील आहे. दुसरा प्रसंग कुंज-भूमींतील. तिसरा प्रसंग रासक्रीडेचा, आणि चवथा परत कुंजवनाचा आहे.

यांतील सर्वच प्रसंग करुण-शृंगारसप्रधान आहेत. तेव्हां या प्रसंगांना उठाव मिळेल असा अभिनय आणि संगीत स्वरांची जोड मिळावी.

प्रसंगानुकूल प्रकाशाची योजना झाल्यास अधिक बरें !

★★★

**निवेदक :–** श्रितकमलाकुचमण्डल धृतकुण्डल ए
कलित ललित वनमाल जय जय देव हरे !

(निवेदकानें गीत गोविंदांतल्या प्रथम प्रवेशामधील वसंत परिहासाला सुरवात केली. बिंदुबिल्व गांवांतील मंदिराच्या प्रांगणाचें दृश्य रंगमंचकावर उभें केलेलें असून मंदिरांमध्यें दर्शनाकरितां येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची धांवपळ चाललेली दिसते. मंदिरांतील घंटानाद आणि धूपाचे धूर आजुबाजूच्या आसमंताला उजळून काढत असल्याचें दिसतें. अशा प्रशांत वातावरणांत गीतगोविंदाच्या मंगल चरणांचे स्वर घुमून उठतात आणि मंदिरांतून हातामध्यें फुलांनीं भरलेलीं तबकें घेऊन आणि त्यांतील फुलें चौफेर उधळीत दोन नृत्यांगना आपल्या पायांतील नूपुरांना छेडीत रंगमंचकावर प्रविष्ट होतात. आणि आपल्या नूपुरांना छेडीत त्या नृत्याच्या लयकारींत तोडयाला सुरवात होते.)

**गायक :–** थय थय ता थय गिडिगन् तकतुना धिगित।
धिगित् धिगित् धा धा धा–

(त्यांच्या तोडयाच्या चालीबरोबरच ललित गीतहि साकार होऊं लागतें. जणुं गीताबरोबर ताल रंगमंचकावर मूर्त झाले ! )

**निवेदक :–** वृन्दावन कुंजभवन नाचत गिरिधारी !
धर धर धर मुरलि अधर भर भर स्वर मधुर मधुर
कर कर नट–वरस्वरूप सुंदर सुखकारी ॥

(गीतांतील शब्दांच्या भावाबरोबर विविध नृत्यमुद्रांचीं रसपूर्ण दर्शनें घडवीत असतांनाच तंतुवाद्यांच्या साथीबरोबर गीतगोविंदाच्या चरणाला सुरवात होते. वातावरण जणुं काव्याच्या मंगलतेनें भारून सुगंधित होतें.)

× × ×

**निवेदक :–** श्रीजयदेव कारिदं कुरुते मुद ए
मङ्गलमुज्वलगीतं जय जय देव हरे
जय जय देव हरे ।।

( मंगल चरण संपल्यानंतर रंगमंचकावर कुंजभूमि साकार होते. ऋतुराज वसंताचें आगमन झाल्याचें दृश्य दिसूं लागतें. त्या मदनधुंद वातावरणांतून कोकिळांचें कूजन, भृगांचा गुंजारव आणि रंगधारी उत्फुल्लित झालेल्या फुलांचे सुगंधी उच्छ्वास इत्यादि मनाला मोहित करणाऱ्या गोष्टी वातावरणाला अधिकच उठाव आणतात. अशा वेळीं राधेची सखी ललिता राधेला चिडविते– )

**ललिता :–** विहरति हरिरिह सरसवसन्ते ।
नृत्यति युवतिजनेन समं सखि,
विरहिजनस्य दुरन्ते ।।

–'अग राधे, तुझा कृष्ण तो पीतवसनमाळी त्या गोपींसमवेत कसा रमला आहे, पाहिलास ? त्याच्या शृंगार लीलांना तोड नाहीं... राधिके, त्याच्या धीटपणाला जोड नाहीं !'

अग ललिते, रमूं दे ग त्या कृष्णाच्या साहचर्यांत ! आणि होऊं दे त्याला मग्न त्या रासनृत्यांत ! त्याचा तो खेळकरपणा जणुं माझ्या हृदयांत, जाऊन भिडतो पहा ! कृष्णसख्यावर माझा अमाप विश्वास; अन् अथांग प्रेम आहे पहा ! म्हणूनच त्याचे दोष मला दिसतच नाहींत !'

—तरी ललिता राधेला श्रीकृष्णाची रासक्रीडा दाखवीत नि तिच्या मनीं कृष्णाविषयीं द्वेष निर्माण करणाऱ्या इर्षेनें—

**ललिता :–** "अग ते बघ बघ !"
श्लिष्यति कामपि चुम्बति कामपि
कामपि रमयति रमाम् ।
पश्यति सस्मित चारुतराम्
अपरामनुगच्छति वामाम् ।।

(ललितेच्या गळ्यांत पडून राधा अत्यंत समाधानानें म्हणते,)

"अग असूं दे ग ! मला तूंच ना माझी सखी सांभाळून घेणार ? मला कृष्णवेडीला तो कृष्ण तूंच ना भेटवणार ?

× × ×

**निवेदक :-** ललितलवङ्गलतापरि शीलन–
कोमलमलयसमीरे ।
मधुकरनिकरकरम्बित कोकिल–
कूजितकुञ्जकुटीरे ॥

परत ललितेची राधिकेला टोचणी लागली.

**ललिता :-**

"अग राधिके, ऐक. तुझं लक्ष कसं नाहीं ?"

"कां ? काय झालं ?"

"अग कुंजवनीं ऋतुराज वसंतानं प्रवेश केला आहे !"

"केला असेल. मग त्याचं मला काय ?"

"मलयानिलानं लवंगलतांचा मंद सुगंध वृंदावनभर पसरविला आहे !"

"त्याचं भलं होवो !"

"आणि तुझं ?"

"माझं ? अग, मंगलांचं मंगल असा श्रीहरि मी माझ्या हृदयांत कोंडून धरला आहे. माझ्या भल्याचं काय विचारतेस ?"

"अहाहा ! राधिके, तूं इतकी खुळी कशी ग ?"

"कां काय झालं ?"

"जरा कुंजवनांत बघ काय चाललं आहे तें !"

"तूंच तें सांग ना !"

"सांगू ? ऐक. मधकरांचा गुंजारव, कोकिलांचं कूजित व बकुल वृक्षांच्या फुलांच्या उच्छ्वासांमुळें कुंजवन अधिकच हृदयंगम झालें आहे.

तमाल-वृक्ष कोंवळ्या पालवीनं वहरलेले आहेत. त्या पालवीच्या कस्तुरीसारख्या गंधानं वातावरण सुगंधी झालं आहे, हें तर खरंच. पण तो सुगंध युवतींचीं हृदयं जणुं विदीर्णच करून टाकीत आहे!....राधे, ऐकतेस ना?"

"काय?"

"अशा सुखद समयीं तिकडे यमुनेनं ढलेल्या कुंजवनांत सखींना घेऊन तो क्रीडा करीत आहे."

"कोण?"

"तो – विश्वमोहन कृष्ण!"

**निवेदक :–** स्फुरयति मुक्तलता परिरम्भण–
मुकुलित पुलकितचूते ।
वृन्दावनविपिने परिसर–
परिगत यमुनाजलपूते ॥
विहरति हरिरिह सरसवसन्ते ॥

× × ×

रासक्रीडेंतील गोपींच्या समवेत विहार करीत बसलेला श्रीकृष्ण रंगमंचकावर दिसूं लागतो. तोंच त्या रासरंगांत ललिता सोबत आणलेल्या राधिकेसह प्रवेश करते– रंगभूमीच्या अग्रभागावर क्रीडोत्सुक गोपींना मागें सारून नृत्याविष्कारानें पैंजणांच्या स्वराला किंचित् छेडीत अन् वाऱ्या-सरशीं आपल्या मुक्त कुरळ कुंचलांच्या बटा नि डोईवरचा ढळलेला घुंघट मागें सावरीत कोण बरें ही येत आहे? कोण... गौळण?... छे! ही तर मनोहारिणी राधा. जणुं प्रेमरसाची ओतीव मूर्तीच! कुंजवनांत कुणाची बरं वाट पहात आहे ही? हिच्या पायांत तर नृत्याची लचकच भरलेली दिसते. ओठांत गीताचे शब्द घोटाळून, हृदयांत प्रीतीची उमंग ओसंडते आहे, आणि हिच्या मुखावर किंचित् बावरल्याची झांक पण दिसते आहे. नक्कीच ही मीलनोत्सुक असावी... पण हे शीत सुगंधी वारे कुठून बरें वहात

येताहेत ? आणि हे मुरलीचे मधुरव पण ! हा तर ब्रिजलाल कृष्णकन्हैया राधेकडेच येत आहे. दोघांनाहि परस्परांच्या मीलनाची ओढ आहे.

" कन्हैया !"

" राधे !"

– झाली प्रकृति आणि पुरुषाची भेट ! राधेच्या प्रेमरसाची मूर्ति कृष्णाच्या हृन्मंदिरीं स्थापिली गेली. आनंदानें यमुनेला उधाण आलें. रासक्रीडेला तर असीम खुमारी चढली आणि–

**निवेदक** :–

रासोल्लासभरेण विभ्रमभृता–
माभीरवामभ्रुवाम् ।
अभ्यर्णं ररिरभ्य निर्भरमुरः
प्रेमान्धया राधया ।।
साधुत्वद् वदनं सुधानयमिति
व्याहृत्य गीतस्तुतिः ।
व्याजादुद्भट चुम्बितः –
स्मितमनोहारी हरिः पातु वः ।।

–सगळ्या गोपी नृत्यविभ्रमांत सापडल्या आहेत असें पाहून राधा पुढें आली आणि तिनें मुकुंदाला पटकन् हृदयाशीं धरलं, आणि म्हणाली, 'तुझं मुख किती सुंदर आहे !' आणि तिनं कानगोष्टी करण्याच्या निमित्तानें चटकन् मुकुंदाच्या गालावर आपले ओठ टेकले आणि ती विजेसारखी दिसेनाशी झाली.

ललिता भानावर आलेल्या श्रीकृष्णाला क्रुद्ध होऊन म्हणाली–

**ललिता** :–

निन्दति चन्दनमिन्दु किरणमनु
वन्दति खेदमधीरम् ।
व्यालानिलयमिलनेन गरलमिव
कलयति मलयसमीरम् ।।
माधव ! मनसिजविशिखभयादिव
भाननया त्वपि लीना ।

सा विरहे तव दीना –

सा विरहे तव दीना ॥

"तू असा कसा रे निःसंग ! अरे तुझ्या विरहानें दीन झालेली राधा बघितलीस ? ती चंदन, चांदणें मलयसमीर या सगळ्यांचा अधिक्षेप करते आहे !"

सखि अहनिश निःशानि ।

"सखी ललिते ! विरहार्त राधिकेला जाऊन सांग, कीं मी इथें तिची वाट पहातों आहे म्हणून . . !"

विरहोत्कंठिता राधा हुरहुरत्या मनानें नयनाभिराम श्रीकृष्ण आतां येईल, मग येईल म्हणून वाट पहात उभी राहते. पण शेवटीं श्रीकृष्ण तिला भेटण्याकरितां येत नाहीं. ती शोकानें विव्हल होते आणि–

**राधा :–** कथित समयेऽपि हरिरहह

न ययौ वनम् ।

"तो आला नाहीं ! ठरलेल्या वेळींहि तो आला नाहीं !"

शेवटीं कृष्ण न येतां ललिता येते आणि ती सांगू लागते–

**ललिता :–** पूर्वं यत्र समं त्वया रतिपतेरासा–

दिताः सिद्धयः

तस्मिन्नेव निकुञ्जमन्मथमहातीर्थे–

चल सखि कुञ्जं

सतिमिरपुञ्जं–

"अग राधिके, जिथें तूं प्रेम प्राप्त करून घेतलेंस तिथेंच, त्याच कुंजवनांत तो तुला बोलावीत आहे. श्रीकृष्ण तुझी वाट पाहत आहे !"

– पण राधेच्या मनांत एकच वेड होते !

**राधा :–** नायातः सखि । निर्दयो यदि शठः

त्वं दूति किं दुयसे ।

"तो आला नाहीं ! तो आला नाहीं ! ऐकलंस सखि, माझा कृष्ण आला नाहीं. त्याच्या निष्ठुरपणाला सीमाच नाहीं !"

आणि मग ती अतिशय क्रोधावेगानें स्फुंदूं लागते आणि––

**राधा :–**

बाधां निधेहि मलयानिलपञ्चबाण
प्राणान्गृहाण न गृहं पुनराश्रयिष्ये।
किं ते कृतान्तभगिनि ! क्षमया तरङ्गैः
अङ्गानि सिञ्च मम शाम्यतु देहदाहः॥

" आतां मलयानिला, पसर तुझे बाहू ! ने मला वाहून अज्ञाताच्या पलीकडे ! पुसून टाक ही व्यर्थ जीवनरेखा ! यमभगिनी यमुने, मला तुझ्या उदरांत ठाव दे ! तुझ्या शीतल तरङ्ग-लहरी माझ्या शरिरावरून वाहूं देत !"

शोकभारानें विव्हल झालेल्या राधेनें आपलें अंग धाडकन् जमिनीवर टाकलें आणि थोड्या वेळानें श्रीकृष्ण आल्यानंतर ती परत उठली. ती त्याच्यावर रागावली होती, चिडली होती. श्रीकृष्णाकडे पाहून ती त्याला जाब विचारते–

**राधा :–**

रजनिजनित गुरु जागर
वहति नयनमनुरागमिव
स्फुटमुदित रसाभिनिवेशम्
रजनिजनित गुरु जागर !

" रात्रभर विलासांत दंग राहिल्यामुळें जडावलेल्या नेत्रसंपुटांतूनहि अजून तुझा उन्माद-भर ओसंडतोच आहे ! तूं इथं कशाला आलास ?"

आणि त्याच्या अधराकडे बोट दर्शवून–

**राधा :–**

कज्जलमलिन विलोचन चुंबन–
विरचितनीलिमरूपम्।
दशनवसनमरुण तव कृष्ण
तनोति तनोरनुरूपम्॥

" अरे ! तुझ्या लालचुटुक अधरावर रेखिली गेलेली कुणा एकीच्या नेत्रांतल्या कज्जलरेखेची मुद्रा मला दाखवून खिजवायला आलास ?"

राधेच्या वाक्प्रहारानें कृष्णाची नशा उतरते. तो राधेला शेवटीं शरण येऊन तिची क्षमा मागूं लागतो. पण ती मानिनी त्याला दूर झिडकारूं लागते. शेवटीं श्रीकृष्ण हात जोडून–

**श्रीकृष्ण :–** क्षम्यतामपरं कदापि तवेदृशं न करोमि ।

' क्षमा कर दयिते ! आतां येथून पुढें असें कधीं घडणार नाहीं ! "

असें म्हटल्यावर ती त्याला क्षमा करते आणि आपलें मस्तक श्रीकृष्णाच्या हृदयावर टेकविते !

झालें ! दोघांच्या हृदयाचें जणुं मीलनच घडलें ! चोहोंकडे आनंदी आनंदाचें वातावरण निर्माण होतें. मंगल वाद्यांचे स्वर पार्श्व-संगीतावर उच्चतर होत जातात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४१३८४ दि: ७।८८
क्रमांक १५३६ नों. दि:

***

— समाप्त —

REFBK-0016310
REFBK-0016310
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. ९८३१७
मं. ठाणे (स्थळ प्रत)